CMYK

विनम्र अभिवादन



संत गाडगेबाबा यांची आज पुण्यतिथी

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २० डिसेंबर २०२४। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ४४ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

▌dainiktarunbharat.com
▌epaper.dainiktarunbharat.com

## राहुल गांधी यांनी केली धक्काबुक्की

# भाजपाचे दोन खासदार जखमी

### संसदभवन परिसरातील काँग्रेसच्या गुंडागर्दीने खळबळ

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

संसदभवन परिसरात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केलेल्या धक्काबुक्कीत भाजपाचे दोन खासदार जखमी झाले. या दोघांनाही डॉ. राम मनोहर लोहिया रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. लोकशाहीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे संसदभवन परिसरात प्रचंड खळबळ उडाली.

गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या कथित विधानावरून काँग्रेस सदस्यांनी बुधवारी संसदेत प्रचंड गदारोळ केला. काँग्रेसने गेल्या ७३ वर्षांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर जो अन्याय केला, त्याच्या विरोधात भाजपा आणि रालोआचे सदस्य हातात डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र घेऊन आज सकाळी नवीन संसदभवनाच्या मकरद्वारासमोर निदर्शने करीत होते.

दुसऱ्या बाजूला काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीचे सदस्यही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर अमित शाह यांच्याविरोधात घोषणाबाजी करीत होते. अमित शाह यांच्या माफीची तसेच राजीनाम्याची मागणी काँग्रेस सदस्य करीत होते. काँग्रेस सदस्य निदर्शनासाठी निळ्या रंगाचे कपडे घालून आले होते. राहुल गांधी निळ्या रंगाचा टी शर्ट घालून होते, तर प्रियांका वढेरा निळ्या रंगाची साडी परिधान करून होत्या. भाजपा सदस्य मकरद्वारासमोर नवीन संसदभवनात प्रवेश करायच्या पायऱ्यांसमोर निदर्शने करीत असताना राहुल गांधी आणि काही काँग्रेस सदस्य मकरद्वारासमोर आले. यावेळी दोन्ही बाजूचे खासदार समोरासमोर आले. त्यामुळे दोन्ही



संसदभवन परिसरात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या धक्काबुकीत जखमी झालेले भाजपाचे खासदार प्रताप चंद्र सारंगी

बाजूंनी जोरदार घोषणाबाजी झाली. काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. राहुल गांधी आणि काँग्रेस सदस्यांनी जबरदस्तीने आत जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी पायऱ्यांवर उभ्या असलेल्या भाजपाच्या खासदारांशी त्यांनी धक्काबुक्की केली. बाजूला भाजपा खासदार प्रतापचंद्र सारंगी उभे होते. राहुल गांधींनी एका भाजपा खासदारांला धक्का दिला आणि तो सारंगी यांच्या अंगावर पडला. यामुळे सारंगी खाली पडले. त्यांच्या डोक्याला मार लागला आणि रक्त वाहू लागले. धक्काबुक्कीत भाजपाचे दुसरे खासदार मुकेश राजपूतही जखमी झाले. आणखी एक भाजपा खासदारही जखमी झाला.

सारंगी यांना व्हीलचेअरवरून तर राजपूत यांना स्ट्रेचरवरून रुग्णवाहिकेपर्यंत नेण्यात आले. तिथून त्यांना डॉ. राममनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दोघांवरही अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अनेक केंद्रीय मंत्री आणि भाजपा खासदारांनी रुग्णालयात जात सारंगी आणि राजपूत यांची भेट घेतली. ◀*(तभा वृत्तसेवा)*

#### प्रतापचंद्र सारंगी

भाजपा सदस्य निदर्शने करीत असताना मी पायऱ्यांवर उभा होतो. राहुल गांधींनी एका भाजपा खासदाराला धक्का दिला, तो माझ्या अंगावर पडला, त्यामुळे मी खाली पडलो. यात माझ्या डोक्याला दुखापत झाली, असे प्रतापचंद्र सारंगी यांनी सांगितले. ■

#### पोलिसात दोन्ही बाजूंनी तक्रार

राहुल गांधी यांनी भाजपा सदस्यांना केलेल्या धक्काबुक्कीची भाजपाने संसदमार्ग पोलिस ठाण्यात तक्रार केली. माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, बांसुरी स्वराज आणि अन्य नेते तक्रार दाखल करायला गेले होते. काँग्रेसतर्फेही भाजपा खासदाराविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. काँग्रेसतर्फे तक्रार दाखल करायला दिग्विजयसिंह आणि अन्य नेते गेले होते. ■

## सेवाधर्मच मानव धर्म : सरसंघचालक

**पुणे, १९ डिसेंबर**

हिंदू धर्म हा शाश्वत धर्म असून, या चिरंतन व सनातन धर्मातील आचार्य सेवाधर्माचे पालन करतात, हा सेवा धर्म म्हणजेच मानव धर्म आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी काढले.

हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेच्या वतीने शिक्षण प्रसारक मंडळीच्या म हाविद्यालयाच्या मैदानात हिंदू सेवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २२ डिसेंबरपर्यंत हा महोत्सव सुरू आहे. यात हिंदू संस्कृती, संस्कार आणि सामाजिक सेवाकार्याची माहिती सादर करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अनेक देवस्थाने, सामाजिक, धार्मिक संस्था, मठ मंदिरांच्या सेवाकार्याचा त्यात सहभाग आहे. त्याच्या उद्घाटन प्रसंगी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. एस. के जैन, उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, हिंदू सेवा महोत्सवाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, स्वामी गोविंददेवगिरी महाराज, लाभेश मुनीजी महाराज, इस्कॉनचे गौरांग प्रभू, हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे राष्ट्रीय संयोजक गुणवंत कोठारी आदी मान्यवर उपस्थित होते. सरसंघचालक डॉ. भागवत म्हणाले की, सेवा करताना कायम प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा आपला स्वभाव असतो. दिखाव्यासाठी सेवा न करता ती निरंतर करीत राहणारे सेवेची कामना करतात.



सेवेचा धर्म सांभाळताना अतिवादी न होता त्याचा मध्यम मार्ग आपण देशकाल परिस्थितीनुसार स्वीकारायला हवा. मानव धर्म हाच विश्वाचा धर्म असून, तो सेवेतून प्रकट व्हावा. आपण विश्वशांतीसाठी घोषणा देतो. मात्र, अल्पसंख्यकांची काय अवस्था इतरत्र आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. तीन हजार वर्षांपेक्षा अधिक परंपरा असलेले शास्त्र, वाचन, इतिहास, स्वभाव आपले आहे. ते पाहणे आणि अंगीकारणे, पुढील पिढ्यांना त्यातून प्रेरणा देणे यासाठी असे हिंदू सेवा महोत्सवासारखे उपक्रम आहेत.

## संसदेच्या दोन्ही सभागृहात संतप्त पडसाद, कामकाज स्थगित

**नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

संसदभवन परिसरात आज सकाळी झालेल्या धक्काबुक्कीचे तसेच भाजपाच्या एका महिला सदस्याशी राहुल गांधी यांनी केलेल्या गैरवर्तणुकीचे संतप्त पडसाद संसदेच्या दोन्ही सभागृहात उमटले. यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज आधी एकदा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

राज्यसभेत दुपारी २ वाजता काम काज सुरू होताच सत्तापक्षनेते जे. पी. नड्डा आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी संसदभवनाच्या प्रवेशद्वारावर भाजपाच्या महिला सदस्यासोबत काँग्रेसच्या एका सदस्याने केलेल्या गैरवर्तणुकीचा मुद्दा उपस्थित केला. यामुळे भाजपा सदस्य



आक्रमक झाले आणि त्यांनी संबंधित सदस्याने माफी मागावी, अशी मागणी केली. काँग्रेसचे सदस्य या आरोपाचा प्रतिवाद करू लागले, यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. द्रमुकचे तिरुची सिवा म्हणाले की, भाजपा सदस्यांनी ज्याबाबत तक्रार केली, ती त्यांची बाजू आहे. या मुद्यावर काँग्रेस सदस्यांचीही एक बाजू आहे. भाजपाच्या फांगनोन कान्योक यांनीही उभे होत, आपल्यासोबत जे घडले, त्याची माहिती दिली. संसदभवनाच्या पायऱ्यांवर मी उभी असताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी अगदी माझ्याजवळ आले आणि माझ्यावर ओरडू लागले. यामुळे मी अस्वस्थ झाले. त्यांची त्यावेळची वागणूक विरोधी पक्षनेतेपदाला शोभणारी नव्हती. मी माझा बचाव करायला सक्षम नव्हते, असे नाही; मात्र मी त्यावेळी काहीही केले नाही, आज जे झाले, ते अतिशय वाईट होते. कोणत्याही महिला सदस्यासोबत असे व्हायला नको, मग ती अनुसूचित जातीची का असेना. त्यामुळे तुमचे संरक्षण मागण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे, असे त्या म्हणाल्या. सभागृहातील गोंदळ थांबत नसल्यामुळे अध्यक्ष धनकड यांनी कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले. तत्पूर्वी आज सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु होताच गृहमंत्री अमित शाह यांच्या विधानावरुन काँग्रेस आणि अन्य सदस्यांनी गदारोळ केला, त्यामुळे सभागृहातचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित करावे लागले.

## विधान परिषद सभापतिपदी प्रा. राम शिंदे यांची निवड

◆ **नागपूर, १९ डिसेंबर**

विधानपरिषदेच्या सभापतिपदी प्रा. राम शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे प्रा. राम शिंदे यांना सभापतीच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेऊन गेले. राम शिंदे १९ वे सभापती असणार आहेत.

प्रा. राम शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव सदस्य श्रीकांत भारतीय, उमा खापरे व शिवाजीराव गर्जे यांनी मांडला. त्यास सदस्य मनीषा कायंदे, सदस्य अमोल मिटकरी व सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रा. राम शिंदे यांचा परिचय करून दिला.



सभापतिपदी निवड झाल्यानंतर राम शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आणि आपण या पदाची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन, अशी ग्वाही सभागृहाला दिली. ◀*(तभा वृत्तसेवा)*

## अधिवेशन संपताच बहिणींच्या खात्यात हप्ता : मुख्यमंत्री

**नागपूर, १९ डिसेंबर**

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपल्यावर लाडक्या बहिणींच्या खात्यात हप्ता जमा करणार आहे. योजनेसाठी कोणतेही नवीन निकष लावण्यात आले नाहीत. मात्र, काहींनी तीन-चार खाती उघडली. काही पुरुष लाडक्या बहिणीच्या नावे रक्कम लाटत आहेत. अशांची चौकशी केली जाणार असल्याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिले.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, कोणीही कसलीही शंका मनात ठेवू नये. आम्ही जी आश्वासने दिली, ज्या योजना सुरू केल्या, त्यातील काहीही बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी विधानसभा निवडणकीत महायुतीवर भरभरून प्रेम दाखवले, त्यांच्या बँक खात्यात आम्ही हे अधिवेशन संपल्यावर डिसेंबर महिन्याचा हप्ता जमा करणार आहोत. काहींनी चार-चार बँक खाती तयार करून फायदा घेतला आहे. समाजात जसे चांगल्या प्रवृत्तीचे लोक असतात, तसे काही वाईट प्रवृत्तीचे असतात. अशा लोकांनी फायदा घेऊ नये, याची काळजी घेऊ. हा जनतेचा पैसा आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### रोहितत्रमधून ४०० लिटर आईल, २०० किलो कॉइल्सची चोरी; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**

अज्ञात चोरट्याने शेतामध्ये असलेल्या विद्युत रोहित्र मधून चारशे लिटर आईल, २०० किलो ताब्याचे धातूचे क्वाईल असे एकुण ८० हजाराच्या मुद्दे मालाची चोरी केली आहे. ही घटना सोलापूर पुणे हायवेवर सोलापूर टेक्स्टाइल्स समोर घडली आहे. याबाबत भीमाशंकर शिवशंकर पटणे वय ७५ रा बुधवार पेठ,सम्राट चौक यांनी फिर्याद दिली असून फौजदार चावडी पोलिसांत अज्ञाताविरुध्द बुधवारी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोलापूर पुणे हायवे रोडलगत सोलापूर टेक्सस्टाईलसमोर असलेल्या शेतात विद्युत रोहित्र आहे. या विद्युत रोहित्र च्या आतील ४०० लिटर आईल,ताब्यांचे धातूचे कॉईल असलेले २०० किलो किमतीचा ८० हजार मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार आरेनवरू हे करीत आहेत.

### कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी, अज्ञात चालकांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**

कंटेनरने दुचाकीस धडक दिली, या धडकेत दुचाकी स्वार जखमी झाला आहे. कंटेनर( एचआर५५ एआर ९९९८) च्या अज्ञात चालकांवर गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना शहरातील जोडभावी चौक याठिकाणी घडली आहे. याबाबत मल्लिनाथ तम्मणप्पा चारगमोळ (वय ६१, रा. उत्तर कसबा वाळीवेस, सोलापूर) यांनी फिर्याद दिली असून जोडभावी पेठ पोलिसांत बुधवारी रात्री कंटेनर च्या अज्ञात चालकांवर गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादीचा मुलगा संतोष व त्याचा मित्र नागेश पाटील हे दुचाकी ( एमएच १३एई ९५६७) वरून मार्केटिंगचे काम करून डबलसीट निघाले होते. जात असताना जोडभावी पेठ चौकात आल्यानंतर कंटेनर (एचआर ५५ एआर ९९९८) ने दुचाकीस धडक दिली. यामध्ये फिर्यादीचा मुलगा संतोष याच्या डोक्यास मुक्कामार व हातास खरचटले आहे. तपास पोलिस हवालदार रुपनर करीत आहे.

### दळणाची पिशवी घेऊन जाणाऱ्या महिलेस दुचाकीची धडक; चालकांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**

दळणाची पिशवी घेवून महिला रस्ता ओलांडताना दुचाकीने धडक दिली, या धडकेत बसम्मा बेल्याळ या जखमी झाल्या. मात्र दुचाकी चालक घटनास्थळावरून दुचाकी सोडून पळून गेला. त्याच्याविरूध्द जोडभावी पेठ पोलिसांत बुधवारी मध्यरात्री गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना १३ डिसेंबर रोजी सोलापूर मार्केट यार्ड या ठिकाणी घडली आहे. याबाबत बसान्ना शिवाराय बेल्याळ (वय ५४, रा. ऋषीकेश नगर, हैद्राबाद रोड) यांनी फिर्याद दिली असून दुचाकी(एमएच १३ एजी ८६४१) च्या अज्ञात चालकांवर जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १३ डिसेंबर रोजी फिर्यादीची पत्नी बसम्मा या दळणाची पिशवी घेवून सग्गम नगरातील पिठाची गिरणी येथे गेल्या होत्या. दळण घेवून घराकडे जाताना मार्केट यार्ड रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात दुचाकी चालकाने धडक दिली. या धडकेत ती महिला जखमी झाली.बघ्याची गर्दी झाली, दरम्यान घटनास्थळावरून चालक दुचाकी (एमएच १३ एजी ८६४१) सोडून पळून गेला आहे. याचा तपास पोलिस हवालदार साळुंखे करीत आहेत.

### रेल्वे स्टेशन भाजी मार्केटमध्ये हाणामारीत दोघे जखमी

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**

शहरातील रेल्वे स्टेशन येथील भाजी मार्केटमध्ये झालेल्या हाणामारीमध्ये दोन जण जखमी झाले. हुसेन खाजाभाई शेख (वय ५५, रा. फॉरेस्ट, सोलापूर) आणि रफिक हुसेन शेख (वय ३२, रा. फॉरेस्ट, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. १९ डिसेंबर रोजी सकाळी पावणे बाराच्या सुमारास रेल्वे स्टेशन रोडवरील भाजी मार्केट येथे किरकोळ कारणावरून युसूफ नदाफ व इतर दोन जणांनी मिळून लोखंडी रॉड व लाकडाने हुसेन शेख व रफिक शेख यांना मारहाण केली. यामध्ये दोघांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### सादेपूरजवळील अपघातात दुचाकीवरील एक ठार तर एक जण जखमी

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सादेपूरजवळील अपघातात दुचाकीवरील एक जण ठार झाला तर एक जखमी झाला. हा अपघात १८ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास झाला. गणेश हरिवान दुपारगुडे (वय १८, रा. निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. तर कपिल मधुकर कांबळे (वय २३, रा. निंबर्गी, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. गणेश व कपिल हे दोघे १८ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास निंबर्गी ते सादेपूर असे दुचाकीवरून जात होते. त्यावेळी सादेपूरजवळ त्यांच्या वाहनास अपघात होऊन ते दोघेही जखमी अवस्थेत मिळून आले. त्यामुळे खंडू व नागनाथ दुपारगुडे यांनी त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. आकाश माने यांनी गणेश यास मृत घोषित केले. तर कपिल याच्यावर उपचार सुरु आहेत. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### इक्बाल फॅशन दुकानाबाहेर तरूणास मारहाण; गुन्हा दागल

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**




शहरातील जेलरोड पोलिस ठाण्याजवळील इक्बाल फॅशन दुकानाबाहेर तरूणास मारहाण करून त्याच्याकडील सोन्याचे लॉकेट हिसकावून घेण्यात आले. सागर कमल एकमल्ले (वय २६, रा. लिमयेवाडी, सोलापूर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. १८ डिसेंबर रोजी साडेबाराच्या सुमारास सागर एकमल्ले हा इक्बाल फॅशन येथे कपडे खरेदी करण्यास गेला होता. कपडे खरेदी करून दुकानाच्या बाहेर आल्यानंतर अज्ञात ३ ते ४ जणांनी मिळून अज्ञात कारणावरून दमदाटी करून जबरदस्तीने बेल्टने, लाथाबुक्क्याने तसेच रॉडने मारहाण केली. यावेळी त्या अज्ञात लोकांनी एकमल्ले याच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून मारहाण केली. यामध्ये एकमल्ले यास गळ्यास व्रण व सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


# रथोत्सव मिरवणूक रविवारी

- श्री आदि जांबमुनी महाराज जयंतीनिमित्त आयोजन
- क्रिकेट स्पर्धांसह विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

जांबमुनी मोची समाजाचे कुलदैवत श्री आदी जांबमुनी महाराज जयंती निमित्त श्री आदि जांबमुनी महाराज मध्यवर्ती रथोत्सव समितीच्या वतीने रविवार दि.२२ डिसेंबर रोजी रथ मिरवणूक काढण्यात येणार आहे, अशी माहिती जांबमुनी मोची समाज रथोत्सव मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष शानराव साळवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रथोत्सव मिरवणुकीला समाजाचे धर्मगुरू वैकुंठवासी ह.भ.प. गुरुदास तोडमे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली २९वर्षाखाली सुरुवात झाली. ही परंपरा कायम ठेवण्यात आली आहे. यंदादेखील मिरवणूक मोठ्या प्रमाणात काढण्यात येणार असून विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी रथोत्सव मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष शानराव साळवे यांच्या नेतृत्वाखाली, शहर जिल्हा जांबमुनी मोची समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र भंडारे व युवक अध्यक्ष रतिकांत कमलापुरे यांच्या सहकार्याने रुपाभवानी मंदीर येथे सकाळी ९ वाजता ज्योत रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये समाजाचे खेळाडू सहभागी होणार आहेत. या रॅलीद्वारे छत्रपती शिवाजी महाराज चार हुतात्मा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन रॅली पुढे मार्गस्थ होणार आहे. रविवार दि.२२ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता रेल्वे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळ्यापासून जांबमुनी मोची समाज रथोत्सव मिरवणुकीची सुरुवात होणार आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे,



आमदार देवेंद्र कोठे, आमदार सुभाषबापू देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, मोची, मादिगा, मादरु महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मारुत पंद्री, बाबुभाई कॉकल, मुंबईचे समाजसेवक मल्लेश कणकम आदी मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मिरवणुकीस सुरुवात होणार आहे. ही मिरवणुक महात्मा गांधी पुतळा, कोनापुरे चाळ, फॉरेस्ट, जुना एम्पलायमेंट चौक, मोदी पोलीस चौकी, जगजीवनराम वस्ती, सात रस्ता, जगदंबा चौक, मौलाली चौक, महावीर चौक, सतनाम चोक, सिध्दार्थ चोक, बापुजी नगरमार्गे मारुती मंदिर येथे विसर्जीत होणार आहे. या निमित्त विविध उपक्रम घेण्यात येत आहेत.शिवानंद कुटी हरिपाठ मंडळ लष्करच्या वतीने दि. १९ डिसेंबर पासून कीर्तनाला सुरुवात झाली असून ते २० डिसेंबर पर्यंत चालणार आहे. तसेच स्वागत नगर, बापूजी नगर, लष्कर, कोनापुरे चाळ, मोदी या भागात रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. दि. २१ डिसेंबर रोजी जांबमुनी मोची समाज सेवा मंडळाच्यावतीने जांबमुनी महाराज यांच्या मुर्तीची महापुजा करण्यात येणार आहे. युवक अध्यक्ष रतिकांत कमलापूरे यांच्यावतीने दर सालाप्रमाणे यंदाही क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. असे अनेक विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवुन जयंती मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात येणार आहे.ही मिरवणुक यशस्वी करण्याकरीता समाजाचे माजी महापौर, आजी-माजी नगरसेवक नगसेविका, युवक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. ही मिरवणुक पाहण्यासाठी कर्नाटक, आंध्रप्रदेश, मराठवाडा, मुंबई, अंबरनाथ, होटगी, अक्कलकोट, पिंपरी चिंचवड आदी शहरातील समाजबांधव येतात, अशी माहिती देवेंद्र भंडारे यांनी दिली. या पत्रकार परिषदेस प्रा. नरसिंह आसादे, नागनाथ कासलोलकर, बाबू म्हेत्रे, सिद्धू म्हेत्रे, आनंद भंडारे आदी उपस्थित होते.



# कुचन प्रशालेत स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागाचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा हुतात्मा स्मृती मंदीर येथे पार पडला.

जि. प. सोलापूर माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते सरस्वती, नटराज व श्री मार्कंडेय महामुनीच्या प्रतिमेचे पूजनासह दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, विश्वस्त विजयकुमार गुल्लापल्ली, नागनाथ गंजी, श्रीधर चिट्याल, संगीताताई इंदापुरे, मधुकर कट्टा, गणेश गुज्जा, नागनाथ श्रीरामदास, रमेश बौद्धूल, अंबादास गज्जम, श्रीनिवास ईप्पाकायल, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, पुल्ली कन्या प्रशालेच्या प्राचार्या गीता सादुल, उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामुल, बिटला प्रशालेच्या मुख्याध्यापिका शारदा गोरट्याल, माजी प्राचार्य मधुकर गवळी, रोटेरियन धनश्री केळकर उपस्थित होते. प्राचार्य युवराज मेटे यांनी प्रास्ताविक केले. पर्यवेक्षिका प्रणिता सामल यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कविता गेंगाणे यांनी सूत्रसंचालन तर यादी वाचन बसवराज हिटनळ्ळी यांनी केले. मधुकर धर्मसाले यांनी आभार मानले.



# बिनव्याजी इस्लामी बँकिंग सामाजिक आणि आर्थिक समतेसाठी गरजेची : सलीम काझी

**एशियन बिलासुदी फायनाशियल सोसायटीच्या प्रधान कार्यालयाचे उद्‌घाटन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

इस्लामी बँकींग ही संकल्पना नव्या जागतिक अर्थव्यवस्थेला खुणावतोय. शोषणविरहीत समाजाच्या निर्मितीसाठी इस्लामी बँकींगकडे पाहिले जात आहे. व्याजाला मुठमाती देऊन जीवनाला आर्थिक शोषणातून मुक्त करण्याचा मार्ग इस्लामी बँकींगने दाखवला आहे. त्यामुळे नव्या जागतिक अर्थव्यवस्थेने आर्थिक समतेचा विचार म्हणून इस्लामी बँकींगकडे पाहायला सुरवात केली आहे. त्यामुळे बिनव्याजी तत्वाववर व्यवसाय करुन आर्थिक समतेच्या दिशेने वाटचाल करता येऊ शकेल, असे प्रतिपादन मुंबई येथील बँकींग तज्ज्ञ सलीम काझी यांनी केले.

सलीम काझी हे सोलापूरातील सुपर अर्बन क्रेडीट को ऑपरेटीव्ह सोसायटी आणि एशिअन बिनव्याजी सोसायटीच्या मुख्य कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक असोसिएशनचे संचालक दिनकर देशमुख हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, अ. जब्बार सगरे (लातूर), अ. रशीद शेख (बैतुल नसर, मुंबई), फारूख सय्यद (मुंबई), मुस्तफा कांचवाला (मुंबई), मौलाना म. इब्राहिम कासमी, मौलाना हारिस इशाअती, विलास कोरे, अ. जब्बार इंगळगी, मलंग शेख, फैज इनामदार हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीचे चेअरमन आसिफ इक्बाल, मुशताक इनामदार, डॉ. इक्बाल धोटेकर, सरफराज अहमद, इरफान पटेल, सीए मौलाना शेख, अल्ताफ कुडले आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मोईज शेख यांनी केले. जुबेर शेख यांनी आभार मानले.

# पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ; पाच जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

घराचे बांधकाम करण्यासाठी माहेरकडून पाच लाख रुपये घेवून ये म्हणत हुंड्याची मागणी केली, पैसे नाही दिले तर नांदायला घेवून जाणार नसल्याची धमकी दिल्याप्रकरणी सासरच्या पाचजणांवर विजापूर नाका पोलिसांत बुधवारी रात्री गुन्हा नोंद झाला आहे.

ही घटना १३ नोव्हेंबर २०२२ ते १३ नोव्हेंबर २०२४ दरम्यान विवाहितेच्या सासरी शहरातील



घोंगडे वस्ती या ठिकाणी घडली आहे. जैनब तौहिद शेख (वय २२ रा. न्यू कालिका मंदिर शेजारी)यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती तौहिद, सासरे अशपाक, सासू अंजुम( घोंगडे वस्ती सोलापूर),नणंद शाहिस्ता पानगल व मुस्कान पानगल (रा.पोटफाडी चौक) यांच्यावर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विवाहिता सासरी नांद होती. नांदत असताना वरील आरोपींनी विवाहितेस शिवीगाळ करून मानसिक त्रास दिला. तसेच माहेरहून घराचे बांधकाम करण्यासाठी ५ लाख रुपये घेवून ये असे म्हणून हुंड्याची मागणी केली. पैसे दिले नीत तर तुला नांदायला घेवून जाणार नाही अशी धमकी दिली. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार सोनार करीत आहेत.

# पोस्ट चौकातील इंडियन बेकरीच्या पाडकामास स्थगिती

- बार्शी नगरपालिकेविरुध्द न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**


बाशी येथील पोस्ट चौकाजवळील व जुन्या रेल्वे लाईन लगतच्या शशिकाला नवगण यांच्या ताब्यातील इंडियन बेकरीच्या बांधकामाच्या पाडापाडीस ड. प्रशांत शेटे यांचेमार्फत केलेल्या दाव्यात बाशीच्या दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधिश सी. एच.यु.यु.यु. पाटील यांनी बाशों नगरपालिकेविरुध्द स्थगितीचे आदेश दि. १८ डिसेंबर रोजी पारीत केले आहेत.

या प्रकरणाची सविस्तर हकिकत अशो को, भवानी पेठ बार्शी येथील रहिवासी असलेल्या श्रीमती शशिकला शिवाजी नवगण या बार्शीतील पोस्ट चौकाजवळील तथा रेल्वे लाईनच्या लगत सिं.स.नंबर ३८५९९ पेको जागेत इंडियन बेकरी नामक व्यवसाय चालवित असून त्यावरच त्यांची व कुटुबाची उपजिविका चालते. श्रीमती शशिकला यांचे मयत पती शिवाजी नवगण हयात होते. तेव्हापासून मागील ७० वर्षापासून सदर जागेचा उपभोग व वहिवाट करीत आलेले आहेत. त्यांचे नावे शॉप क्ट परवाना असुन लाईट मीटरही आहे.जागेच्या उत्ता-यावर भोगवटादार म्हणून नोंदही आहे. सदर जागेत नवगण यांची कायदेशीर कब्जे वहिवाट असताना त्रयस्थ इसमांनी सदर जागेबाबत मुख्याधिकारी, बार्शी नगरपालिका यांना दिलेल्या तक्रारीवरुन नगरपालिकेने सदर जागेतील बांधकाम पाडुन जमिनदोस्त करण्याच्या हालचली सुरु केल्या होत्या. त्यास सागर, नवगण यांनी दि. २० जून २४ रोजी हरकती अर्ज दिला होता. त्यास नगरपालिकेने १५ दिवसांत कारवाई करणार असल्याचे उत्तर दिले. नाईलाजाने उपजिविकेचे साधन वाचविण्यासाठी श्रीमती नवगण यांनी बार्शी येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात निरंतर ताकिदीसाठी नियमित दिवाणी दावा मुख्याधिकारी, बाशी नगरपालिका यांचे विरुध्द दाखल केला. सदर दाव्यास बार्शी नगरपालिकेतर्फे उत्तर देण्यास येऊन कैफियत व म्हणणे दाखल करण्यात आले. तुर्तातुर्त ताकिदीवरील अर्जाचे सुनावणी वेळी दाव्यातील वादी श्रीमती नवगण यांचे तर्फे ॲड. प्रशांत शेटे यांनी असा युक्तीवाद केला की, 'शशिकला नवगण या विधवा महिला आहेत. दावा जागा पाडली गेल्यास महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकांचे उल्लघन होणार आहे.

कारण सदर जागा सन २००० चे पूर्वीपासून वादीचे कब्जेत आहे. सदर जागा सरकारी असून तो बाशी नगरपालिकेच्या मुळीच मालकीची नाही. वादी नगरपालिका कर नियमित भरते, ती अतिक्रमणधारक अथवा अनथोराईज्ड भोगवटादार नाही. त्यामुळे प्रतिवादी नगरपालिकेस सदर जागेबाबत बेकायदेशीर कारवाई करता येणार नाही.' वादीतर्फे झालेला युक्तीवाद मान्य करुन दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आदेश दिला.

**असा आहे न्यायालयाचे आदेश**

आदेशात नगरपालिकेने स्वतः अथवा इतरांमार्फत अगर त्यांचे नोकर, कर्मचारी, अधिकारी, एजंट वा अन्य यंत्रणेमार्फत वादीचे दावा जागेतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कोणतेही गैरकृत्य करु नये, दावा जागा अतिक्रमीत ठरवून दावा जागेची पाडापाड करुन वादीस बेघर करु नये, असा तुर्तातुर्त ताकिदीचा आदेश न्यायालयाने दिला.



# सोरेगावजवळ वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**

सोलापूर ते विजयपूर महामार्गावरील सोरेगावजवळील कॅनॉलजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील तरूण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात १८ डिसेंबर रोजी रात्री साडेआकाराच्या सुमारास झाला. आकाश अपण्णा जाधव (वय २६, रा. सोरेगाव, विजयपूर रोड,) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. १८ डिसेंबर रोजी मध्यरात्री साडेआकराच्या सुमारास आकाश जाधव हा सैफुल ते सोरेगाव रस्त्याने महामार्गावरून घराकडे जात होता. त्यावेळी सोरेगाव येथील कॅनॉलच्या पुढे वाहनाने जाधवच्या दुचाकीस जोरदार धडक दिली.


## जाहीर प्रकटीकरण

दि. कि. अर्ज नं. ७८/२०२४ नि.नं. ५
पुढील नेमलेली तारीख ०४/०१/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. सो. यांचे कोर्टात (मा. जी.एस. पाटील सो.)**

१) **राजेसाहेब केशवराव पाटील,** वय ८६ वर्षे, धंदा- शेती, रा. भोयरे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सौ. कौशल्या राजेसाहेब पाटील,** वय ८६ वर्षे, धंदा- शेती, रा. भोयरे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणीही नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा कै. युवराज राजेसाहेब पाटील हे दिनांक ३०/०७/२०१४ रोजी मयत झालेले असून यातील अर्जदार ही त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. मयत कै. युवराज राजेसाहेब पाटील यांना अर्जदार यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर व जवळचे वारस नाहीत. तसेच यातील अर्जदार यांना त्यांचे मुलांचे पश्चात शासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्याबाबत शासकीय अधिकारी यांनी अर्जदार यांना कै. युवराज राजेसाहेब पाटील यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले. त्या कारणाने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत कै. युवराज राजेसाहेब पाटील यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क, हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रकटीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली तारीख ०४/०१/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे, हे जाहीर प्रकटीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे.
तारीख : ०६/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**अर्ज मृत्यू नोंद करणेबाबत**
**क्रि. कि. अर्ज नं. ३८८/२०२३**
पुढील नेमलेली तारीख ३०/०१/२०२५

**बार्शी येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग- १ साहेब यांचे कोर्टात**

**श्री. प्रशांत संदीपान मोरे,** वय ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पानगाव,** ता. बार्शी, जि. सोलापूर — **सा.वाला**

**अर्ज रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अँड डेथ ॲक्ट १९६९ चे कलम १३ (३) अन्वये**

ज्याअर्थी यातील अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असून अर्जदाराचे वडील संदीपान काशिनाथ मोरे यांचा मृत्यू तारीख १०/११/२०२० रोजी पानगाव येथे अर्जदाराच्या राहते घरी झालेला होता व आहे. त्यानंतर अर्जदाराच्या वडिलांची मृत्यूची नोंद रीतसर सा.वाला पानगाव ग्रामपंचायत पानगाव कार्यालयात जन्म-मृत्यू रजिस्टरला करावी. परंतु अर्जदार व त्यांचे कुटुंबातील व्यक्तीचे दुर्लक्ष व निष्काळजीपणामुळे सदर नोंद संबंधित पानगाव ग्रामपंचायत यांचे जन्म-मृत्यू रजिस्टरला झालेली नाही. त्यामुळे अर्जदारांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद संबंधित सा.वाला यांना मे. कोर्टाचे आदेश व्हावेत असे कथन करुन अर्जदाराने हल्लीचा अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास संबंधितांनी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेल्या ता. ३०/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होऊन आपले तक्रारी हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : १९/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

सही/-
**सहा. अधीक्षक**
फौजदारी न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीरनामा / जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २८/२०२४

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात**

**सौ. साधना कृष्णात सुतार (लग्नानंतरचे नाव)**
**मंगल मल्लिकार्जुन पांचाळ ऊर्फ सुतार (लग्नापुर्वीचे नाव)**
वय ५४ वर्षे, धंदा घरकाम,
रा. काळम्मा मंदीर जवळ,
मु.पो. जेऊर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील यातील अर्जदार यांचे जनक पिता मल्लिकार्जुन सिद्राम पांचाळ ऊर्फ सुतार यांचे दि. १९/०७/२०२४ रोजी अक्कलकोट येथे निधन झालेले आहे. तसेच अर्जदार यांची जनक आई रुक्मीणीबाई मल्लिकार्जुन पांचाळ ऊर्फ सुतार यांचेही दि. २१/०२/२०१५ रोजी निधन झाले तसेच मयताचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार असून सदर मयत मल्लिकार्जुन सिद्राम पांचाळ ऊर्फ सुतार यांचे नांव डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ उपविभाग क्र. ७ सोलापूर यांचे गट नं. ७०८/१ अक्कलकोट येथील विकसित भुखंड योजनामधील अल्प उत्पन्न गटातील भुखंड क्र. एल-३२ यांसी एकूण क्षेत्र १०३.१२५ चौ.मी. इतके असून जा.क्र/पु.मं./मि.व्य./२१५५/२०१४ दि. २१/०७/२०१४ रोजीचे आदेशाप्रमाणे मिळकत. तसेच ब) बँक ऑफ इंडिया शाखा अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापूर या बँकेतील खाते नं. ०७३८१०१०००१४६३८ मधील शिल्लक रक्कम. क) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा डाळिंब ता. उमरगा, जि. धाराशिव या बँकेतील खाते नं. ६२४७९३०७६२८ मधील शिल्लक रक्कम. ड) वाहन क्र. MH-13CS 4653 टाटा मोटर्स लिमिटेड या कंपनीचे मॉडेल- TATA BOLT XE QJET 75PSB54 चेसी नं.- MAT611601HLB01452 इंजन नं.- 100A2000-0671289 हे वाहन

सदर मिळकत, खात्यात जमा असलेले रक्कम तसेच वाहनासाठी वारसदार सदरी अर्जदार यांचे नांव नोंद होणेकरीता अर्जदारांनी वारस प्रमाणपत्रसाठी मे. कोर्टात अर्ज केलेले आहे. त्याअर्थी जर कोणास अर्जदार यांचे नांवाने वारस प्रमाणपत्र घेण्यासंबंधी काही म्हणणे हरकत असल्यास यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अथवा नेमलेली ता.२०/०१/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नांवाने वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही काहीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. ही जाहीरनामा / जाहीर प्रसिध्दीकरण सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे. ही जाहीरनामा / जाहीर प्रसिध्दीकरण दिली.
दि. १७/१२/२०२४

सही/-
**लिपिक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, अक्कलकोट**

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २० डिसेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ईव्हीएमवरून विरोधकांची खरडपट्टी

## अतिरिक्त ७४ लाख मतांचे मुख्यमंत्र्यांनी मांडले गणित ● फडणवीसांच्या टोलेबाजीने विरोधक निरुत्तर

◆ **नागपूर, १९ डिसेंबर**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाल्याने महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. निवडणुकीचा निकाल लागल्यापासून विरोधकांकडून अतिरिक्त ७४ लाख मतांवरून विविध आरोप करण्यात आले. इतकेच नव्हे तर, ईव्हीएमविरोधात आंदोलन सुरू करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आरोपांना दिलेल्या उत्तराने विरोधक निरुत्तर झाले. अतिरिक्त ७४ लाख मते कुठून आली, याचा हिशेबच मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितला.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी २० नोव्हेंबर रोजी झालेल्या मतदानाची आकडेवारी वाचून दाखवली. अतिरिक्त मते कुठून आली नाहीत, तर आम्हाला जनतेने निवडून दिले आहे. विरोधक नेहमीच म्हणतात की, अतिरिक्त ७४ लाख मते आली कुठून? ते आता सांगतो. निवडणूक आयोगाने विरोधकांना १० वेळा सांगूनही त्यांच्या कानात जात नाही. तुमच्या कानात नाही गेले तरी चालेल, पण तुमच्या फेक नॅरेटिव्हला लोकसभेनंतर आम्ही उद्ध्वस्त केले. आता तुम्ही पुन्हा फेक नॅरेटिव्ह फॅक्टरी सुरू केली आहे. ती उद्ध्वस्त करण्याकरिता मी उभा आहे, असा आत्मविश्वास त्यांनी विरोधकांसमोर दाखविला.

मतदानाची आकडेवारी सांगताना ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत ९ कोटी ७० लाख २५ हजार १९१ मतदार आहेत. त्यापैकी ६ कोटी ४० लाख ८८ हजार १९५ मतदारांनी मतदान केले. म्हणजे ६६.०५ टक्के मतदान झाले. सकाळी ७ ते ९ या वेळेत ६.६१ टक्के म्हणजे ६४ लाख १३ हजार ३६० मतदारांनी मतदान केले. सकाळी ९ ते ११ या वेळेत ११.५३ टक्के म्हणजेच १ कोटी ११ लाख ८६ हजार ९९६ मतदारांनी मतदान केले. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत १४ टक्के मतदान झाले म्हणजे १ कोटी ३६ लाख २२ हजार ३२७ मतदारांनी मतदान केले. दुपारी १ ते ३ या वेळेत १३.३५ टक्के मतदान झाले. म्हणजेच १ कोटी २९ लाख ५२ हजार ८५३, दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत १२.६९ टक्के म्हणजे १ कोटी २३ लाख १२ हजार ४८८ मतदारांनी



मतदान केल्याची आकडेवारी मुख्यमंत्र्यांनी सभागृहात मांडली.

सायंकाळी ६ वाजतापूर्वी जे मतदार रांगेत असतात, त्या सर्वांना आत घेऊन मतदान करू दिले जाते. त्यामुळे अनेक ठिकाणी रात्री ८ वाजेपर्यंत मतदान सुरू राहते. त्यामुळे यंदा या वेळेत ७५ लाख ९७ हजार ६७ जणांनी मतदान केले. महाराष्ट्रात १ लाख बूथ आहेत. या बूथवर सरासरी ७५ लोकांनी मतदान केले आहे. निवडणूक आयोग ५ वाजेपर्यंतची आकडेवारी जाहीर करतो. त्यानंतरची आकडेवारी आयोगाकडून दुसऱ्या दिवशी जाहीर केली जाते. हे आजपर्यंतच्या प्रत्येक निवडणुकीत झाले आहे. त्यामुळे ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर अंतिम आकडेवारी आली ती ६६ टक्के होती. सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत ७.८३ टक्के मतदान झाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### तासाला सरासरी ६० लाख मतदान झाले

तसे पाहिले तर, सरासरी प्रत्येक तासाला ५.८३ टक्के मतदान झाले आहे. म्हणजेच, सरासरी तासाला ६० लाख मतदान झाले आहे. प्रतिमिनिट मतदान ९८ हजार आहे. एकूण मतदानाचा विचार केला, तर सायंकाळी ६ वाजेनंतर १७ लाख मतदान झाले आह. ५ ते ६ या वेळेतील मतदान गृहीत न धरता रोज ७५ लाख मते कुठून आली, हा प्रश्न विचारला तर, त्याचे उत्तर मिळणार नाही. कारण, ही मते कुठूनच आलेली नाहीत, जनतेने मतदान केंद्रांवर जाऊन मतदान केले आणि आम्हाला निवडून आणले. त्यामुळे अशा प्रकारचा फेक नॅरेटिव्ह पसरवू नका, असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

# कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने रद्द करावे

## अजित पवार यांची गोयल यांच्याकडे पत्राद्वारे मागणी

**नागपूर, १९ डिसेंबर**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेले २० टक्के शुल्क तातडीने रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांना पत्र लिहून केली आहे.

श्रीलंका सरकारने कांद्यावरील आयातशुल्क २० टक्क्यांनी कमी करून अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरू केले असल्याने नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा, कांद्याला खर्चावर आधारित चांगला दर मिळावा यासाठी केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने रद्द करणे आवश्यक असल्याचे अजित पवार यांनी गोयल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. राज्यातील आमदार नितीन पवार, दिलीपराव बनकर, हिरामण खोसकर, सरोजताई अहिरे आदी लोकप्रतिनिधींनी अजित पवार यांना पत्र लिहून याप्रश्नी लक्ष घालून तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली होती.



या मागणीची दखल घेत पवार यांनी गोयल यांना पत्र लिहिले. पत्रात पवार म्हणतात की, राज्यात विशेषकरून नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. या शेतकऱ्यांकडून परदेशात मोठ्या प्रमाणावर कांदा निर्यात केला जाते. आजमितीस उन्हाळी कांदा संपलेला असून, नवीन लाल कांदा मोठ्या प्रमाणावर बाजारात विक्रीसाठी आला आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक संकटाशी लढत कांद्याचे उत्पादन घेतले आहे. अवेळी पाऊस व बदलत्या हवामानानुसार त्यांच्या कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उर्वरित चांगल्या कांद्यास खर्चावर आधारित चांगला भाव मिळणे गरजेचे असताना बाजारभावात दिवसेंदिवस घसरण होत आहे. सद्यस्थितीत राज्यातील लाल कांद्याला प्रति क्विंटल सरासरी २४०० रुपये अत्यल्प दर मिळत आहे. लाल कांदा टिकाऊ नसल्याने शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना तत्काळ विक्री करावा लागत आहे. या पृष्ठभूमीवर शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव मिळण्यासाठी राज्यात उत्पादित लाल कांद्याची परदेशात जास्तीत जास्त निर्यात होणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्राने निर्यात शुल्क हटविणे गरजेचे आहे.

# ‘...उस दियेसे पुछना, मेरा पता मिल जाएगा!’

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची विधानसभेत जोरदार फटकेबाजी

◆ **मुंबई, १९ डिसेंबर**

गेल्या पाच वर्षांत मला आणि माझ्या कुटुंबाला वैयक्तिक टार्गेट करण्यात आले. माझ्या चारही बाजूंनी चक्रव्यूह तयार करण्याचा प्रयत्न झाला. पण, आधीच सांगितल्याप्रमाणे मी आधुनिक अभिमन्यू आहे., मला चक्रव्युह भेदता येतो आणि हा चक्रव्यूह भेदून आज मी या ठिकाणी उभा आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘‘आंधीयो में भी वो जलता हुआ मिल जाएगा, उस दिये से पुछना मेरा पता मिल जाएगा...’’ या शायरीतून विरोधकांना चिमटा काढला.

राज्यपालांच्या अभिभाषणावर उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.ते म्हणाले, गेली पाच वर्षे संक्रमणाची होती. या प्रकारे आरोप-प्रत्यारोप करण्यात आले, तसे आजवरच्या महाराष्ट्राच्या संस्कृतीत कोणी अनुभवले नव्हते. २०१९ ते २०२४ या काळात मला आणि माझ्या कुटुंबाला टार्गेट करण्यात आले, हा महाराष्ट्रातला एक रेकॉर्डच आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ठराविक पाच-सात लोकं मला सातत्याने टार्गेट करीत होते, त्यांनी जे वातावरण खराब केले, त्यामुळेच महाराष्ट्राच्या जनतेत माझ्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली.

माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात पाच वर्षे महाराष्ट्राच्या जनतेने माझे काम बघितले होते. या काळात जाती-धर्माचा विचार न करता, ‘सर्वजन् हिताय् सर्वजन् सुखाय्’ हेच मी केले होते. त्यामुळे जात जेवढी राजकारण्यांमध्ये आहे, तेवढी महाराष्ट्राच्या जनतेत नाही. ज्यांनी धृवीकरण करण्याचा प्रयत्न केला, ते सगळे प्रयत्न ध्वस्त झाले. समाज एकसंध झाला आणि सगळ्यांनी एकदिलाने महायुतीला मतदान केले. गेल्या ३० वर्षांच्या इतिहासात कधीही कोणालाही ५० टक्के मते मिळाली नव्हती, ती यावेळी जनतेनी महायुतीला दिली.

आज महाराष्ट्रातील तमाम जनतेला आश्वस्त करतो की, ज्या योजना आम्ही सुरू केल्या, शेतकरी, युवा, ज्येष्ठ, वंचितांच्या संदर्भात दिलेली आश्वासने पूर्णत्वास नेऊ. एकही योजना बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी आमच्यावर भरभरून प्रेम दाखवले, त्यांच्या खात्यात डिसेंबरचा हप्ता आम्ही हे अधिवेशन संपल्याबरोबर टाकल्या जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सकाळी रेशीमबाग स्मृती परिसरात जाऊन हेडगेवार स्मृती स्थळाचे दर्शन घेतले

# जगातील पहिली अणुऊर्जा बॅटरी तयार

### हजारो वर्षे चार्जिंगची गरज नाही

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

सध्या मोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इलेक्ट्रिक वाहनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या बॅटरीचा वापर केला जात आहे. परंतू, या बॅटरी खर्चिक आणि अल्पायुषी आहेत तसेच त्या लवकर संपत असल्याने वारंवार चार्ज कराव्या लागतात. या बॅटरीमध्ये संशोधन होत आहे.

जास्त लाईफ देणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थांपासून या बॅटऱ्या बनविण्यात येत आहेत. अशातच संशोधकांनी जगातील पहिली न्युक्लिअर पॉवर बॅटरी तयार केली आहे. एका चार्जची लाईफ पाहिली, तर शेकडो पिढ्यांना ती ऊर्जा देणार आहे.

ब्रिटनच्या युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टलच्या संशोधकांनी ही बॅटरी विकसित केली. या बॅटरीत कार्बन-१४ नावाचा रेडिओॲक्टिव्ह पदार्थ वापरण्यात आला आहे. याचे निम्मे आयुष्य ५,७३० वर्षे एवढे प्रचंड आहे. ही बॅटरी डायमंड आधारित संरचनेमध्ये कार्बन १४ जोडून वीज उत्पन्न सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, या बॅटरीला अन्य बॅटरींप्रमाणे मेन्टेनन्सची किंवा अन्य कोणत्या प्रक्रियेची गरज नाही. रेडिओॲक्टिव्ह प्रक्रियेवेळी वेगवान इलेक्ट्रॉनला ऊर्जेमध्ये परिवर्तित केले जाते. डायमंड रचना किरणोत्सर्गी किरणे पकडते व ऊर्जा निर्माण करते. सोलर सेल्समध्ये जसे फोटॉन्सना विजेत रुपांतरीत केले जाते, अगदी तशीच ही प्रक्रिया आहे.

ही अणुऊर्जा असली, तरी ती घातक नाही. कार्बन-१४ कमी-श्रेणीचे किरणोत्सर्ग उत्सर्जित करतो. यामुळे ते डायमंड संरचनेतच राहतात. यामुळे ही बॅटरी व्यावहारिक वापरासाठी उपयुक्त असल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. ब्रिस्टल विद्यापीठातील ऊर्जा सामग्री तज्ज्ञ प्रोफेसर नील फॉक्स यांच्यानुसार हिरा हा जगातील सर्वांत कठीण पदार्थ आहे, त्याच्याएवढे कोणीच संरक्षण देऊ शकत नाही. ◂(वृत्तसंस्था)

# सायबर पोर्टलने वाचवले ३,४३१ कोटी रुपये

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

राष्ट्रीय सायबर गुन्हे रिपोर्टिंग पोर्टलने ९.९४ लाख तक्रारींचे समाधान करीत ३,४३१ कोटी रुपयांहून अधिक पैसे वाचविण्यात मदत केली आहे.

नागरिक वित्तीय सायबर फसवणूक रिपोर्टिंग आणि प्रबंधन प्रणाली सायबर गुन्ह्यांशी संबंधित माहिती कारवाईसाठी राज्यस्तरीय कायदे प्रवर्तन एजन्सीना पाठवते. सायबर क्राईम डॉट जीओव्ही डॉट इन पोर्टलचा उद्देश आर्थिक फसवणुकीचे तत्काळ रिपोर्टिंगला सक्षम बनवणे आणि फसवेगिरीद्वारे पैशांची होणारी हेराफेरी थांबविणे हा आहे. खाद्य आणि ग्राहक विषय संबंधित राज्यमंत्री बी. एल. वर्मा यांनी एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात वित्तीय सायबर गुन्ह्यांच्या निपटाऱ्याप्रकरणी पोर्टलच्या प्रभावशीलतेवर माहिती दिली. गृहमंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पोर्टल आणि त्याच्या टोल फ्री हेल्पलाईन नंबर १९३० च्या प्रचारासाठी मार्गदर्शिका जारी केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### २१० पैकी १५८ तक्रारींचा निपटारा

लोकपालने २०२४-२५ दरम्यान २१० तक्रारी नोंदवल्या, अशी माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली. ३० नोव्हेंबरपर्यंत लोकपालांकडे २०० हून अधिक तक्रारी नोंदविण्यात आल्या. केंद्रीय कार्मिक राज्यमंत्री जितेंद्रसिंह यांनी एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितले की, २१० तक्रारींपैकी १५८ चा निपटारा करण्यात आला. २०२३-२४ या आर्थिक वर्षात लोकपालांकडे एकूण १६६ तक्रारी नोंदविण्यात आल्या, ज्यापैकी १५६ तक्रारींचा निपटारा करण्यात आला.



सध्या राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरू आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने विधानसभा आणि विधान परिषदेच्या सर्व सदस्यांनी एकत्रित येत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार, विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यासोबत छायाचित्रासाठी विधानभवनाच्या समोर अशी पोज दिली.

# भाजपा सदस्यांनी माझ्याशी केली धक्काबुक्की : राहुल गांधी

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

मी काँग्रेसच्या खासदारांसह संसदभवनात जात असताना भाजपा खासदारांनी माझा रस्ता अडवला, त्यांनी माझ्याशी धक्काबुक्की केली. एवढेच नाही तर, मला धमकीही दिली, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला.

भाजपा खासदारांनी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनाही धक्काबुक्की केली. संसदेत जायचा माझा अधिकार आहे; मात्र भाजपा खासदारांनी मला रोखण्याचा प्रयत्न केला, धक्काबुक्की केली. भाजपा खासदारांच्या अशा धक्काबुक्कीला मी घाबरत नाही, संसदेत जाण्यापासून मला कोणी रोखू शकत नाही. प्रवेशद्वारासमोर नेमके काय झाले, ते तिथे लावलेल्या कॅमेऱ्यात टिपले गेले आहे, असे राहुल गांधी म्हणाले. भाजपा खासदारांनी केलेल्या धक्काबुक्कीत माझ्या गुडघ्याला मार लागल्याचा आरोप राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी केला.

**खडगे यांची पत्रातून बिर्ला यांच्याकडे तक्रार**

खडगे यांनी याबाबतची तक्रार एका पत्रातून लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याकडे केली. इंडिया आघाडीच्या खासदारांसोबत संसदभवनाच्या प्रवेशद्वारासमोर येत असताना भाजपा खासदारांनी आमच्याशी धक्काबुक्की केली, यामुळे माझा तोल गेला आणि मी खाली बसलो. यात माझ्या गुडघ्याला दुखापत झाली, माझ्या गुडघ्यावर आधीच एक शस्त्रक्रिया झाली आहे, असे खडगे यांनी म्हटले.

**काँग्रेस खासदारांचीही तक्रार**

काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल, के. सुरेश आणि मणिकम टोगोर यांनी भाजपा खासदारांच्या वर्तणुकीची ओम बिर्ला यांच्याकडे तक्रार केली. संपूर्ण घटनाक्रम विशद करताना या नेत्यांनी पत्रात म्हटले की, आम्ही मकरद्वारातून संसदभवनात जात असताना भाजपा खासदारांनी आमचा रस्ता अडवला, आत जाण्यापासून आम्हाला रोखले. भाजपाच्या तीन खासदारांनी राहुल गांधी यांच्याशी गैरवर्तणुकही केली. ◂(तभा वृत्तसेवा)

### राहुल गांधी गुंडागर्दीवर उतरले, भाजपाचा आरोप

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज संसदभवनात भाजपा खासदारांना केलेल्या धक्काबुक्कीचा सर्वस्तरावरून निषेध केला जात आहे. राहुल गांधी आणि काँग्रेस आता गुंडागर्दीवर उतरली असल्याचा आरोप भाजपाच्या केंद्रीय मंत्र्यांनी केला.

या धक्काबुक्कीची आणि त्यात भाजपाचे दोन खासदार जखमी झाल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यात आली. मोदी यांनी जखमी भाजपा खासदार मुकेश राजपूत यांच्याशी मोबाईलवर संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

राहुल गांधी भाजपा सदस्यांना धक्काबुक्की करीत संसदभवनात शिरले, यावेळी त्यांनी केलेल्या धक्काबुक्कीत तीन-चार भाजपा खासदार खाली पडले, भाजपाचे प्रतापचंद्र सारंगी आणि मुकेश राजपूत गंभीर जखमी झाले, असा आरोप केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केला. संसदीय इतिहासातील आजचा दिवस काळा असून, आज संसदभवनात काँग्रेस पक्षाने सर्व मर्यादा ओलांडल्याचा आरोप भाजपातर्फे करण्यात आला.

### राहुल यांच्या गैरवर्तणुकीची फांगनोन कोन्याक यांची तक्रार

भाजपाच्या नागालॅण्डमधील खासदार फांगनोन कोन्याक यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर गैरवर्तणुकीचे आरोप केले. त्यांनी याबाबतची लेखी तक्रार राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याकडे केली. भाजपा खासदारांसोबत संसदभवन परिसरात मी निदर्शने करीत असताना राहुल गांधी माझ्याजवळ येऊन उभे झाले, त्यामुळे मी अस्वस्थ झाले. राहुल गांधी माझ्यावर ओरडत होते, एका महिलेशी असे वागणे, तिच्यावर ओरडणे त्यांना शोभले नाही, यामुळे मी अतिशय व्यथित झाले, असे फांगनोन यांनी आपल्या तक्रारीत म्हटले.

याबाबतची तक्रार मी धनकड यांची भेट घेऊन केली आहे. मला संरक्षण द्यावे, अशी मागणीही केली. या घटनेने मी अतिशय दु:खी झाले, असे त्या म्हणाल्या. कोन्याक यांनी दुपारी २ वाजता राज्यसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतरही सभागृहात या घटनेचा तपशील सादर केला.

भाजपा खासदार कोन्याक माझ्याजवळ रडतच आल्या, त्यांनी जे घडले, त्याची माहिती मला दिली, यामुळे मलाही धक्का बसला. या घटनेची गंभीर दखल मी घेतली, असे धनकड म्हणाले.

# मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान मोदी यांना आमंत्रण

### शरद पवार यांनी दिली माहिती

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

२१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी राजधानी दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत असून, या संमेलनाच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रण देण्यात आले असल्याचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी आज सांगितले.

६ जनपथ या आपल्या निवासस्थानी आयोजित पत्रपरिषदेत शरद पवार म्हणाले की, पंतप्रधान मोदी उद्घाटन समारंभाला येतील, अशी खात्री आहे. त्यांच्या कार्यालयाकडून वेळेबाबतची विचारणा करण्यात आली असून, येत्या एक-दोन दिवसांत त्यांच्या कार्यालयाकडून पंतप्रधानाच्या येण्याबाबत दुजोरा मिळणार आहे. पंतप्रधान येणार असतील ,तर संमोलनाच्या उद्घाटनाचा मुख्य कार्यक्रम विज्ञान भवनात होईल.

यावेळच्या संमेलनाच्या अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक तारा भवाळकर आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या संमेलनाचे निमंत्रण देण्यात आले असून, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनाही या संमेलनासाठी आमंत्रित केले जाणार आहे, असे पवार म्हणाले. या साहित्य संमेलनासाठी ५ हजार प्रतिनिधी येतील, अशी अपेक्षा आहे, यापैकी अडीच हजार प्रतिनिधी महाराष्ट्रातील तर उर्वरित अडीच हजार प्रतिनिधी देशाच्या अन्य प्रांतातील राहणार आहे. पाकिस्तानच्या कराचीतूनही मराठी लोकांनी संमेलनासाठी येण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मात्र, त्यासाठी आम्हाला केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागेल. कराचीत १ हजार मराठी भाषिक असून, क्रिकेट नियामक मंडळाचा अध्यक्ष असताना कराचीत मला अनेक मराठी भाषक भेटत होते, असे पवार म्हणाले. ७१ वर्षांपूर्वी दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्याचे उद्घाटन केले होते, याकडे पवार यांनी लक्ष वेधले. संमेलन तालकटोरा स्टेडियममध्ये होणार असून, संमेलनस्थळाला छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात येणार आहे, असे पवार म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

## अग्रलेख...

# काँग्रेस व विरोधकांनी थयथयाट करू नये

देशात लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी व्हाव्यात, या दृष्टीने लोकसभेत विधेयक सादर करण्यात आले. यावर व्यापक चर्चा व्हावी, या हेतूने हे विधेयक व्यापक चर्चेसाठी तसेच सहमती तयार करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा घेण्यात आलेला निर्णय अभिनंदनीय आहे. देशात सर्व निवडणुका एकाच वेळी व्हाव्यात, याबाबत भारतीय जनता पार्टीने गांभीर्याने विचार सुरू केला होताच; शिवाय त्या दृष्टीने वेगाने पावलेदेखील टाकली, ही आनंदाची बाब होय. त्याचप्रमाणे या विचाराला देशातील सामान्य जनतेचाही पाठिंबा आहे. काही राजकीय पक्षांचा मात्र याला विरोध असल्याचे दिसत आहे. यात सगळ्यात जुना पक्ष काँग्रेसही समाविष्ट आहे. काँग्रेसला एक अनामिक भीती वाटते आहे. एकाच वेळी निवडणुका झाल्यात, तर त्याचा लाभ भारतीय जनता पार्टीलाच होईल, ही काँग्रेसला वाटत असलेली भीती आहे. पण, ही भीती व्यर्थ आहे. एकाच वेळी निवडणुका घेण्याचा फटका एखाद्या राज्यात वा अनेक राज्यांत भाजपालाही बसू शकतो. वेगवेगळ्या निवडणुका झाल्यास जसा फायदा भाजपाला होईल; त्याउलट एकाच वेळी झाल्यास तोटाही संभवतो. त्यामुळे काँग्रेसने केवळ भाजपाच्या भीतीने एकत्र निवडणुका घेण्यास विरोध करणे संयुक्तिक ठरणार नाही. एकत्र निवडणुका घेण्यास अनेक राजकीय विद्वान विरोध करीत आहेत. अखेर त्यांच्या विरोधाचे कारण तरी काय? त्यांना कसली भीती सतावत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ अशा सलग चार वेळा देशात लोकसभेसोबतच राज्य विधानसभांच्याही निवडणुका झाल्या आहेत. त्यामुळे एकत्र निवडणुका घेण्याचा आता जो विचार केला जात आहे, तो लोकशाहीला वा संघराज्य प्रणालीला धोका आहे, असे समजण्याचे काही कारण नाही. शिवाय, एकत्र निवडणुका घेण्याचा हा काही क्रांतिकारक विचार नाही. गतकाळात जे शक्य झाले, तेच आताच्या काळात घडवून आणण्याचा सध्याच्या सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे. १९६७ साली चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान, पंजाब, पश्चिम बंगाल, ओडिशा, तामिळनाडू आणि केरळ या आठ राज्यांमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले नाही. त्यामुळे या आठ राज्यांमध्ये गैरकाँग्रेसी आघाडी सरकारे स्थापन झाली. तसे पाहिले तर, हे भारतीय लोकशाहीचे एक नवे स्वरूप होते. त्यामुळे काँग्रेसने घाबरण्याचे काही कारण नाही. जे त्यावेळी काँग्रेसच्या बाबतीत झाले, ते आता भाजपाच्याही बाबतीत होऊ शकते. भाजपालाच फायदा होईल, ही भीती काँग्रेसने बाळगणे आणि एकत्र निवडणुका घेण्यास विरोध करणे, याचा अर्थ लढाईपूर्वीच शस्त्र खाली टाकणे असा होतो. खरे तर १९६७ च्या निकालांनी विविध राज्यात गैरकाँग्रेसी राजकीय पक्षांना जागा करून दिली होती आणि ते लोकशाही जिवंत असल्याचे लक्षणही होते. त्यामुळे देशात प्रतिस्पर्धात्मक संघवादही सुरू झाला. केंद्रात काँग्रेसचे आणि राज्यांमध्ये गैरकाँग्रेसी सरकारे असली म्हणून देशाच्या सुरक्षेला कुठला धोका उत्पन्न होत नाही की देशाच्या प्रगतीलाही खीळ बसते, असे झाले नाही. पण, दुर्दैव असे की, आघाडीत जे घटक पक्ष सहभागी झाले होते, त्यांच्यात आपसात समन्वय न राहिल्याने ही गैरकाँग्रेसी सरकारं अस्थिरतेचे बळी ठरली. परिणाम असा झाला की, देशात मध्यावधी निवडणुकांचे सत्र सुरू झाले आणि मग लोकसभेची निवडणूक वेगळी आणि विविध राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुका वेगळ्या व्हायला लागल्या. तसे पाहिले तर, १९५२ साली जेव्हा देशात पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या, तेव्हा तर आजच्यासारख्या आधुनिक सुविधा नव्हत्या, आजच्यासारखी आधुनिक उपकरणे नव्हती, संसाधनांचा अभाव होता. तरीही निवडणुका यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्या. असे असताना एकत्र निवडणुका घेण्याच्या व्यावहारिकतेवर प्रश्न उपस्थित करण्याचे तसे काहीच कारण नाही. आज तर निवडणूक आयोगाकडे भरपूर अनुभव आहे. संसाधनांची कमतरता नाही, तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे. त्यामुळे एकत्र निवडणुका घेताना कुठल्याही अडचणी येतील, असे वाटत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून आता ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ७६ वर्षांत मतदार हा परिपक्व झाला आहे. विवेकाचा वापर करून तो मतदान करू लागला आहे. त्याच्या विवेकावर आणि परिपक्वतेवर काँग्रेसला विश्वास नसावा कदाचित. म्हणूनच काँग्रेसला एकत्र निवडणुका घेतल्यास त्याचा फायदा भाजपाला होईल, अशी भीती वाटते. एक मात्र खरे की, एखाद्या राज्यात आघाडीचे सरकार आले आणि ते मध्येच कोसळले तर तिथे मध्यावधी निवडणूक घ्यावी लागेल. अशी परिस्थिती अनेक राज्यांत उद्‌भवू शकते. या बाबीचा विचार करून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची आवश्यकता आहे. समजा आता एकत्र निवडणुका झाल्यात, तर त्या भविष्यातही एकत्रच झाल्या पाहिजेत, या दृष्टीने आताच ठोस विचार करून उपाय करून ठेवणे आवश्यक आहे. समजा अशी परिस्थिती उद्‌भवली की, पंतप्रधान वा राज्याच्या मुख्यमंत्र्याने राजीनामा दिला वा विरोधकांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव पारित झाला आणि लोकसभा वा विधानसभा विसर्जित करण्याचा सल्ला देण्यात आला तर काय होईल? एखाद्या राज्यात कलम ३५६ चा वापर करून राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आणि विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस करण्यात आली तर? तर काय, लोकसभा वा विधानसभा बरखास्त करण्याची घटनेतील तरतूदच मध्यावधी निवडणुकीकडे घेऊन जाईल. मग एकत्र निवडणुका घेण्याचा मार्ग अवरुद्ध होईल. अशी परिस्थिती उद्‌भवू नये यासाठी आपल्याला राज्यघटनेतील अनुच्छेद ८५(२)ख आणि अनुच्छेद १७४(२)ख यात दुरुस्ती करून 'बरखास्त' या शब्दाऐवजी 'निलंबन' हा शब्द टाकावा लागेल. अशी दुरुस्ती जर करण्यात आली तर राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यपाल विधानसभा बरखास्त करू शकणार नाहीत. ते पुढील व्यवस्था होईपर्यंत सभागृह निलंबित अवस्थेत ठेवतील. विधानसभा निलंबित अवस्थेत ठेवल्याची अनेक उदाहरणे देशात आहेत. जानेवारी २०१० मध्ये जम्मू-काश्मीर, डिसेंबर २०१३ मध्ये दिल्ली आणि जानेवारी २०१६ मध्ये अरुणाचल प्रदेशची विधानसभा निलंबित ठेवण्यात आली होती. लोकसभा वा विधानसभा निलंबित अवस्थेत ठेवण्यात आली असता, जो राजकीय पेच निर्माण झाला आहे, त्यावर विविध पक्ष चर्चा करून तोडगा काढतील आणि नवे सरकार बनविण्याच्या दृष्टीने फॉर्म्युला तयार करतील. विधानसभा निलंबित असल्याने तसा वेळही या पक्षांना मिळेल. आपसात ताळमेळ साधून राजकीय पक्ष समझोता करू शकतील आणि नव्या सरकारची मुहूर्तमेढही रोवू शकतील. असे झाले तर मध्यावधी निवडणुका होणार नाहीत, सरकारचा पैसा खर्च होणार नाही आणि जनतेचा वेळही वाया जाणार नाही. एखाद्या राज्यात ३५६ व्या कलमाचा वापर करून राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा राज्यपालांचा अधिकार घटनेतील दुरुस्तीमुळे मर्यादित येईल, राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या निर्णयामुळे केंद्र आणि राज्य यांच्यात जो वाद उत्पन्न होत होता, तोही होणार नाही. लोकसभा वा विधानसभा बरखास्त करण्याबाबतचा उल्लेख घटनेत ज्या ज्या ठिकाणी आहे, त्या सर्व ठिकाणीही आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्या लागतील. याचा फायदा असा होईल की, लोकसभा वा विधानसभांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होईल. त्या मुदतीपूर्वी बरखास्त होणार नाहीत. असे झाले तर मध्यावधी निवडणुकांचा प्रश्नच उपस्थित होणार नाही. शिवाय, एकत्र निवडणुका घेण्याचा क्रमही चुकणार नाही. ही बाब लक्षात घेतली तर काँग्रेसला वाटत असलेली भीती निरर्थक आहे. काँग्रेसने कारण नसताना देशात संभ्रम निर्माण करू नये. काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी व्यापक देशहित, जनहित लक्षात घेऊन 'एक देश एक निवडणूक' बाबतच्या विधेयकाला पाठिंबा दिला पाहिजे. न दिला तरी मोदी सरकारने ठरविलेले उद्दिष्ट साध्य होणारच आहे, हे निश्चित! त्यामुळे मोदी सरकारचा हेतू प्रामाणिक असल्याने काँग्रेस आणि इतर विरोधकांनी कितीही थयथयाट केला तरी विधेयक पारित होणार आणि देशहित सर्वोपरी ठरणार, यात शंका नाही.

## दखल

# युद्धाचे ढग काही विरेनात...

आरिफ शेख

लेबनॉन आणि इस्रायलमध्ये दीर्घकाळ चाललेल्या तणावानंतर अखेर युद्धविराम झाला. लेबनीज सरकारने या कराराला मान्यता दिली आणि त्याला 'हिजबुल्लाह'सह सर्व लेबनीज गटांची संमती मिळाली. इस्रायलच्या मंत्रिमंडळानेही २६ नोव्हेंबर रोजी या युद्धविरामाला मंजुरी दिली पण युद्धबंदीच्या २४ तासांमध्ये इस्रायल आणि लेबनॉनमधील तणाव पुन्हा वाढला. इस्रायलने २८ नोव्हेंबर रोजी दक्षिण लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह'ने वापरलेल्या लाँचरवर हवाई हल्ला केला. इस्रायलकडून या हल्ल्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. दक्षिण लेबनॉनच्या काही भागात परतण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांवर गोळीबार केल्याचे इस्रायली लष्कराने सांगितले. इस्रायलचे म्हणणे आहे की, हे लोक युद्धविराम कराराचे उल्लंघन करत होते; मात्र याबाबत फारशी माहिती देण्यात आली नाही. माध्यमांनी सांगितले की, या हल्ल्यात दोन नागरिक जखमी झाले तर इस्रायली सैन्याने त्यांचे वर्णन संशयित म्हणून केले. ते युद्धविरामाच्या अटींचे उल्लंघन करत होते. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम लागू झाला. यानंतर लेबनीज आर्मीवर अनेकदा युद्धविराम तोडल्याचा आरोप करण्यात आला. युद्धबंदी किती नाजूक आहे, हे या आरोप-प्रत्यारोपांवरून स्पष्ट होते.

युद्धबंदीनंतर दोन्ही देशांमधील हिंसाचाराची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. लेबनॉनने ऑक्टोबर २०२३ मध्ये हिंसाचार सुरू केला. हमासने गाझामधून हल्ला केल्यानंतर 'हिजबुल्लाह'ने इस्रायलवर रॉकेट, ड्रोन आणि मिसाईल डागण्यास सुरुवात केली. इस्रायलने हवाई हल्ले करून प्रत्युत्तर दिले आणि नंतर सप्टेंबरच्या मध्यात युद्ध मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. गाझामधील युद्ध अजूनही सुरू आहे आणि त्याचा शेवट दृष्टिपथात नाही. लेबनीज आरोग्य अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संघर्षादरम्यान इस्रायली गोळीबारात लेबनॉनमध्ये ३७६० हून अधिक लोक मारले गेले. या लढाईमध्ये इस्रायलमधील ७० हून अधिक लोक मारले गेले. त्यापैकी अर्ध्याहून अधिक नागरिक होते तसेच दक्षिण लेबनॉनमध्ये लढणारे डझनभर इस्रायली सैनिक होते. नेतान्याहू यांनी युद्धबंदीची तीन कारणे दिली आहेत. इराणवर लक्ष केंद्रित करणे, इस्रायली सैन्याला श्वास घेण्यास आणि साठा भरून काढण्यासाठी वेळ देणे आणि हमास-हिजबुल्लाहला वेगळे करणे. म्हणजे युद्धातून एक आघाडी काढून टाकणे. किंबहुना, हमासचा दहशतवादी हल्ला आणि इस्रायलने गाझावर बॉम्बफेक केल्यानंतर अवघ्या काही दिवसांनी 'हिजबुल्लाह'ने आघाडी उघडली होती. याशिवाय इस्रायलवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढत आहे. संयुक्त राष्ट्राने इस्रायलच्या हल्ल्यांना नरसंहार म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने इस्रायलला ताब्यात घेतलेल्या प्रदेशातून माघार घेण्याचे आवाहन केले आहे आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नेतान्याहूविरुद्ध अटक वॉरंट जारी केले आहे; असे असतानाही इस्रायलने गाझामध्ये आपल्या कारवाया सुरूच ठेवल्या आहेत. देशात गृहयुद्धाचे पुनरागमन फारसे दूरचे नाही. लेबनॉनमध्ये विविध गटांमध्ये तणाव आणि संघर्षाची परिस्थिती आहे. 'हिजबुल्लाह' कमकुवत झाली आहे आणि आता लेबनीज राजकारणात आपली ताकद पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू शकते. इस्रायलच्या हल्ल्यापूर्वी लेबनॉनमधील कोणताही गट 'हिजबुल्लाह'ला आव्हान देण्याच्या स्थितीत नव्हता; पण आता परिस्थिती बदलली आहे. 'हिजबुल्लाह'ची लष्करी शक्ती कमकुवत झाली असून त्याचा नेता नसराल्लाह मारला गेला आहे. लेबनॉनमध्ये दोन वर्षांपासून अध्यक्ष नाही. नवीन राष्ट्रपतींची नियुक्ती त्यांच्या मित्रपक्ष असण्याच्या अटीवर केली होती. आता लेबनॉनच्या नेत्यांनी नवीन अध्यक्षाच्या नावावर सहमती दर्शविली पाहिजे, जो नवीन पंतप्रधान आणि सरकार नियुक्त करेल. कमकुवत झालेल्या 'हिजबुल्लाह'सोबत हे कसे घडेल हे पाहणे बाकी आहे.

दरम्यान, रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाने नवे वळण घेतले आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी युक्रेनच्या मित्रराष्ट्रांना एक इशारा दिला आहे. युक्रेनला अण्वस्त्रे मिळाल्यास त्याचे प्रत्युत्तर अत्यंत विनाशकारी असेल, असे रशियाने स्पष्ट केले आहे. पुतिन यांच्या योजनेनुसार लंडन, बर्लिन, पॅरिस आणि रोम यासारख्या युरोपियन राजधान्यांवर हल्ले केले जातील. स्वीडन, फिनलंड, पोलंड आणि नेदरलँड यांसारख्या देशांवरही भयंकर हल्ल्यांची योजना आखण्यात आली आहे. पुतिन यांनी पारंपरिक अण्वस्त्रांच्या पलीकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या शस्त्रांचा उल्लेख केला आहे; ज्यात हायपरसोनिक क्षेपणास्त्रे, गुप्त लढाऊ विमाने, लांब पल्ल्याचे ड्रोन, थर्मल रेडिएशन शस्त्रे यांचा समावेश आहे.

पुतिन यांच्या इशाऱ्यानंतर 'नाटो' देशांमध्ये घबराट पसरली आहे. अमेरिकेने युद्धक्षेत्रात 'मिनिटमॅन-३' क्षेपणास्त्र सक्रिय केले आहे. जर्मनी आणि पोलंडमध्ये संरक्षण यंत्रणा कार्यान्वित होत आहेत. अमेरिकेने आपली अण्वस्त्रे अपग्रेड करण्यासाठी १३८ अब्ज डॉलर (११ लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त बजेट मंजूर केले आहे. अलिकडेच रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला करून त्या देशाचा वीज पुरवठा खंडित केला. या हल्ल्यांमध्ये रशियाने ९१ क्षेपणास्त्रे आणि ९७ ड्रोन्सचा वापर केला. युक्रेनच्या ऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करणाऱ्या या हल्ल्यानंतर १० लाखांहून अधिक लोकांना अंधारात राहणे भाग पडले. रशियाने या हल्ल्याचे वर्णन युक्रेनने अमेरिकन 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्रांच्या वापरास प्रत्युत्तर म्हणून केले आहे. ही बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे लांब पल्ल्याच्या हल्ल्यासाठी सक्षम आहेत. अलिकडेच युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ला करण्यासाठी त्यांचा वापर केला होता. पुतिन यांनी या हल्ल्यांना 'पाश्चात्त्य शस्त्रांचा धोकादायक वापर' म्हटले आणि रशिया जोरदार प्रत्युत्तर देईल असे सांगितले. हल्ल्यापूर्वी पुतिन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, रशिया युक्रेनच्या 'निर्णय केंद्रांवर' आणि कीव्हवर नवीन हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा वापर करण्याचा विचार करू शकतो. रशियाने युक्रेनचे ऊर्जा ग्रीड आणि इंधन साठवण सुविधांवर हल्ला केल्यानंतर काही तासांमध्येच ही धमकी आली आहे. रशियन हल्ल्यांनंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी 'नाटो'चे सरचिटणीस, ब्रिटिश पंतप्रधान स्टार्मर आणि जर्मन चान्सलर ओलाफ स्कोल्झ यांच्यासह अनेक पाश्चात्त्य नेत्यांना मदतीचे आवाहन केले. आमच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर हा केवळ युक्रेनवरील हल्ला नाही तर संपूर्ण जगाच्या शांतता प्रयत्नांवर आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धाचे रूपांतर आता नव्या आणि घातक शस्त्रांच्या शर्यतीत झाले आहे. युक्रेन पाश्चात्त्य शस्त्रांचा वापर करत असल्याचा दावा रशियाने केला आहे.

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# बदल्या, बदलाही होऊ नये!

सरकारी नोकरी लागणे म्हणजे आयुष्यात सर्वात मोठी कमाई किंवा तीर मारल्याचा आनंद नोकरी लागणाऱ्या उमेदवाराला आणि कुटुंबीयांना होतो. त्यामागे सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सातव्या वेतन आयोगातील वेतन! सरकारी सुट्ट्या याशिवाय वाटेल तेव्हा सुटी घेण्याचा अधिकृत परवानाच! सरकारी नोकरी म्हणजे 'सरकारचे जावई' असा शब्दप्रयोग सर्वत्र केला जातो. केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी सामान्य नागरिकांची सारखी भावना आहे. यात स्टेट बँक ऑफ इंडियातील कर्मचारी सर्वात पहिल्या क्रमांकावर आहेत. केंद्र सरकारची रेल्वे, पोस्ट ही खातेही सामान्य नागरिकांना डोकेदुखी ठरते. महाराष्ट्राचा विचार केल्यास जिल्हा परिषदेचे शिक्षक हा काही वर्षांपर्यंत सर्वात सुखी प्राणी होता. मध्यंतरीच्या काळात त्यांनी उपभोगलेले सुख सरकारी यंत्रणेच्या लक्षात आल्याने आता त्यांच्या मागे शिक्षणेत्तर कामं लावण्यात आली. आजही राज्यात अनेक शाळा दोन शिक्षकी आहेत. त्यापैकी एक शिक्षक चार दिवस आणि दुसरा शिक्षक उर्वरित दिवस वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुगावाही लागू न देता अतिशय प्रामाणिकपणे काम करताना दिसून येतात. दहावी-बारावीत 'मेरिट' आलेल्यांपैकी ज्यांना डॉक्टर व्हायचे आहे, ते त्यावेळी समाजसेवा, गरिबांची सेवा करण्यासाठी डॉक्टर होण्याची इच्छा असल्याचे दाबून सांगतात. मात्र, शासकीय ग्रामीण रुग्णालयात जाण्यासाठी डॉक्टर मिळत नाहीत अशी वास्तविकता आहे. वैद्यकीय प्रवेश मिळविण्यापूर्वीचे समाजसेवेची इच्छा, पदवी-पदविका घेताना घेतलेली प्रतिज्ञा शासकीय नोकरीत रुजू होताच हवेत विरलेली असते. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. खेड्यांचा विकास झाला पाहिजे, असे प्रत्येकाला वाटते. परंतु, गावखेड्यात असलेल्या अपुऱ्या सेवा-सुविधा लक्षात घेताना अपवाद वगळता कोणताही शासकीय कर्मचारी नियुक्त केलेल्या गावात राहत नाही. तरीही घरभाडे भत्ता घेतल्याशिवाय राहत नाहीत. याशिवाय खाजगी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या तुलनेत दुप्पट वेतन घेणारे शासकीय कर्मचारी, अधिकारी (पोलिस सोडून) कुठल्या ना कुठल्या मागणीसाठी (वेतन-भत्त्यांसह) आंदोलन करताना दिसतात. खाजगी कर्मचाऱ्यांच्या तुलनेत शासकीय कर्मचाऱ्यांना कामाचा ताण फारच कमी असतो. मात्र, सेवा देताना शासकीय कर्मचारी किती टाळता येईल, किती झटकता येईल यासाठी काटोकाट प्रयत्न करताना दिसून येतात. अतिमहत्त्वाच्या सरकारी अधिकाऱ्यांचा थेट नागरिकांसोबत संपर्क येऊ नये यासाठी 'शासकीय क्वार्टर'ची संकल्पना राबविण्यात येते. त्यानंतर कामांच्या बाबतीत काही गोष्टींमध्ये होत असलेला कानाडोळा लक्षात घेताना जवळपास तीन वर्षांनी बदल्या गेल्या जातात. मात्र, आपल्या सोयीचे गाव असल्यास बदली रद्द कशी करता येईल, यासाठी फिल्डिंग लावल्या जाते. ती फिल्डिंग कितीही अर्थपूर्ण असली, तरी त्या पायरीवर चढण्यात मागेपुढे पाहत नाहीत. काही शासकीय कर्मचारी ज्या गावात लागतात ते सेवानिवृत्तही त्याच गावात होतात. फक्त गावातल्या गावात टेबल बदलण्याची कलाही शासकीय कर्मचाऱ्यांनी साधलेली असते. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, मुख्य कार्यपालन अधिकारी, उपमुख्य कार्यपालन अधिकारी एकंदरीत आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या जर तीन वर्षांत होत असतील तर अन्य शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या का होत नाहीत? सध्या सुरू असलेल्या नागपुरातील हिवाळी अधिवेशनात बरेच निर्णय चांगले होत आहेत. त्यातला सामान्य नागरिकांना थेट फायद्याचा नसला तरी केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातही बदलीचे धोरण राबविण्यात येईल, असे संकेत मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले. बदलीनंतर नेमणुकीच्या ठिकाणी न राहणारे शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांचा वैद्यकीय भत्ता बंद करण्याचा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागेल. सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संघटना आंदोलनं करण्यासाठी तत्पर राहत असल्याने राज्य सरकारच्या विरोधात आंदोलनं न झाल्यास आश्चर्य वाटायला नको. वर्धेसारख्या जिल्हा ठिकाणावरही नागपूर येथून अपटाऊन करणारे अधिकारी-कर्मचारी आहेत. त्यामुळे रेल्वेच्या टाईम-टेबलवर वर्धेतील शासकीय कार्यालयं चालतात. वर्धेतील जिल्हा सामान्य रुग्णालयाला तर रुग्ण रेफरचा किडाच चावला आहे. अनेक डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस करतात. ही परिस्थिती वर्धेतीलच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्रातील आहे. शासकीय प्रथम श्रेणी अधिकाऱ्यांच्या बदल्या होतात तर अन्य कर्मचाऱ्यांनाही तो नियम लागू व्हावा. शासकीय कर्तव्यात कसूर केल्यासही त्याला बदलीची शिक्षा दिली जावी. बऱ्याचदा 'बदला' म्हणूनही बदली होत असल्याच्या घटनाही आम्ही बघतो. त्यामुळे बदल्या व्हाव्याच; पण बदल्यासाठी नको! शासकीय अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी राहणे म्हणजे गावखेड्यातील नागरिकांना दिलासाच होणार आहे.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

# फडणवीस यांचे पोलादी नेतृत्व पुन्हा सिद्ध

मोरेश्वर बडगे

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार राज्यात सत्तेत आले. नंतर बरेच काही घडतं-बिघडतंय. राजकारण तर बदलले आहेच; पण नवनवी समीकरणंही पुढे येत आहेत. नवनव्या भेटीगाठी पडताहेत. काकाचा पक्ष फोडल्यानंतर तिकडे अजिबात न फिरकलेले अजित पवार त्यांच्या दर्शनाला सहकुटुंब जाऊन आले. त्यातून काका-पुतण्या एकत्र येणार अशी चर्चा सुरू झाली. निवडणुकीच्या रणधुमाळीत 'तू राहशील नाहीतर मी राहीन' अशा भाषेत ललकारणाऱ्या उद्धव ठाकरे यांना पुष्पगुच्छ घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला नागपूरला यावं लागलं. तिकडे दिल्लीत शरद पवार पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटले. साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यासाठी ही भेट होती, असे सांगितले गेले. पण साहित्यापलीकडे काही झाले नसेल असा दावा करता येणार नाही. मंत्रिमंडळ विस्तारानंतर तर अनेकांनी नाराजीचे झेंडे फडकावले. राष्ट्रवादीच्या अजितदादा पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या बंडाची सर्वाधिक चर्चा आहे. पहिल्या दिवशी अधिवेशनाला दांडी मारून भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी थोडी हवा गरम केली होती. मात्र 'आपण नाराज नाही' हे त्यांना लगेच सांगावे लागले. मंत्रिमंडळातून वगळले म्हणून छगन भुजबळ, तानाजी सावंत गावाला निघून जातात. मात्र, भाजपाचे थोडेथोडके नव्हे, तर तब्बल १३२ आमदार शिस्तीत राहतात. फडणवीस यांची आपल्या पक्षावर आणि एकूणच महायुतीवर किती पकड आहे, याचा हा नमुना आहे.

सहसा घराबाहेर न पडणारे 'शिल्लक शिवसेने'चे सुप्रीमो उद्धव ठाकरे मुंबई सोडून नागपूरला आले. विधानभवनात त्यांनी घेतलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट अनेकांना चकित करून गेली. फडणवीसांना 'टरबूज', 'कलंक', फडतूस' काय काय नाही बोलले. तब्बल पाच वर्षे गोटमार करणारे उद्धव ठाकरे चक्क फुलं घेऊन आले तेव्हा फडणवीस यांनी स्वतःला चिमटा काढला असणार. आता ते आले म्हणजे लगेच घरवापसी होईल असे नाही. पण हे कट्टर राजकीय वैरी एकमेकांना भेटू शकतात ही घटना भविष्यातल्या संभाव्य उलथापालथीची नांदी असू शकते. उद्धव साधुसंत नाहीत. पक्के धूर्त राजकारणी आहेत. एकनाथ शिंदे अडीच वर्षांपूर्वी शिवसेना फोडून मुख्यमंत्री झाले होते. शिंदेंची तेव्हा मुख्यमंत्री म्हणून सदिच्छा भेट घ्यावी, असे उद्धव यांना वाटले नाही. आता त्यांना महाराष्ट्राची संस्कृती आठवली. गरज म्हणून ते धावले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनाही भेटले. विधानसभेतले विरोधी पक्षनेतेपद त्यांच्या पक्षाला हवे आहे. अर्थात याचा निर्णय नार्वेकर यांना करायचा आहे. या निमित्ताने का होईना, उद्धव झुकले, हेही नसे थोडके. पाच वर्षांपूर्वी मोठ्या आशेने उद्धव शरद पवारांकडे गेले. अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद सोडले तर त्यांच्या हाती काही लागले नाही. पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले, ४० आमदार सोडून गेले. एका 'हिरव्या रंगाने' घात केला. आता त्यांच्याकडे देण्यासाठी काही नाही. महाविकास आघाडीची पुंगीही मोडल्यात जमा आहे. मनसेने मतं खाल्ली म्हणून २० जागा तरी मिळाल्या. अन्यथा एका आकड्यात उद्धव सेना संपली असती. हे २० आमदारही किती काळ उद्धवकडे टिकतात ते पाहायचे. आता पुढची पाच वर्षे मोठ्या निवडणुका नाहीत. सत्तेशिवाय हे आमदार टिकतील? चार-सहा महिन्यांनी महापालिकेच्या निवडणुका आहेत. यावेळी मुंबई महापालिका हातची गेली तर उद्धव संपले. कडवे



हिंदुत्वच आपल्याला वाचवू शकते, हे लक्षात आल्याने उद्धव यांचा सूर बदलला आहे. फडणवीस आता त्यांना 'सफरचंद' वाटायला लागले आहेत. दादरमधल्या हनुमान मंदिरात आरतीसाठी आदित्य ठाकरे धावले ते त्यापोटीच; पण खूप उशीर झाला. २०२९ च्या निवडणुकीत 'शत-प्रतिशत भाजपा' हे मोदी-शाह यांचे टार्गेट आहे. भाजपाला तशीही आता गरज नाही. प्रचंड बहुमत आहे महायुतीकडे. ठाकरेंना जवळ घेतले तर एकनाथ शिंदे यांचे आमदार बिथरतील. त्यामुळे फडणवीस नवी डोकेदुखी विकत घेणार नाहीत. फडणवीसांना चक्रव्यूहात अडकवू पाहणारे महाविकास आघाडीचे नेते आज स्वतःच चक्रव्यूहात सापडले आहेत.

मंत्रिमंडळाचा विस्तार हे कुठल्याही मुख्यमंत्र्याला आव्हान असते. यावेळी तर अभूतपूर्व परिस्थिती होती. सत्ता बाकांवर महायुतीचे २०० पेक्षा जास्त आमदार आहेत. एकट्या भाजपाचेच १३२ आमदार निवडून आले आहेत. मंत्रिपदं आहेत फक्त ४३. तीन पक्षात ती वाटणं म्हणजे मोठे ऑपरेशन. प्रत्येक आमदाराला मंत्री व्हायचंय. अडीच-अडीच वर्षाचा मंत्री असा व्यवहारी मार्ग अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शोधला आहे. पण त्यातूनही किती जणांचे समाधान होणार? महायुतीकडे २३४ आमदार आहेत. भाजपामधले तर मोठे अवघड बाळंतपण होते. फडणवीसांनी मोठ्या कुशलतेने ते पार पडले. तरीही काहींनी नाराजी दाखवलीच. अमित शाहांकडे प्रत्येकाची कुंडली आहे. त्यामुळे कुणी फार गडबड करणार नाही. नव्या चेहऱ्यांना संधी द्यायची तर काही जुने चेहरे कापणे भाग आहे. यावेळी मंत्रिमंडळ बनवताना खुद्द अमित शाह यांनी लक्ष घातले. राजी-नाराजी पत्करून श्रेष्ठींनी सरकार दिले आहे. ज्यांना तिकिटं नाकारली त्यातल्या काहींना पक्ष वेगळ्या जबाबदारी देणार, असे खुद्द फडणवीस यांनी म्हटले आहे. आधीच्या सरकारमधील बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना यावेळी वगळले आहे. चव्हाण यांना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष केले जाईल, असे संकेत मिळत आहेत. चव्हाण यांना फडणवीसांचे 'हनुमान' म्हटले जाते. संघ परिवारातले चव्हाण हे डोंबिवलीचे आमदार आहेत. त्या हिशोबाने कोकणी मतदार ओढण्याचे भाजपाचे टार्गेट आहे. विद्यमान अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिमंडळात घेतले आहे. नागपूरचे बावनकुळे सरकारमध्ये चौथ्या क्रमांकाचे मंत्री आहेत, ही गोष्ट विदर्भासाठी अभिमानाची राहणार आहे. या आधीच्या २०१४ च्या सरकारमध्ये बावनकुळे ऊर्जामंत्री होते. मागच्या निवडणुकीत त्यांचे तिकीट कापले गेले. तरीही त्यांनी काम सुरू ठेवले. त्याचे बक्षीस त्यांना मिळाले आहे. २०१९ मध्ये कापल्या गेलेल्या बावनकुळेंनी यावेळी भाजपाची तिकिटे वाटली. नेत्यांमध्ये संयम असेल तर त्याची बक्षिसी भाजपामध्ये मिळते, याचे बावनकुळे हे उत्तम उदाहरण आहे. वादग्रस्त तसेच कलंकित नेत्यांना यावेळी मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आहे. महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी ही काळजी घेतली हे विशेष. यवतमाळचे संजय राठोड वाचले. बंजारा समाज फॅक्टर मदतीला आला. भाजपाच्या वाट्याला आलेल्या मंत्रिपदी झालेल्या नियुक्त्यांवर फडणवीस यांची स्पष्ट छाप दिसते. असे असले, तरी फडणवीसांच्याच मर्जीतले प्रवीण दरेकर, संजय कुटे, गोपीचंद पडळकर, रवी राणा बाहेर आहेत, हे देखील वास्तव आहे. मंत्रिमंडळात भाजपाचे २०, शिंदे सेनेचे १२ आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीचे १० मंत्री आहेत. म्हणजे आता कोणाला घ्यायचे झाले तर फक्त एकाला घेता येते. बाकी मंत्रिमंडळ हाउसफुल्ल आहे. जुन्या-नव्याचा समतोल साधताना ज्येष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळ यांना वगळले आहे. भुजबळांनी हा मुद्दा बनवला आहे. ओबीसींवर हा अन्याय आहे, असे सांगितले जात आहे. मात्र, ओबीसी म्हणजे केवळ एक भुजबळ नाहीत. इतरही ओबीसी नेते मंत्रिमंडळात घेतले आहेत. आपले अवतारकार्य संपले हे भुजबळांनी समजून घेतले पाहिजे. भुजबळ आज ७७ वर्षांचे आहेत. भाजपामध्ये या वयातल्या नेत्याला 'मार्गदर्शक मंडळात' म्हणजे पेन्शनीत टाकले जाते. राष्ट्रवादी म्हणजे शरद पवारांकडे आहेत म्हणून एवढी ठाकूरकी चालली. आता अजितदादांचा जमाना आहे. दादा नाही तर त्यांना घेणार कोण? भाजपा घेणार नाही. कारण युतीधर्म. उद्धव ठाकरे यांची लहर भुजबळांना परवडणारी नाही. उरली काँग्रेस. भुजबळ काँग्रेसमध्ये जाणार नाहीत. त्यापेक्षा त्यांनी रिटायर होणे त्यांचा प्रतिष्ठेला शोभेसे होईल. अडचण तीच आहे. भुजबळच नव्हे तर शरद पवारही आपण म्हातारे झाल्याचे मानायला तयार नाहीत. त्यांना अजूनही वाटते... 'लोक माझे सांगाती!'

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### जागतिक घडामोडींमागील सूत्रधार (डीप स्टेट)

आपल्याला दिसणाऱ्या घटना त्यामागील सूत्रं अन् सूत्रधार अनुक्रमे काय अन् कोण असेल हा प्रश्न मनात येत असतो; पण आपण दुर्लक्ष करतो. कारण ते आपल्या सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यातील गोष्ट नसते. पण होणारे परिणाम पटल्यावर परत मनात विचार येतो अन् परत आपण दुर्लक्ष करीत राहतो. जागतिक सूत्रधारांचा कोणताही देश नसतो. अधिपत्य अन् अर्थकारण हाच त्यांचा देश असतो. अगदी अमेरिका, इंग्लंड, जर्मनी त्यांचे आर्थिक अधिपत्याखाली येतात. या सर्वांना ते नियंत्रित करतात. त्या देशाच्या कारभारात महत्त्वाच्या ठिकाणी आपले छुपे लोक बसवून किंवा जगभरातल्या राष्ट्रांत वाद लावणे, युद्धजन्य परिस्थिती निर्माण करणे, आपली शस्त्रे विकण्यास मागणी मिळेल, त्यातचं भविष्यातील आर्थिक समीकरणांची पायाभरणी करून अनेक राष्ट्रांना कर्जाच्या खाईत लोटून किंवा तख्तापलट (शेजारील इस्लामी बांग्लादेश) करून विकासाला खीळ बसेल, अशी कारस्थानं रचून पाहिजे ते करून घेण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरून त्यांचे आपल्यावर अवलंबित्व अबाधित राहील. सर्वकाही कायमस्वरूपी आपल्या ताब्यात राहील अशी तरतूद करणे, तिला पोसण वारंवार चालू राहील यावरच भर देणे. हे भयानक वास्तव आहे आणि आपण सर्व त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, कळत-नकळत भाग किंवा सोशिक बनत असतो आणि आहोत; पण आपल्याला त्याचा विचार तर सोडा; अंदाजही लावता येत नाही. अन्य देशाच्या राजकारणात परदेशी हस्तक्षेप, देशात चुकीची माहिती पसरवणे, नागरिकांमध्ये गैरसमज, संभ्रम पसरवणे, पाळत ठेवणे, शैक्षणिक संस्थात आपली माणसं स्थापित करून इतिहासात छेडछाड आणि संस्कृतीवर अतिक्रमण, कला आणि मनोरंजनाच्या नावाखाली तरुण पिढी बरबाद करणे, वैचारिक चळवळीच्या नावाखाली पर्यावरण आणि हवामान बदल धोरण ही कारणे दाखवून चळवळी करून उद्योग धंदे प्रगतीला खीळ घालणे, दडपशाही इत्यादी. गेल्या तीन दशकांवर नजर टाकली तरी अशी सगळी परिस्थिती असल्याचे जाणवते.

**गणेश शेवते**/९०९६१५२९४९

## वाचक पत्रे

### ईव्हीएम बॅन; बॅलेट पेपरवर ऑन, किती सयुक्तिक?

महाराष्ट्रातील पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडून आघाडीतील घटक पक्ष आपापली जबाबदारी झटकू पाहात आहेत. सोलापूर-मारकवाडी येथील ईव्हीएमविरोधात चाललेल्या आंदोलनाला शरद पवार यांनी भेट देऊन निवडणूक पद्धतीमध्ये बदल करण्याची गरज व्यक्त केली. मारकवाडीच्या आंदोलनामुळे ईव्हीएमविरोधात देश पेटत आहे. असे वक्तव्य करून महाराष्ट्र निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. याबाबत सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून आपली हौस भागवून घेत आहेत. यामुळे निवडणूक कार्य प्रणालीची बदनामी होते आहे. खरे तर विरोधक ईव्हीएमबाबतचे ठोस पुरावे सुप्रीम कोर्टात सादर करू शकलेले नाहीत. विरोधकांचा निवडणुकीत पराभव झाला की त्यांना ईव्हीएम दोषी आहे असे कां वाटावे, असा प्रश्न सुप्रीम कोर्टाला पडलेला आहे. तेलंगणा, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक, झारखंड, पंजाब, जम्मू-काश्मीर व महाराष्ट्रात नुकत्याच ईव्हीएमवर निवडणुका लढवल्या गेल्या आहेत. तिथे विरोधकांनी निवडणुकीत ईव्हीएमच्या वापराला अनुमती देऊनच सत्ता स्थापन केलेली आहे. हे विसरून कसे चालेल? खरे तर याबाबत भाजपाने आक्रमक भूमिका घेतली पाहिजे होती. परंतु असे झाले नाही. कारण देशातील निवडणूक बॅलेट पेपरऐवजी ईव्हीएमवर घेण्याचा काँग्रेसच्या कार्यकाळातच घेतला गेला होता, याची जाणीव भाजपाला आहे. तेव्हा तर भाजपाला दोनआकडी संख्या गाठणे पण कठीण झाले होते. तेव्हाही संसदेतील विरोधकांचे स्थान नगण्य असेच होते. याची जाणीव जनतेला असली पाहिजे. ईव्हीएम हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र असल्याने यात फेरफार करून, हॅंग करून पडलेले मतदान दुसरीकडे वळविता येते, असा आरोप केला जातो. हे आरोप निवडणूक आयोगाने अनेकदा फेटाळले आहेत. परंतु महाराष्ट्रातील आघाडीचे घटक पक्ष ईव्हीएम विरोधात आखडपाखड करून आपला रोष व्यक्त करीत आहेत.

**मिलिंद गड्डमवार**/ ९५११२१५२००

### व्याधिमुक्तसाठी आरोग्यपूर्ण बदल

अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अहवालात ब्रेन स्ट्रोकच्या घटनांमध्ये व त्यात होणाऱ्या मृत्यूंमध्ये वेगाने वाढ होत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि बदलती धावपळीची दिनचर्या हे त्याचे एक प्रमुख कारण असल्याचे त्यात म्हटले आहे. त्यासाठी ताजे आणि आरोग्यदायी जेवण आणि नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. मधुमेह, कॅन्सर, रक्तदाब, हृदयविकार, संधिवात अशा अनेक दुर्धर शारीरिक व्याधी तरुण वयात गाठत आहेत. नैराश्य, अतिचंचलता, निद्रानाश, चिंता, भावनिक चढ-उतार, आक्रमकता किंवा क्रोध अशा मानसिक विकारांसाठी चुकीच्या सवयी पूरक ठरू शकतात. आरोग्याचा मार्ग हा पोटातून जातो. सध्या घरचे ताजे खाणे माणसे विसरत असून जंक फूड आणि खाऊगल्लीतील पदार्थ खाण्याचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. माणसांचे कामाचे स्वरूप बदलत आहेत. घरचे ताजे अन्न जिथे मिळू शकेल त्या जागांना माणसे प्राधान्य देऊ लागली आहेत. त्यांची संख्या वेगाने वाढायला वाढण्याची आवश्यकता आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

# कामगारांनी पुकारला बंद, संतप्त शेतकऱ्यांचा रास्तारोको

## केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचे बाजार समितीत पडसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर**

केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचे शहरात पडसाद उमटत आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानकारक शब्दांचा वापर केल्याने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील अंमल माथाडी कामगारांनी रात्री अचानक काम बंद आंदोलन पुकारले. काम बंद आंदोलनामुळे यार्डामध्ये विक्रीसाठी आणलेला शेतकऱ्यांचा कांदा जागेवरच पडून राहिला. त्यामुळे लिलाव झाला नाही. लिलाव झाला नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी तात्काळ हैदराबाद रोडवर ठिय्या मारत रास्ता रोको सुमारे तासभर चाललेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे चक्काजाम झाला. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था खोळंबली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, शेतकऱ्यांना रास्ता रोको करण्यापासून प्रवृत्त केले. परंतु शेतकरी रास्तारोको करण्यावर ठाम राहिले. शेवटी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलिस आयुक्त राजेंद्र माने, सहायक पोलिस आयुक्त पोमण, पोलीस निरीक्षक चाटे आदीं अधिकाऱ्यांनी प्रकरणात शांततेने मार्ग काढला.

## राजवीर चित्रपट आजपासून जगभरात सुरु

**सोलापूर :** एका ध्येयानं प्रेरित असलेल्या पोलिस अधिकाऱ्याची रंजक गोष्ट राजवीर या चित्रपटातून उलगडणार आहे.ॲक्शनपॅक्ड या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर लाँच करण्यात आला आहे.आज २० डिसेंबरपासून हा हिंदी चित्रपट जगभरात प्रदर्शित होणार आहे.अर्थ स्टुडिओ यांनी सारा मोशन पिक्चर्स आणि रुचिका तोलानी प्रॉडक्शन्स,समृद्धी मोशन पिक्चर्स यांच्या सहकार्याने राजवीर चित्रपटाची प्रस्तुती केली आहे.साकार प्रकाश राऊत,ध्वनी साकार राऊत,गौरव परदासनी,सूर्यकांत बाजी चित्रपटाचे निर्माते,तर रुचिका तोलानी सूचक सहनिर्मात्या आहेत.साकार राऊत,स्वप्नील देशमुख यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे.


Classifieds

**पाहिजेत**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीण मध्ये 9850702170**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

महावितरण

**ई–निविदा सुचना क्र. १५/२०२४–२५**

महावितरण तसेच शासन ई–नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडुन कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| टि–०५३/२०२४–२५ | सं.व सु. विभाग सोलापूर शहर अंतर्गत ३३/११ के.व्ही.उपकेंद्र 'क' उपविभाग परिसर सोलापूर येथे तातडीचे क्रॉस ड्रेनेजचे काम करणे. (कालावधी ३ महिने) | रू.१२.५५ लाख |

ई– निविदा विक्रीचा कालावधी दि. २० डिसेंबर २०२४ ते दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून ई– निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत आहे. ई–निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८५५५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे.मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद् करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरी दारानी राखुन ठेवलेले आहेत.

जनसंपर्क अधिकारी बारामती परिमंडळ बारामती १५४/२०२४–२५
**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, बारामती**

**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर**
**मुख कार्यालय - जी प्लॉट, प्लॉट नं.९७, श्री. सिध्देश्वर मार्केट यार्ड, रविवार पेठ, सोलापूर**

**जाहिर नोटीस**

मयत ठेव खातेदार **स्व. भास्कर भगवान भोरे** रा.१९२ दक्षिण कसबा, सोलापूर यांच्या नावावर आमच्या बँकेच्या सिध्देश्वर पेठ शाखेत बचत ठेव खाते असुन सदर खात्याला वारसा हक्काने नावे दाखल करण्याबद्दल मयताच्या वारसापैकी त्यांची पत्नी **भागीरथी भास्कर भोरे** रा. १९२ दक्षिण कसबा, सोलापूर यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केल्याव्यतिरिक्त अन्य कोणी वारस हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द केले तारखे पासुन सात दिवसाच्या आत लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार याने अर्जात नमुद केल्या व्यतिरिक्त अन्य कोणी वारसदार, हक्कदार, मृत्युपत्र चालवणारे, वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील रक्कम अर्जदार भागीरथी भास्कर भोरे यांच्या नावावर वारस हक्काने वर्ग करण्यात येईल. नंतर कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

सोलापूर - दि. १९/१२/२०२४

सही/-
**विनोद रमाकांत कुलकर्णी**
**व्यवस्थापक**
**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर**

**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर**
**मुख कार्यालय - जी प्लॉट, प्लॉट नं.९७, श्री. सिध्देश्वर मार्केट यार्ड, रविवार पेठ, सोलापूर**

**जाहिर नोटीस**

मयत ठेव खातेदार **स्व. सुमन वसंतराव पंधे** रा. १५७, रेल्वे लाईन्स, सोलापूर यांच्या नावावर आमच्या बँकेच्या सिध्देश्वर पेठ शाखेत मुदत ठेव असुन सदर खात्याला वारसा हक्काने नावे दाखल करण्याबद्दल मयताच्या वारसापैकी त्यांची मुलगी **निलिमा अनिल जाधव** रा. श्री वेंकटेश लेक विस्टा, बिल्डिंग-एल फ्लॅट नं.९०१, जांभुळवाडी रोड, शनि नगर जवळ, आंबेगांव खु. पुणे शहर, कात्रज, पुणे यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. यास अन्य वारसांनी लेखी समंती दिली आहे. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केल्याव्यतिरिक्त अन्य कोणी वारस हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द केले तारखे पासुन सात दिवसाच्या आत लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार याने अर्जात नमुद केल्या व्यतिरिक्त अन्य कोणी वारसदार, हक्कदार, मृत्युपत्र चालवणारे, वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील रक्कम अर्जदार निलिमा अनिल जाधव यांच्या नावावर वारस हक्काने वर्ग करण्यात येईल. नंतर कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

सोलापूर - दि. १९/१२/२०२४

सही/-
**विनोद रमाकांत कुलकर्णी**
**व्यवस्थापक**
**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर**

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**हायपोथेकेशन डीड अंतर्गत बँकेला सुरक्षा म्हणून हायपोथेकेटेड वाहनांच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना**

याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदार/जमीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेले वाहन बँक/सुरक्षित कर्जदाराला गृहीत/शुल्क आकारले जाते, ज्याचा ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. महाराष्ट्र, सोलापूर झोन, सुरक्षित कर्जदार, जसे आहे तिथे, जसे आहे तसे आणि जे काही आहे यावर विकले जाईल आणि 30/12/2024 रोजी आश्रयाशिवाय आधारावर कर्जदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या थकबाकीच्या वसुलीसाठी / तत्क्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीदार. कर्जदार/जमीनदार, देय रक्कम, वाहनाचे संक्षिप्त वर्णन, ताब्याचा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा ठेव देखील खाली दिलेली आहे. -

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि जामीनदार/शाखा | 19/12/2024 रोजी वसुलीसाठी देयके (LB+UAI+खर्च आणि) चालू आहे | वाहनाची थोडक्यात माहिती | कब्जा प्रकार | राखीव किंमत / बयाणा पैसा ठेव / बोली वाढीव रक्कम | EMD सबमिट करण्यासाठी खाते तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार:** **1. श्री. इस्माईल गुलाबराव खैरात.** पत्ता :- 1 घर क्र. 48, भाजी मार्केट, दुधनी, ता. अक्कलकोट, सोलापूर, महाराष्ट्र 413220 पत्ता :- 2 नगर परिषदजवळ, पोस्ट दुधनी ता. अक्कलकोट, सोलापूर **कर्जदार: 2** **श्री.गुलाबराव महिबूब खैरात** पत्ता: कुंभार गल्ली, पोस्ट दुधनी, अक्कलकोट, सोलापूर, महाराष्ट्र 413220 A/c क्रमांक: 60328202759 जामीनदार: शून्य दुधनी शाखा | LB : 29,04,695.90/- UI: 848352/- एकूण देय: रु. 37,53,047.00/- (सदोतीस लाख त्रेपन्न हजार सत्तेचाळीस रुपये) 12/12/2024 रोजी अधिक व्याज करार दरावर आणि 01/09/2023 पेमेंटच्या तारखेपर्यंत खर्च. | **कुबोटा मॉडेल B2441** i इंजिन क्र. 1KF0897 ii उत्पादन वर्ष - 2019 iii मॉडेल आणि रंग-लाल iv चेसिस क्र. KBTB20 TNJ, MTF34093 v. इंधन वापर: डिझेल | भौतिक | रु.1,55,000/- रु. 15,000/- रु. 10,000/- | बँक ऑफ महाराष्ट्र A/c नाव: ई-लिलाव ARC नवी पेठ A/c क्रमांक: 60244953152 IFSC: MAHB0000017 |

**ई लिलावाची तारीख/वेळ** : 30/12/2024, सकाळी 10.00 ते सायंकाळी 5:00
**EMD सबमिट करण्याची शेवटची तारीख** : 26/12/2024, संध्याकाळी 4:00 पूर्वी
**मालमत्तांच्या तपासणीची तारीख आणि वेळ** : 24/12/2024 सकाळी 10.00 ते संध्याकाळी ५.०० पर्यंत (तपासणीसाठी कृपया संपर्क साधा: 8956381116)
**तपशीलासाठी बँक अधिकृत संपर्क क्रमांक** : 8102622141

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया बँक ऑफ महाराष्ट्र सिक्युर्ड लेनदाराच्या वेबसाईटवर प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्या www.bankofmaharashtra.in

इच्छुक बोलीदार ज्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बिड दस्तऐवज सबमिट करणे यासाठी सहाय्य आवश्यक आहे, ऑनलाइन आंतर-से-बिडिंग इत्यादीवरील प्रशिक्षण/प्रदर्शन, विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया पहा

https://bankofmaharashtra.in/asset-for-sales-search ही लिंक बँकेच्या वेबसाइटवर आणि Ebkray वर देखील दिली आहे पोर्टल https://ebkray.in/eauction-psb, किंवा तुम्ही सलीम जावेद, CMARC, सोलापूर आणि श्रीराम ऑटोमॉल यांच्यामार्फत संपर्क साधू शकता. प्रत्यक्ष भेट देऊन श्रीराम ऑटोमॉल. इंडिया लि. सोलापूर-पुणे महामार्ग, हॉटेल सुनील समोर, कोंडी, सोलापूर- 413255, महाराष्ट्र.

**तारीख :** 19/12/2024
**ठिकाण : सोलापूर**

सही/-
**सीएमएआरसी**
**आणि अधिकृत अधिकारी**

**जाहीर नोटीस**

दि. कि. अर्ज नं.३६/२०२४
नि. नंबर - १०

**करमाळा येथील मे.सि. ज. ज्यु.डी. साो. यांचे कोर्टात**

**१) विठ्ठल मारूती गलांडे-साळुंखे वगैरे - अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सा.वाले**

ज्या अर्थी उपरीनिर्दीष्ट अर्जदार यांनी मयत कै. मारूती गुलाबराव यांचे कायदेशीर वारस या नात्याने उपरोक्त अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज या न्यायालयाकडे सादर केलेला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना या जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरीनिर्दीष्ट अर्जदारांच्या उपरोक्त मागणी बद्दल कोणाची काही हरकत असल्यास अथवा अर्जदारांच्या मागणी संदर्भात कोणास काही सांगावयाचे असल्यास त्याने सदर घोषणेच्या प्रसिध्दी दिनांकापासून १ महिन्याचे आत अथवा प्रस्तुत कामी नेमलेली ता. २२/०१/२०२५ रोजी सकाळी ११.00 वा. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर करमाळा यांचे कोर्टात स्वतः अगर आपल्या प्राधिकृत व्यक्तीमार्फत अथवा वकिलांमार्फत उपस्थित राहुन आपली हरकत लेखी स्वरुपात कळवावी / दाखल करावी. अन्यथा मुदतीत तसे न केल्यास मे. न्यायालय प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांचा पुरावा नोंदवून पुढील योग्य तो आदेश करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस आज दि. १३/१२/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रांकासह दिली.

**सही/-**
**लिपिक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, करमाळा**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**माढा येथील मे. तहसिलदार सो यांचे न्यायालयात**

**सुनिता वसंत कदम - अर्जदार**
विरुध्द
**माढा नगरपंचायत माढा - सामनेवाला**
**ता. माढा जि.सोलापूर**

तमाम लोकांना विशेषताः मौजे माढा ता. माढा जि. सोलापूर येथील व आपसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, ज्या अर्थी अर्जदार हिचे पती वसंत विठ्ठलराव कदम यांचा मृत्यु ०१/११/२०२२ रोजी माढा ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याची मृत्युची नोंद माढा नगरपंचायत माढा येथे नसलेने अर्जदार यांना त्यांचे पती वसंत विठ्ठलराव कदम यांचे मृत्युचे नोंद माढा नगरपंचायत माढा येथील रजिस्टरला नोंदवुन तसा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कविण्यात येते की, अर्जदार याने त्यांचे पती वसंत विठ्ठलराव कदम यांचे मृत्यु घटणेची नोंद धरणेकामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख २४/०१/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार मांडावी. त्यानंतर अर्जदार यांना त्यांचे पती वसंत विठ्ठलराव कदम यांचा मृत्यु दिनांक ०१/११/२०२२ रोजीचे मृत्यु नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात यावे. तद्नंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**तहसिल कार्यालय माढा**
**क्र.२०२४/कुका (जन्म नोंद)**
**एसआर/४०/२०२४**
**दिनांक १७/१२/२०२४**

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी**
**दंडाधिकारी माढा**

PUBLICATION NOTICE

M.A.C. Petition No. 88/2023
Exhibit No. 19/D

**IN THE COURT OF THE MEMBER, MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL,**
**KOLHAPUR, AT KOLHAPUR, [Shri S. P. Gondhalekar so]**

**1. Sou Pramila Vasant Patil,**
Age - 54 yrs., Occu. - Nil,
R/o. Vadgaon Road, Shri Ram nagar,
Bhadole, Tal. Hatkaknagale, Dist. Kolhapur. — **Petitioners**
V/s.
**3. Shri Dnyaneshwar Maruti Bhosale,**
Age - 54 Yrs., Occu. - Driver,
R/o. Mahim, Tal. Sangola, Dist. Solapur. — **Opponent**

To,
**Opponent No. 3**

Whereas the above named Petitioner has made an application to this court u/s. 166 of Motor Vehicle Act 1988.

You are hereby warned to appear in this court in person or by a Pleader duly instructed on the **date of 28th January, 2025** at 10.30 a.m. in the forenoon, to show cause against the said application failing in wherein, the said application will be heard and determined ex-parte.

If you are intend to file written statement you must file it within 30 days or in extended period U/0.8 Rule 1 of C.P.C.

Also take notice in default of your filing on address for service on or before the date mentioned, you are liable to have defence struck out.

If you have insufficient funds to meet out the court expenses and your income is not more than Rs. 20,000/- per year, and you want to defend through an Advocate or legal practitioner, you can do so through the Legal Aid committee, which is at your District or Taluka Place.

If you are interested in resolving the present dispute quickly and within the four corners of law then the facility of Court Annexed Mediation is available for you free of cost.

Given under my hand and the seal of the Tribunal this day of **12/12/2024.**

Court stamp

**Sd/-**
**Assistant Superintendent,**
**District Court, Kolhapur.**

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**
६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**जाहिर प्रसिध्दीकरण**

नमुना झेड (नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)

**स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विर्की अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर c/o श्री महावीर अर्बन को ऑप बैंक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) पाने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणायनि खालील नमूद यादीतील ऋणको पांची स्थावर मिळकत बाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी, गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली या पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्यायनि त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारा नुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणी सर्व नागरिकांना पाद्वारे सावध करण्यात हेत आहे की, खाली नमूद केलेल्या पादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

वरील सर्व संबंधितांना कळवण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबापत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे न केल्यास मुदत्ती नंदर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | गावाचे नाव | कर्जदार/जामिनदाराचे नाव | सि स न/गट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १ | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी शहर बार्शी येथील म्यु.पाल हद्दीतील मिळकत | अविनाश श्रीरंग डोईफोडे (आरती अजेन्सीज प्रो. बालाजी श्रीरंग डोईफोडे यांचे जामीनदार/सहकर्जदार) | गट न. ९४३/१ प्लॉट नं. २०२ व प्लॉट नं. २०४ | याचे क्षेत्रफळ २८८.00 चौ.मी. याचे क्षेत्रफळ २८८.00 चौ.मी. असे एकूण ५७६.00 चौ.मी. आकार रु.00२ |
| २ | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी शहर बार्शी, जिल्हा सोलापूर येथील मिळकत | बालाजी श्रीरंग डोईफोडे (कर्जदार) | गट क्र. १११५ | पाचे क्षेत्रफळ हे 0.0४.0५ आर चौ.मी |
| ३ | डी.सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी शहर बार्शी, जिल्हा सोलापूर येथील मिळकत | संभाजी भारत घाडगे (आरती अजेन्सीज प्रो. बालाजी श्रीरंग डोईफोडे यांचे जामीनदार/सहकर्जदार) | गट क्र. ८५२/१/२५ | याचे क्षेत्रफळ हे.२.५० ९३ आर चौ.मी. आकार रु. १६६.00 पैकी संभाजी भारत घाडगे यांचे हिश्याचे |

**दिनांक : १९/१२/२०२**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**हायपोथेकेशन डीड अंतर्गत बँकेला सुरक्षा म्हणून हायपोथेकेटेड वाहनांच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना**

याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदार/जमीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेले वाहन बँक/सुरक्षित कर्जदाराला गृहीत/शुल्क आकारले जाते, ज्याचा ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. महाराष्ट्र, सोलापूर झोन, सुरक्षित कर्जदार, जसे आहे तिथे, जसे आहे तसे आणि जे काही आहे यावर विकले जाईल आणि 30/12/2024 रोजी आश्रयाशिवाय आधारावर कर्जदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्रची थकबाकी वसूल करण्यासाठी/ तत्क्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीदार. कर्जदार/जामीनदार, देय रक्कम, वाहनाचे संक्षिप्त वर्णन, ताब्याचा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा ठेव देखील खालीलप्रमाणे दिली आहे -

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि जामीनदार/शाखा | 19/12/2024 रोजी वसुलीसाठी देयके (LB+UI+खर्च आणि कालबाह्य.) चालू आहे | वाहनाची थोडक्यात माहिती | कब्जा प्रकार | राखीव किंमत / बयाणा पैसा ठेव / बोली वाढवा रक्कम | EMD सबमिट करण्यासाठी खाते तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार : 1) श्री. उत्तम शेखाप्पा गायकवाड** **सौ. सुवर्णा उत्तम गायकवाड** A/P स्वामी समर्थ मंदिराजवळ, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.413216. **हमीदार-** **1. श्री. मुकेश जेतप्पा बनसोडे** A/P भीमनगर, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर 413216. **2. श्री.संदीप शंकर गायकवाड** A/P भीमनगर, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर 413216 A/c क्रमांक 60047840700 अक्कलकोट शाखा | LB : 7,84,045.82/- UAI : 37,35,211/- एकूण देय: रु. 45,19,256.82 /- पंचेचाळीस लाख एकोणीस लाख दोनशे छप्पन रुपये आणि ब्याऐंशी पैसे) 12/12/2024 रोजी अधिक व्याज करार दरावर आणि 30/12/2012 पेमेंटच्या तारखेपर्यंत खर्च. | **टाटा सफारी माजी** i इंजिन क्रमांक - 22LDICOR09, FZYJ1271 ii उत्पादन वर्ष - 2010 iii मॉडेल आणि रंग - PEAR पांढरा iv चेसिस क्रमांक - MAT403725A, NF06559 v. वाहन तपशील MH13AU009 | भौतिक | रु.55,000/- रु. 6,000/- रु. 5,000/- | बँक ऑफ महाराष्ट्र Ac नाव: ई-लिलाव ARC सोलापूर नवीपेठ A/c क्रमांक: 60244953152 IFSC: MHB0000017 |

**ई लिलावाची तारीख/वेळ** : 30/12/2024, सकाळी 10.00 ते सायंकाळी 5:00
**EMD सबमिट करण्याची शेवटची तारीख** : 26/12/2024, संध्याकाळी 4:00 पूर्वी
**मालमत्तांच्या तपासणीची तारीख आणि वेळ** : 24/12/2024 सकाळी 10.00 ते संध्याकाळी ५.०० पर्यंत (तपासणीसाठी कृपया संपर्क साधा: 8956381116)
**तपशीलासाठी बँक अधिकृत संपर्क क्रमांक** : 8102622141

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया बँक ऑफ महाराष्ट्र सिक्युर्ड लेनदाराच्या वेबसाईटवर प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्या www.bankofmaharashtra.in

इच्छुक बोलीदार ज्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बिड दस्तऐवज सबमिट करणे यासाठी सहाय्य आवश्यक आहे, ऑनलाइन आंतर-से-बिडिंग इत्यादीवरील प्रशिक्षण/प्रदर्शन, विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया पहा

https://bankofmaharashtra.in/asset-for-sales-search ही लिंक बँकेच्या वेबसाइटवर आणि Ebkray वर देखील दिली आहे पोर्टल https://ebkray.in/eauction-psb, किंवा तुम्ही सलीम जावेद, CMARC, सोलापूर आणि श्रीराम ऑटोमॉल यांच्यामार्फत संपर्क साधू शकता. प्रत्यक्ष भेट देऊन श्रीराम ऑटोमॉल. इंडिया लि. सोलापूर-पुणे महामार्ग, हॉटेल सुनील समोर, कोंडी, सोलापूर- 413255, महाराष्ट्र.

**तारीख :** 19/12/2024
**ठिकाण : सोलापूर**

सही/-
**सीएमएआरसी**
**आणि अधिकृत अधिकारी**

महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली, तालुका कल्याण यांचे कार्यालय तर्टे प्लाझाच्या मागे, अरिहंत पूजा, बि–विंग, तळमजला, गांधीनगर, डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे ४२१२०१
EMAIL ID :- dyreg.dom@gmail.com
सहकारातून समृद्धीकडे

जा.क्र.उपनि/डोंबिवली/बी–१/जाहीर नोटीस/२०१५/सन/२०२४ दिनांक :–१३/१२/२०२४

**–: जाहीर नोटीस :–**

साधना सहकारी पतपेढी मर्या, ५. अन्नपूर्णा स्वागत को–ऑप. हौ. सो, आनंद नगर, विजया बँकेच्या बाजूला, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे ४२१२०१ या अर्जदार/वादी संस्थेने खालील नमूद जाबदेणार थकबाकीदार यांचेविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अन्वये वसुली दाखला मिळणेकरिता या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदर दाव्यामध्ये जाबदेणार यांना रजिस्टर पोस्टाने सुनावणी नोटीस बजावणी होत नसल्याने या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की, खालील नमूद जाबदेणार यांनी दिनांक २४/१२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता खालील निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात वर नमूद केलेल्या पत्त्यावर उपस्थित रहावे. सदर तारखेस सुनावणीस गैरहजर राहिल्यास अर्जदार संस्थेने दाखल केलेल्या वसुली दाव्याबाबत योग्य तो गुणवत्तेवर आधारित निर्णय घेणेत येईल याची नोंद घ्यावी

| अ.क्र. | दावा नं. | प्रतिवादी/जाबदाराचे नाव | दावा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | ८२/२०२४ | १. श्री. कुंजेशभाई जयसुखलाल बगडीया, ३०४/ए, नवीन विडि घरकुल, कुंभारी, सोलापूर २. श्रीमती जल्पा भरत देढिया, ३१२, ३रा मजला, जय अंबिका बिल्डींग, जिजाई नगर, अंबिका नगर, डोंबिवली (पूर्व) ३. श्री. चिंतन महेश देहिया, बी/३, आसावरी हौसिंग, घनश्याम गुप्ते रोड, विष्णुनगर, डोंबिवली (पूर्व) | रु. १,९७,९४६/– |

दिनांक : १३/१२/२०२४
ठिकाण : डोंबिवली

शिक्का

सही/–
**(राम कुलकर्णी)**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, डोंबिवली, जि.ठाणे**

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**हायपोथेकेशन डीड अंतर्गत बँकेला सुरक्षा म्हणून हायपोथेकेटेड वाहनांच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना**

याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदार/जमीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेले वाहन बँक/सुरक्षित कर्जदाराला गृहीत/शुल्क आकारले जाते, ज्याचा ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. महाराष्ट्र, सोलापूर झोन, सुरक्षित कर्जदार, जसे आहे तिथे, जसे आहे तसे आणि जे काही आहे यावर विकले जाईल आणि 30/12/2024 रोजी आश्रयाशिवाय आधारावर कर्जदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्रची थकबाकी वसूल करण्यासाठी/ तत्क्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीदार. कर्जदार/जामीनदार, देय रक्कम, वाहनाचे संक्षिप्त वर्णन, ताब्याचा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा ठेव देखील खालीलप्रमाणे दिली आहे -

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि जामीनदार/शाखा | 19/12/2024 रोजी वसुलीसाठी देयके (LB+UAI+खर्च आणि) चालू आहे | वाहनाची थोडक्यात माहिती | कब्जा प्रकार | राखीव किंमत / बयाणा पैसा ठेव / बोली वाढवा रक्कम | EMD सबमिट करण्यासाठी खाते तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार: १. श्री. श्रीनिवास रामदास दुबास** पत्ता :- जुना प्लॉट नं.-22 क्र.110/2 नवीन सर्वेक्षण सोनिया येथील क्र.108/2 नगर, कसबे उत्तर सोलापूर A/c क्रमांक 60317730929 हमीदार : शून्य अशोक चौक शाखा | LB : 3,30,717/- UAI : 47,437 /- एकूण देय: रु. 3,78,155.00 /- (तीन लाख अठ्ठ्याहत्तर हजार एकशे पंचावन्न रुपये) चालू आहे 12/12/2024 रोजी अधिक व्याज करार दरावर आणि 07/11/2024 पेमेंटच्या तारखेपर्यंत खर्च. | **कंपास लिम.**(0) 2.0 डी i इंजिन क्रमांक - 4023363 ii उत्पादन वर्ष - 2018 iii मॉडेल आणि रंग - लाल आणि काळा iv चेसिस क्रमांक - MCAAJPCY0J FA36019*7J v. इंधन वापर: DEISEL | भौतिक | रु.7,00,000/- रु. 70,000/- रु. 10,000/- | बँक ऑफ महाराष्ट्र Ac नाव: ई-लिलाव ARC नवी पेठ सोलापूर A/c क्रमांक: 60244953152 IFSC: MHB0000017 |

**ई लिलावाची तारीख/वेळ** : 30/12/2024, सकाळी 10.00 ते सायंकाळी 5:00
**EMD सबमिट करण्याची शेवटची तारीख** : 26/12/2024, संध्याकाळी 4:00 पूर्वी
**मालमत्तांच्या तपासणीची तारीख आणि वेळ** : 24/12/2024 सकाळी 10.00 ते संध्याकाळी ५.०० पर्यंत (तपासणीसाठी कृपया संपर्क साधा: 8956381116)
**तपशीलासाठी बँक अधिकृत संपर्क क्रमांक** : 8102622141

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया बँक ऑफ महाराष्ट्र सिक्युर्ड लेनदाराच्या वेबसाईटवर प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्या www.bankofmaharashtra.in

इच्छुक बोलीदार ज्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बिड दस्तऐवज सबमिट करणे यासाठी सहाय्य आवश्यक आहे, ऑनलाइन आंतर-से-बिडिंग इत्यादीवरील प्रशिक्षण/प्रदर्शन, विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया पहा

https://bankofmaharashtra.in/asset-for-sales-search ही लिंक बँकेच्या वेबसाइटवर आणि Ebkray वर देखील दिली आहे पोर्टल https://ebkray.in/eauction-psb, किंवा तुम्ही सलीम जावेद, CMARC, सोलापूर आणि श्रीराम ऑटोमॉल यांच्यामार्फत संपर्क साधू शकता. प्रत्यक्ष भेट देऊन श्रीराम ऑटोमॉल. इंडिया लि. सोलापूर-पुणे महामार्ग, हॉटेल सुनील समोर, कोंडी, सोलापूर- 413255, महाराष्ट्र.

**तारीख :** 19/12/2024
**ठिकाण : सोलापूर**

सही/-
**सीएमएआरसी**
**आणि अधिकृत अधिकारी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### इटालियन चषक : ॲटलांटाचा सेसेनावर ६-१ ने विजय




**मिलान** : येथे सुरू असलेल्या इटालियन चषक फुटबॉल स्पर्धेत सेरी ए आघाडीवीर ॲटलांटाने या हंगामात देशांतर्गत फुटबॉलवर आपले वर्चस्व कायम राखले असून इटालियन चषकात दुसऱ्या विभागातील फुटबॉल सामन्यात ॲटलांटाने सेसेना विरुद्ध ६-१ असा आणखी एक विजय मिळवला. ॲटलांटाच्या विजयात चार्ल्स डी केटेलेर व लाझर समार्डझिक या दोन आक्रमक खेळाडंनी प्रत्येकी दोन गोलचे योगदान दिले. आता ॲटलांटाला उपांत्यपूर्व फेरीत बोलोग्नाविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे. रोमाने लोअर-लीग प्रतिस्पर्ध्याविरुद्धही सहज विजय मिळवला आणि त्यांनी सॅम्पडोरियाचा ४-१ असा पराभव केला. आता रोमाला अंतिम आठ फेरीच्या सामन्यात एसी मिलानविरुद्ध खेळावे लागणार आहे. फेब्रुवारीमध्ये उपांत्यपूर्व फेरीचे सामने खेळवले जातील. अटलांटाला गत वर्षी इटालियन चषकाच्या अंतिम सामन्यात ज्युव्हेंटसकडून पराभव पत्करावा लागला होता. मात्र यंदा जिंकण्याच्या दृष्टीने ॲटलांटा संघाचे प्रशिक्षक जियान पिएरो गॅस्पेरिनी यांनी एका मजबूत संघाची निवड केली आहे.

### हैदराबाद एफसीचे मुख्य प्रशिक्षक थांगबोई सिंगटो यांची हकालपट्टी

**हैदराबाद** : इंडियन सुपर लीग (आयएसएल) हंगामातील आतापर्यंतच्या निराशाजनक कामगिरीनंतर हैदराबाद एफसीने मुख्य प्रशिक्षक थांगबोई सिंगटो यांची तत्काळ प्रभावाने हकालपट्टी केली आहे. हैदराबाद एफसी सध्या ११ सामन्यांतून दोन विजय आणि एक ड्रॉसह गुणतालिकेत १२ व्या स्थानावर आहे. ते जवळपास अर्ध्या दशकापासून क्लबशी संलग्न आहे. २०२० पासून सहायक प्रशिक्षक आणि तांत्रिक संचालक (युवा) म्हणून काम केल्यानंतर जुलै २०२३ मध्ये त्यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. हैदराबाद एफसीने सिंगटो यांच्या समर्पण, व्यावसायिकता व क्लबमधील योगदानाबद्दल आभार मानले व त्यांना भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा दिल्या. क्लब पुढील घोषणा करेपर्यंत सहायक प्रशिक्षक शमील चेंबकाथ हे अंतरिम मुख्य प्रशिक्षकाची भूमिका स्वीकारतील. सध्या सुरू असलेल्या आयएसएलमध्ये क्लबच्या वाईट कामगिरीमुळे केरळ ब्लास्टर्सने आपले मुख्य प्रशिक्षक मिकेल स्टाहरे यांची सेवा काढून टाकण्याची घोषणा केल्यानंतर काही दिवसांनी सिंगटोची हकालपट्टी झाली. सिंगटो यांनी आपल्या कार्यकाळात विविध स्पर्धांमध्ये हैदराबाद एफसी संघाला मार्गदर्शन केले. उल्लेखनीय म्हणजे त्यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद एफसीने गत हंगामात अखिल भारतीय संघासह आयएसएल सामना जिंकणारा पहिला संघ बनून इतिहास घडवला.

### पाकविरुद्धच्या उर्वरित दोन वन-डेसाठी केशव बाहेर

**केपटाऊन** : पाकिस्तानविरुद्धच्या उर्वरित दोन एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी प्रमुख डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराज दक्षिण आफ्रिका संघातून बाहेर झाला आहे. या वन-डे मालिकेनंतर होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी त्याचा संघातील सहभाग अनिश्चित आहे. पहिला कसोटी सामना २६ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. गुरुवारी केपटाऊन आणि रविवारी जोहान्सबर्ग येथे पाकिस्तानविरुद्धच्या शेवटच्या दोन एकदिवसीय फिरकीपटूची अनुपस्थिती निश्चित झाली आहे. तथापि, आगामी कसोटी मालिकेसाठी ३४ वर्षीय खेळाडूच्या तंदुरुस्तीची मोठी चिंता आहे. दोन वन-डे सामन्यांसाठी केशव महाराजांच्या जागी ब्योर्न फॉर्च्युइनला संघात स्थान देण्यात आले आहे. सध्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत आघाडीवर असलेल्या दक्षिण आफ्रिकेला पुढील वर्षी जूनमध्ये होणाऱ्या लॉर्ड्सच्या अंतिम सामन्यात आपले स्थान निश्चित करण्यासाठी पाकिस्तानविरुद्धच्या दोन कसोटींपैकी एकात विजय आवश्यक आहे. केशव महाराजांच्या अनुपलब्धतेच्या प्रसंगी, कमी अनुभव असूनही सेनूरन मुथुसामी हा कसोटी संघात एकमेव तज्ज्ञ फिरकीपटू म्हणून उभा आहे.

### कार्लो ॲन्सलोटी माद्रिदचा सर्वात यशस्वी व्यवस्थापक

**माद्रिद** : रिअल माद्रिदने इंटरकॉन्टिनेंटल चषक जिंकले. या विजयाबरोबरच कार्लो ॲन्सेलोटीने एक मैलाचा दगड गाठला आणि इतिहास घडवला. या यशाबरोबरच ॲन्सेलोटी इटालियन क्लबच्या इतिहासात एकूण १५ चषकांसह सर्वाधिक विजेतेपद मिळवणारा व्यवस्थापक झाले. कतारमधील लुसेल स्टेडियमवर मोठ्या प्रमाणावर झालेल्या एकतर्फी लढतीत रिअल माद्रिद संघाने पाचूकाचा ३-० असा पराभव विजेतेपद पटकावले. या यशाबरोबरच ॲन्सेलोटीने दिवंगत मिगुएल मुनोझ यांच्या पराक्रमाला मागे टाकत १५ चषक पटकावले.

# अखेर भारत चॅम्पियन्स चषकाचे सामने तटस्थ ठिकाणी खेळणार

## यूएईमध्ये सामने होण्याची शक्यता



◆ **दुबई, १९ डिसेंबर**

पुढील वर्षीच्या आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेच्या यजमानपदावरील अडथळा गुरुवारी संपुष्टात आला. भारत वन-डे चॅम्पियन्स चषक स्पर्धेतील आपले सामने यजमान देश पाकिस्तानऐवजी तटस्थ ठिकाणी खेळेल, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) गुरुवारी जाहीर केले.

२०२७ सालापर्यंत भारतासाठी सामने आयोजित करण्यासाठी अशीच समान व्यवस्था असेल. हा करार २०२८ सालच्या महिला टी-२० विश्वचषकापर्यंत वाढणार आहे. महिलांचा टी-२० विश्वचषक पाकिस्तानमध्ये होणार आहे, असेही आयसीसीने म्हटले आहे. कोणतीही औपचारिक घोषणा झाली नसली तरी भारताचे चॅम्पियन्स चषकाचे सामने संयुक्त अरब अमिरातमध्ये (यूएई) होण्याची शक्यता आहे.

२०२४ ते २०२७ या कालावधीत सध्याच्या अधिकार चक्रादरम्यान आयसीसी स्पर्धेत खेळले जाणारे भारत आणि पाकिस्तानमधील सर्व सामने तटस्थ ठिकाणी खेळले जातील, असे आयसीसीने सांगितले.

पुढील वर्षी भारतात होणारा महिला विश्वचषक व २०२६ मध्ये भारत व श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने होणारा टी-२० विश्वचषक सुद्धा या व्यवस्थेत समाविष्ट असेल.

सुरक्षेच्या कारणास्तव भारताने फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स चषकासाठी पाकिस्तानला जाण्यास नकार दिला. २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात १५० लोक मारले. भारतीय संघ पाकिस्तानमध्ये खेळलेले नाहीत. दोन्ही देशांची शेवटची द्विपक्षीय मालिका करार २०१२ मध्ये झाला होता. परंतु भारतीय संघाला पाकिस्तानमध्ये जाण्यासाठी भारत सरकारची मंजुरी आवश्यक होती, परंतु भारत सरकारने परवानगी नाकारली. भारत सरकार त्या अपल्या भूमिकेवर आताही ठाम आहे.

आयसीसी चॅम्पियन्स चषक २०२५ च्या स्पर्धेचे वेळापत्रक लवकरच निश्चित केले जाईल, असे आयसीसीने म्हटले.

चेअरमन ग्रेग बार्कले यांच्या नेतृत्वाखालील प्रशासकीय मंडळाने चॅम्पियन्स चषकाच्या यजमानपदावर दीर्घकाळ मौन पाळल्यानंतर चर्चेच्या मालिकेनंतर हा निर्णय अपेक्षित होता.

बार्कले यांचे उत्तराधिकारी जय शाह यांनी १ डिसेंबर रोजी पदभार स्वीकारला.

बीसीसीआयची भूमिका नेहमीच स्पष्ट असताना, पीसीबीने ठिकाणांची एकतर्फी व्यवस्था करण्यास परवानगी नाकारल्यामुळे प्रकरण ताणले गेले. पाकिस्तानचे अंतर्गत मंत्री मोहसीन नक्वी यांच्या नेतृत्वाखाली पीसीबीने सामन्याचे स्थळ न बदलविण्याचा निर्धार केला होता.

पीसीबी गत वर्षी एकदिवसीय विश्वचषकासाठी आपला संघ भारतात पाठवला होता, मात्र पाकिस्तानने हायब्रीड मॉडेल स्वीकारण्यास स्पष्टपणे विरोध केला होता, परंतु शेवटी परस्पर कारणास्तव त्यास पीसीबीने सहमती दर्शविली. ◂(वृत्तसंस्था)




# भारतीय ऑलिम्पिकपटूंच्या पुढील पिढीसाठी महत्त्वाचा करार

## ॲक्सिस बँकेचा पुढाकार

◆ **मुंबई, १९ डिसेंबर**

ॲक्सिस बँकेने आज कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी (सीएसआर) अंतर्गत ओजीक्यू- फाउंडेशन फॉर प्रमोशन ऑफ स्पोर्ट्स ॲण्ड गेम्स आणि इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्टशी सामंजस्य करार केला. या दोन भागीदारींचा उद्देश आता खेळत असलेल्या भारतीय खेळाडूंना त्यांच्या क्रीडा कारकीर्दीच्या उच्चतम स्तरावर प्रोत्साहन देणे आणि भारतीय खेळाडूंच्या पुढील पिढीचा विकास करणे आहे. या सहयोगाद्वारे भारतातील क्रीडा क्षेत्राच्या विकासात योगदान देण्याची आपली बांधिलकी अधोरेखित करीत ॲक्सिस बँकने सीएसआर अंतर्गत प्रथमच खेळाच्या क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे.

ओजीक्यू-एफपीएसजी प्रोग्रामसोबतच्या बँकेच्या भागीदारीतून १५० खेळाडू आणि पॅरा-खेळाडूंना १० वैयक्तिक ऑलिम्पिक खेळांमध्ये पाठिंबा देण्यात येईल. यात तिरंदाजी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, शूटिंग, कुस्ती, ॲथलेटिक्स, जलतरण, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, स्कॉश तसेच ८ पॅरालिम्पिक खेळ जसे, ॲथलेटिक्स, तिरंदाजी, बॅडमिंटन, शूटिंग, पॉवरलिफ्टिंग, टेबल टेनिस, कॅनू आणि ब्लाईंड जूडो समाविष्ट आहे. या खेळाडूंना जागतिक दर्जाची उपकरण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, मानसिक स्वास्थ्य तसेच दुखापतीनंतर पुनर्वसन कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती ॲक्सिस बँकेच्या स्ट्रॅटेजिक प्रोग्राम्स आणि सस्टेनेबिलिटीचे ग्रुप एक्झिक्युटीव्ह विजय मुलबागल यांनी दिली. ◂(तभा वृत्तसेवा)




# अहिल्याबाई प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

उष:काल दलित शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनपटू अतुल बांदेवाडीकर यांच्या हस्ते क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन झाले.

याप्रसंगी मुख्याध्यापक इस्माईल शेख, क्रीडाशिक्षक रमेश हेगडे, धनाजी धेंडे, गणेश डोळे, महेंद्र ढवण, अल्पना जाधव आदी उपस्थित होते. सप्ताहाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून करण्यात आली. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी लयबद्ध संचालन करीत मान्यवरांना सलामी देत सर्वांचे लक्ष वेधले. सप्ताहामध्ये खो-खो, कबड्डी, डॉजबॉल, लंगडी, बेसबॉल,क्रिकेट, धावणे, थाळीफेक, गोळाफेक भालाफेक, लिंबू चमचा पोत्यातील उड्या, बेडूक उड्या अशा वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धा अतिशय चुरशीच्या होत आहेत. या क्रीडा स्पर्धेमध्ये सांघिक सामन्याची चुरस वाढत असताना महेंद्र डवण आणि सना कुरेशी यांनी करत असलेले समालोचन सामन्यात रंगत आणली. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक सना कुरेशी, मंदाकिनी बसाटे, गुलनाज शेख, सूर्यकांत भालेराव, राजशेखर बामगोंडे तर शिक्षकेतर कर्मचारी बिरू मामा, पोर्णिमा पाटील, नितीन बोराडे हे परिश्रम घेत आहेत. क्रीडा सप्ताहाचे संस्थेचे संस्थापक सचिव हाजी बी. एम. शेख यांनी कौतुक केले.

# एन.ए.बी. निवासी अंध कार्यशाळेची क्रीडा स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर समाज कल्याण विभाग यांच्यावतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त झालेल्या जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेने क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत कामगिरी केली.

सांस्कृतिक स्पर्धेमध्ये शिवशरण गडदरे या विद्यार्थ्याने ''लखख प्रकाश'' गोंदळी गीत या गाण्याला द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच सांस्कृतिक जनरल चॅम्पियनशिप कार्यशाळेस मिळाली. खेळाडूंना कार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी, रियाज मुल्ला, आकांक्षा भंडारे व श्रीनिवास समदुर्ले यांनी यांनी मार्गदर्शन केले लाभले.

**कामगिरी (प्रथम, द्वितीय) : पूर्णत्व अंध :** ५० मीटर धावणे : वयोगट २१ ते २५ : मोची आमसिद्ध हणमंत, द्वितीय-चौगुले दयानंद भारत. वयोगट १६ ते २१वर्ष : राठोड प्रवीण भारत, हळकुंटे लक्ष्मण अशोक.

**अंशत: अंध :** १०० मीटर धावणे : वयोगट १६ ते २१ : हर्षद देवराव पुंडगे, थ्वन्टे शिवराज शरणप्पा. ५० मीटर धावणे (अंशत:अंध- वयोगट २१ ते २५ : नागटिळक कृष्णा बाजीराव, स्वामी बसय्या पंचय्या. लांब उडी : मोची आमसिद्ध हणमंत,शिंदे कालिदास तानाजी.



# पुरुष गटात सोलापूर, महिला गटात कोल्हापूर विभागास विजेतेपद

## डॉ. आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ आंतर विभागीय बास्केटबॉल स्पर्धा



**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे अंतर्गत आंतर विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत पुरुष गटात सोलापूर विभागाने तर महिला गटात कोल्हापूर विभागाने विजेतेपद पटकाविले.

एन. के. ऑर्किड महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या स्पर्धेत सहा विभागाच्या संघानी भाग घेतला होता. या स्पर्धेचे उद्घाटन बाटूचे क्रीडा समन्वयक डॉ. बालाजी फुलचवड यांचे हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ बी के सोनगे, उपप्राचार्य डॉ. व्ही. के. पत्की, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन, सिव्हीलचे विभाग प्रमुख डॉ. एस. बी. मोरे, रजिस्टार एस. एस. शेळके आदी उपस्थित होते.

महिला गटात कोल्हापूर विभागाने नागपूर विभागावर विजय मिळविला. पुरुष गटात सोलापूर विभागाने जळगाव विभागावर विजय मिळविला. विजेत्या संघास ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर आर. आर. पाटील व सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धा पार पाडण्यासाठी प्रा मल्लिकार्जुन आवटे, प्रा ऋचा श्रीराम, वामन पवार, इकबाल शेख, दादा पांगळे, प्रमोद लिगाडे आंदीनी सहकार्य केले.

# सोलापूरचे अतिश शहा यांची १०० कि.मी. मॅरेथॉन शर्यत यशस्वी

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**




येथील अतिश शहा यांनी १०० किमी धावण्याची शर्यत जैसलमेर (राजस्थान) येथे अतिश शहा यांचे १०० कि.मी.ची बॉर्डर मॅरेथॉन शर्यत १३ तास २२ मिनिटात मध्ये पूर्ण केली. यासाठी १६ तास अशी वेळ दिली होती. ही भारतातील खूपच कठीण रेस आहे. स्टार्ट आणि फिनिश वेगळे असते. पूर्ण वाळवंटी, निर्मनुष असा रोड, आजू बाजूला फक्त आणि फक्त कोरडे वाळवंट, हजारो मैल बंजार जमीन दिसते. या स्पर्धेला ७०० स्पर्धक संपूर्ण भारतातून सहभागी झाले होते. अशा कठीण परिस्थितीतही शहा यांनी ही स्पर्धा पूर्ण करून आपली शारीरिक आणि मानसिक क्षमता सिद्ध केली आहे.

# जिल्हा क्रॉस-कंट्री अजिंक्यपद स्पर्धा २४ डिसेंबरला सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने जिल्हा क्रॉस-कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन २४ डिसेंबर रोजी केले आहे. ही स्पर्धा शासकीय मैदान नेहरू नगर येथील वाकिंग ट्रॅकवर होणार आहे.

यामध्ये १६, १८ व २० वर्षांखालील आणि खुला पुरुष व महिला गटात होईल. यातून राज्य स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवडण्यात येणर आहे. या स्पर्धेसाठी ओळखपत्र, आधारकार्डसह ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका यांचा जन्म तारखेचा दाखला तसेच एएफआय युआयडी असणे अनिवार्य आहे. खेळाडूंची जन्मतारीख २० वर्ष वयोगटासाठी (१३ जानेवारी २००५ ते १२ जानेवारी २००७), १८ वर्षेसाठी (१३ जानेवारी २००७ ते १२ जानेवारी २००९), १६ वर्षेसाठी (१३ जानेवारी २००९ ते १२ जानेवारी २०११) या प्रमाणे दि. २४ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता रिपोर्टच्या अगोदर प्रवेशीका भरुन कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक आहे. ही समृद्धी स्पोर्ट्सचे संस्थापक संजय सावंत यांनी प्रायोजित केली आहे.



क्रॉस कंट्री प्रमुख श्रीरंग खांडेकर (मो. नं ८८३०४७३५९२) व रवी राठोड (९६३७९२४९२७) यांच्या तांत्रिक व स्पर्धा नियोजन प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. अधिक माहितीसाठी सचिव प्रा राजू प्याटी मोबाईल नंबर ९३२६०५५९४० सचिव यांच्याशी संपर्क साधावा असे सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेश पवार यांनी कळविले आहे.

# खो-खो च्या प्रचार व प्रसारासाठी जागतिक खो-खो स्पर्धेत परदेशातील खेळाडूंना मार्गदर्शन करणार

**धाराशिव, दि. १८ डिसेंबर -**

खो-खो च्या प्रचार व प्रसारासाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. नरेंद्र कुंदर (मुंबई उपनगर) व राजेंद्र साप्ते ( पुणे) हे अनुक्रमे केनिया व दक्षिण आफ्रिकेच्या खो खो संघाना प्रशिक्षण देणार आहेत. तशी संधी त्यांना खो खो फेडरेशन ऑफ इंडियाने दिली असल्याची माहिती, फेडरेशनचे सहसचिव तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी दिली.

दिल्ली येथे १३ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत पहिली जागतिक अजिंक्यपद खो खो स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या केनिया व दक्षिण आफ्रिका या संघांना ते मार्गदर्शन करणार आहेत. हे दोघेही लवकरच दोन्ही देशात जाऊन संबंधित देशाच्या संघाला मार्गदर्शन करतील. त्यांचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## मुंबईचे नरेंद्र कुंदर, पुण्याचे राजेंद्र साप्ते या प्रशिक्षकांची निवड



**डॉ. नरेंद्र वि.कुंदर (केनियाचे प्रशिक्षक) :** एमपीएड, पीएचडी, एनआयएस प्रशिक्षित प्रशिक्षक. प्रा. जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे मुंबई येथे क्रीडा शिक्षक. महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडेमी संघाचे मुख्य खो खो प्रशिक्षक.२०१० चा उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन. २०१६ साली १२ व्या साउथ एशियन खेळात खो खो क्रीडाप्रकारात सुवर्णपदक विजेत्या भारतीय खो खो संघाचे प्रशिक्षक. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या कुमार, मुली, महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती व सर्व गटात सुवर्णपदक प्राप्त. राष्ट्रीय खो खो पंच. २००६ पासून महाराष्ट्र खो खो असोसिएशन तांत्रिक समिती सदस्य. आतापर्यंत ७५हून अधिक खेळाडूंनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. ३ खेळाडूंनी खो खो खेळाकरिता भारताचे प्रतिनिधित्व.



**राजेंद्र मोतीराम साप्ते (दक्षिण आफ्रिकेचे प्रशिक्षक) :** बी.ए., एन. आय.एस. प्रशिक्षित प्रशिक्षक पदविका. क्रीडा व युवक सेवा संचालनालयात१९९८ पासून राज्य क्रीडा मार्गदर्शक ऑक्टोबर २०२२ मध्ये तालुका क्रीडा अधिकारी हिंगणा, नागपूर येथे कार्यरत. १९९८ आज रोजी पर्यंत पासून क्रीडा विभागच्या शालेय, महिला व ग्रामीण, पायका या राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत निवड समिती व प्रशिक्षक म्हणून १४, १७,१९ वयोगटासाठी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती. सर्व खेलो इंडिया राज्य व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड समिती सदस्य व प्रशिक्षक नियुक्ती. महाराष्ट्र खो खो असोसिएशन १४ वर्ष व वरीष्ठ गटासाठी राष्ट्रीय, फेडरेशन, पश्चिम विभाग, निमंत्रित स्पर्धेत प्रशिक्षक नियुक्ती. २०१६ मध्ये तिस-या अशियाई खो खो स्पर्धा पुरुष गटासाठी प्रशिक्षक. २०१८ मध्ये पहिली आंतरराष्ट्रीय टेस्ट सिरीज इंग्लड येथे पुरुष गटासाठी प्रशिक्षक. २०१७ इंग्लड संघाचा भारत दौरामध्ये एरेली येथे संघासाठी मार्गदर्शन वर्ग. २०१९ खो खो प्रिमिअर लीग प्रशिक्षण शिबिर, दिल्ली. २०२१ प्रशिक्षकांचे व खेळाडूंचे राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर व प्रो स्पर्धा फरीदाबाद /दिल्ली. २०२१ राष्ट्रीय प्रशिक्षक डेव्हलपमेंट प्रोग्राम फरीबदाबाद. २०२३ महाराष्ट्र खो खो असोसिएशन प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर. २०२४ राष्ट्रीय प्रशिक्षक डेव्हलपमेंट प्रोग्राम. २०२२ राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर व अल्टीमेट लीग प्रशिक्षण शिबिर, बालेवाडी पुणे. २०२२ अल्टीमेट खो खो लीग स्पर्धा मुंबई खिलाडी मुख्य प्रशिक्षक.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### भीमा कारखान्याचा २,७०० रुपयांचा हप्ता जमा : विश्वराज महाडिक

**मोहोळ, दि. १९ डिसेंबर-**

तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील 'भीमा'चा २७०० रुपयांचा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येत असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी दिली. भीमा सहकारी साखर कारखान्याचा चालू गळीत हंगाम २०२४-२५ जोमाने सुरू असून, या हंगामात आजअखेर गाळप झालेल्या उसाला प्रतिटन २७०० रुपये पहिला हप्ता देण्यात आला आहे. २७०० रुपये याप्रमाणे होणारी सर्व रक्कम संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे,





माहितीही विश्वराज महाडीक यांनी दिली. कारखान्याचा गळीत हंगाम सक्षमपणे सुरू असून, तुलनेने यावर्षीचा हंगाम लहान असल्याने चालू गळीत हंगामात देखील जास्तीत जास्त उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने सर्व यंत्रणा नियोजनबद्धरीत्या काम करीत असून, गाळप हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे या हंगामतही भीमा कारखाना गाळपास येणाऱ्या उसाला सर्वांच्या बरोबरीने दर देण्यास कटिबद्ध आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. शेतकरी आणि कारखान्याची ऊस तोंडणी यंत्राला पसंती भीमा कारखान्याकडून ऊस तोडणीसाठी यंत्राला प्राध्यान्य देण्यात येत आहे. सध्या जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या उसतोड मजूर टोळ्या दाखल झालेल्या नाहीत. यामुळे यंत्राच्या साह्याने मोठ्या प्रमाणावर ऊस तोड केली जात आहे. तर ऊस टोळ्यांकडून वाहन धारकांची होणारी फसवणूक, शेतकऱ्यांची आर्थिक लूट या कारणांमुळे देखील शेतकरी आणि कारखान्याकडून यंत्राच्या साह्याने ऊस तोडीला प्राधान्य दिले जात आहे.

### कुर्डूवाडी जनता बँकेला बँको ब्ल्यू रिबीन पुरस्कार जाहीर

**कुर्डूवाडी, दि. १९ डिसेंबर-**

येथील जनता सहकारी बँक लि कुर्डुवाडी या बँकेस बँको ब्ल्यू रिबीन-२०२४ हा अत्यंत प्रतिष्ठेचा व सन्मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्याची माहिती या बँकेचे अध्यक्ष दिलीप तळेकर व उपाध्यक्ष किरण दोशी यांनी दिली. ६० ते ७० कोटी रुपयांच्या ठेवी असणाऱ्या राज्यातील सहकारी बँकेच्या सर्वोत्कृष्ठ कामगिरीबद्दल हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराचे निकष व निवड प्रक्रिया अंत्यत कठीण तसेच स्पर्धात्मक असूनही कुर्डुवाडी सारख्या ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या या बँकेने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर हा पुरस्कार पटकाविला आहे. यापूर्वीही सन १९९५ पासून आज तागायत या बँकस दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकस् असो. लि., दि महाराष्ट्र अर्बन को-आप बँकस् असो. लि. तसेच पंढरपूर अर्बन को-ऑप बँक शतकमहोत्सव समिती अशा विविध संस्थाकडून अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत, अशी माहिती या बँकेचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार सुरेश शहा, माजी अध्यक्ष अर्जुनराव बागल यांनी दिली. यावेळी या बँकेचे संचालक फुलचंद धोका, अशोक खाडे, दिलीप धोका, विक्रम बोरोड, विजयसिंह परबत, अरुण गिड्डे, अनिलकुमार पाटील चंद्रशेखर क्षीरसागर, वीरकुमार मेहता, ॲड. नरसिंह इंगळे, डॉ. मोनिका शहा, सुलभा दिंड-दास व सहा. व्यवस्थापक विजय गायकवाड हे उपस्थित होते. हा पुरस्कार सोहळा लोणावळा ॲम्बी व्हॅली येथे २७ ते २९ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या ॲडव्हांटेन अन्युल समिट -२०२५' या सहकारी बँकेच्या शिखर परिषदेमध्ये संपन्न होणार आहे.



### सेवानिवृत्तांनी मन सदैव निर्भय, आनंदी ठेवावे : बी. आर. देशमुख

**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**

सेवानिवृत्त लोकांनी सदैव सतर्क राहून घडणाऱ्या अपघातसारख्या घटनापासून स्वतःचा बचाव केला पाहिजे, मन सदैव निर्भय व आनंदी ठेवले पाहिजे, असा सल्ला कामगार नेते व विचारवंत बी. आर. देशमुख यांनी बार्शी सेवानिवृत संघाचेवतीने आयोजित केलेल्या 'पेन्शनर दिनाचे' कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय भाषणात दिला. व्यासपीठावर तालुका अध्यक्ष रमाकांत लिंबकर, उपाध्यक्ष उत्तम पोतदार, सरचिटणीस वसंत लोखंडे,सह चिटणीस . अनिलकुमार बंडेवार खजिनदार हरिभाऊ भांडवलकर व कार्यकारी मंडळाचे सदस्य सौ. सुमन चंद्रशेखर, मुळे उपस्थित होते. देशमुख यांनी अनेक देशामधील पेन्शनर स्थितीचा आढावा घेतला. प्रारंभी संघटनेचे अध्यक्ष श्री. रमाकांत लिंबकर यांनी पेन्शन चळवळीचा राष्ट्रीय आढावा घेतला. या सभेत जेष्ठ सदस्य प्राचार्य चंद्रकांत मोरे, मसाप अध्यक्ष पा. न. निपाणीकर, वैद्य, जाधवर, बोधले, सुधाकर कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार मूर्तीनी आपले मनोगत व्यक्त केले. याशिवाय जयवंत शिंदे, वसंतराव लोखंडे यांनी मनोगत व्यक्त केले. मुळे यांची नात भार्गवी मुळे हिने जलतरणमध्ये विक्रम केल्यामुळे तिचा व पालकांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शहाजी पवार यांनी तर आभार सुमन चंद्रशेखर यांनी मानले.



### श्री विठ्ठल कारखान्यात रस्ता सुरक्षेचे धडे

**पंढरपूर, दि. १९ डिसेंबर-**

तालुक्यातील वेणुनगर-गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखानाच्या वतीने केनयार्ड परिसरात ऊस वाहतुक करणाऱ्या बैलगाडी, डंपींग ट्रॅक्टर, ट्रॅक्टर व हार्वेस्टर या वाहनांना रिफ्लेक्टर व परावर्तित पडदे कारखान्याच्या वतीने वाटप करण्याचा कार्यक्रम बुधवारी संपन्न झाला. सोलापूरचे मोटार वाहन निरीक्षक सिध्दाराम पांढरे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक बाळासाहेब सलगर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अश्विनी पाटील, कर्मचारी पवन सरवदे, प्रफुल्ल पंडित, श्री विठ्ठल कारखान्याचे केन मॅनेजर ए. डी. वाघ, शेती अधिकारी गुळमकर, केनयार्ड सुपरवायझर जयंत सलगर, सुरक्षा अधिकारी अशोक सुर्वे, हेड क्लार्क विलास वाघ, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड यांच्या उपस्थित पार पडले.

# मंत्रीमंडळाचा विस्तार झाला, आता प्रतिक्षा महामंडळे, समित्यांची

## ● पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे नव्याने गठण कधी होणार?; वारकरी सांप्रदायाला उत्सुकता

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१९ डिसेंबर-**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य मंत्री मंडळाचा विस्तार केलेला आहे. आता केवळ औपचारिकता राहिलेली आहे मंत्र्यांच्या खाते वाटपाची. दुसरीकडे महायुतीतील प्रमुख पक्षांसह त्यांच्या मित्र पक्षांतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यां बरोबरच राज्यभरातील नागरिकांचे लक्ष आता लागलेले आहे ते विविध महामंडळे आणि समित्यांच्या नियुक्त्यांकडे. यामध्ये तिर्थक्षेत्र पंढरपूरातील अस्तित्वात असलेली विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती बरखास्त करुन नव्याने तिचे गठण किंवा पुर्नरचना कधी होणार? असा सवाल वारकरी सांप्रदायातील तमाम महाराज मंडळींकडून केला जात आहे.

नागपूर येथे नुकताच मंत्री मंडळाचा विस्तार झालेला आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या अखत्यारितील विविध महामंडळे आणि समित्यांच्या नियुक्त्यांकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. यामध्ये सर्वात महत्वाची देवस्थान समिती आहे ती महाराष्ट्राची अध्यात्मिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पंढरपूरची विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती २०१४ मध्ये राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर तत्कालीन विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती बरखास्त करुन भाजपा, शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेली मंदिर समिती नव्याने नियुक्त करण्यात आलेली होती. सुरुवातीला कराड येथील भाजपाचे नेते अतुलबाबा भोसले यांची मंदिर समितीच्या अध्यक्षपदी वर्णी लावण्यात आलेली होती. त्या नंतर भोसलेंना राज्यमंत्र्यांचा दर्जा देखील बहाल करण्यात आलेला होता. मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणूकीच्या अगोदर अतुल भोसले यांनी मंदिर समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे सहाजिकच सहअध्यक्ष असलेल्या गहिनीनाथ महाराज ओसेकर यांनीच अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. २०१९ च्या निवडणूकी नंतर शिवसेनेचे पक्ष



प्रमुख उध्दव ठाकरे यांनी भाजपाशी काडीमोड घेत काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सोबत घेऊन राज्यात महाविकास आघाडी स्थापन करुन सत्तेची सुत्रे आपल्या हाती घेतली. मुख्यमंत्रीपदाच्या ठाकरेंच्या कार्यकाळाला सुरुवात झाल्या नंतर काही महिन्यातच जगभरात कोरोनाचे महाभंयकर संकट आले. त्यामुळे सत्तास्थापन करुन देखील त्यांना महामंडळे तसेच समित्यांच्या नव्याने नियुक्त्या करता आल्या नाहीत. दरम्यान दोन, अडीच वर्षाचा कालावधी लोटल्या नंतर अचानक राज्यात उध्दव ठाकरेंचे एकनिष्ठ समजल्या जाणाऱ्या एकनाथ शिंदेंनी बंडांचे हत्यार उपसून भाजपाच्या मदतीने एकनाथ शिंदे यांनी राज्यात सत्ता परिवर्तन करीत शिंदे सरकार स्थापन केले. त्यांच्या दोन, अडीच वर्षाच्या कालावधीत देखील पंढरपूरची विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही. त्यामुळे सध्या देखील गहिनीनाथ महाराज ओसेकरांच्या अध्यक्षतेखालील मंदिर समितीमार्फत पंढरपूर देवस्थानचा कारभार चालविला जात आहे. कोरोनाच्या महामारीच्या काळात ओसेकर महाराजांच्या अध्यक्षतेखालील समितीने उत्तम प्रकारे मंदिर समितीचे व्यवस्थापन पार पाडले. त्या नंतरच्या काळात पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल रुक्मिणी मंदिराला मुळ स्वरुपात किंवा पुरातन झझाळी देण्याचे काम हाती घेण्यात आले. सुमारे दोन अडीच महिने त्यासाठी विठ्ठल मंदिर भाविकांना बंद ठेवण्याचा ऐतिहासीक निर्णय घेण्यात आला. सुमारे ७३ कोटी रुपये खर्चुन सध्या मंदिराला प्राचिनलुक देण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससह इतर मित्र पक्षांनी घवघवीत असे यश संपादन केले. न भुतो न भविष्यते इतक्या जागा जिंकून अखेर देवेंद्र फडवणीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या गळ्यात उपमुख्यमंत्रीपदाची माळ पडली. मंत्रीमंडळ विस्तार देखील झाला. खातेवापटाची ओपचारिकता केवळ बाकी असली तरी आता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडून राज्यात महामंडळाच्या तसेच विविध समित्यांच्या नियुक्त्या कधी केल्या जाणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे. समित्यांमध्ये पंढरपूरच्या देवस्थान समिती कोणत्या पक्षाच्या वाट्याला जाणार?, येथील समितीवर अध्यक्षपदी तसेच सदस्यपदी कुणाची वर्णी लागणार? कारण अगोदरच्या देवस्थान समिती मध्ये उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचे देखील काही सदस्य आहेत. त्यांचे काय होणार? या बरोबरच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षातील पदाधिकाऱ्यांना मंदिर समितीवर सदस्य म्हणून संधी मिळणार का? तसेच महायुतीमधील प्रमुख पक्षांच्या अध्यात्मिक सेनेला या समितीमध्ये स्थान मिळणार का? असे एक ना अनेक सवाल सध्या वारकरी सांप्रदायातील मंडळींकडून उपस्थित केले जात आहेत.

### पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचीदेखील फिल्डिंग

राज्यातील देवलायांचा विचार केला तर मुंबई येथील सिध्दविनायक, शिर्डी येथील साईबाबा आणि पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर ही प्रमुख देवालये मानली जातात. या देवालयांच्या शासन नियुक्त समितीवर पदाधिकारी किंवा सदस्य म्हणून वर्णी लागावी अशी प्रत्येकाचीच मनोमन इच्छा असते. त्यामुळेच सत्तांतरा नंतर सहाजिकच येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती देखील बरखास्त होवुन शासन नियुक्त पदाधिकारी व सदस्य बदलाच्या चर्चेचे वारे सध्या जोराने वाहू लागलेले आहे. त्यामुळेच या समितीवर पदाधिकारी किंवा सदस्य म्हणून आपली वर्णी लागावी म्हणून महायुती मधील भाजपा, शिवसेना, आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपआपल्या पक्ष प्रमुखांकडे फिल्डींग लावण्यास सध्या सुरुवात केलेली आहे.

### महायुतीच्या यशात महाराज मंडळींचे योगदान मोठे

राज्यात झालेल्या विधानसभा निवडणूकीत महायुतीच्या नेत्यांनी व्होट जिहादचा मुद्दा उचलून धरला होता. त्यांच्या या मुद्याला बळ देण्यासाठी राज्यभरातील महाराज मंडळींनी देखील आपआपल्या पध्दतीने देव, देश आणि धर्मासाठी मतदान करण्याचे अनुयायांना आवाहन केलेले होते. त्याचा परिणाम म्हणून कधी नव्हे ऐवढ्या प्रचंड जागा राज्यात महायुतीला मिळाल्या. त्यामुळे महायुतीची सत्ता स्थापन होण्यात महायुती मधील नेत्यांबरोबरच राज्यभरातील महाराज मंडळींचे देखील योगदान मोठे आहे. त्यामुळे राज्यभरातील विविध देवस्थान समित्यांच्या अध्यक्षपदावर कोण कोणत्या महाराज मंडळींची वर्णी लागते याकडे देखील आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे. या बरोबरच राज्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीवर वारकरी सांप्रदायातील कोणत्या महाराजांची अध्यक्षपदी वर्णी लागणार की सगळ्या बरोबर घेऊन काम केलेल्या आणि विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याशी सलोख्याचे संबंध असलेल्या गहिनीनाथ महाराज ओसेकरांच्या गळ्यात पुन्हा एकदा समितीच्या अध्यक्षपदाची माळ पडणार या बाबत उत्स्तुकता लागलेली आहे.

## राम शिंदे यांच्या निवडीमुळे पिलीवमध्ये आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ डिसेंबर-**

विधानपरिषदेच्या अध्यक्षपदी राम शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याने पिलीव परिसरातील धनगर समाजाने आनंदोत्सव साजरा केला.

महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभा निवडणुका झाल्या यामध्ये महायुती सरकार सत्तेत आले. यामध्ये भाजपा सर्वांत मोठा पक्ष म्हणून अस्तित्वात आला. महाराष्ट्रात मराठा समाजानंतर लोकसंख्येने धनगर समाज दोन नंबरला आहे. हा समाज विधानसभा निवडणुकीत भाजपच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहिल्याचे दिसून आले. कारण मराठा आरक्षण विरुद्ध ओबीसी आरक्षण हा लढा सुरू असल्याने ओबीसी समाज भाजपच्या बाजूने झुकला. पण मंत्रिमंडळ विस्तारात भाजपने धनगर समाजाला मंत्रिपद न दिल्यामुळे समाजात प्रचंड नाराजी पसरली होती. याबाबत सोशल मीडियावर भाजपविषयी समाजातील लोक प्रचंड नाराजी व्यक्त करीत होते. भाजपाने नेहमीच धनगर समाजाला फसविले आहे अशा प्रतिक्रिया येऊ लागल्या. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज राम शिंदे यांची विधानपरिषदेची सभापती म्हणून संधी दिली. त्यांना उमेदवारी देत सभापतीपदी बिनविरोध



**मुख्यमंत्री न्याय देतील**

याविषयी भाजपचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने यांना विचारले असता धनगर समाजाला फक्त भाजपच न्याय देऊ शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच धनगर समाजाचे सर्व प्रश्न मार्गी लावतील असा आशावाद यावेळी त्यांनी व्यक्त केला.

निवडून आणत धनगर समाजाची नाराजी दूर केली तर आमदार गोपीचंद पडळकर यांना भाजपमध्ये उज्वल भविष्य आहे ते आता पहिल्यांदा आमदार झाले आहेत. त्यांना पुढे भरपूर संधी मिळणार आहेत. त्यांनी समाजाची नाराजी दूर केली. त्यामुळे सध्या महाराष्ट्रातील धनगर समाजाची भाजपाविषयची नाराजी दूर झाली असून समाजात सध्या आनंदाचे वातावरण आहे.

## श्री विठ्ठल कारखान्याचा काटा चोख

### ● वैद्यमापन विभागाच्या भरारी पथक तपासणीत शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ डिसेंबर-**

तालुक्याचा आर्थिक कणा असणाऱ्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर नुकतेच वैद्यमापन विभागाचे अचानक भरारी पथक आले. त्यांनी केलेल्या तपासणीत पथकास कारखान्याचे सर्वच वजनकाटे बरोबर असल्याचे आढळून आले. त्यामुळे वजनात कोणताही गैरप्रकार नसल्याचे भरारी पथक व वैद्यमापन अधिकाऱ्याकडून शिक्कामोर्तब करण्यात आले.

कारखान्याचे चेअरमन तथा आमदार अभिजीत पाटील यांनी सतत आपल्या भाषणातून शेतकऱ्यांना विश्वास देत होते की, काटा कुठूनही करून या आमचा काटा चोख असणार आहे. वैद्यमापन पथकाने अचानक भेट देवून यावर शिक्कामोर्तब केले आहे. आमदार अभिजीत पाटील हे सतत सांगत आहेत की, भागातील शेतकरी सुजलाम् सुफलाम् झाला पाहिजे, त्यांची आर्थिक उन्नती होवून शेतकऱ्यांना जादा पैसे मिळावेत याकरिता कारखान्याचे संचालक मंडळ प्रयत्न करीत आहेत. वैद्यमापन विभागाच्या तपासणीत कारखान्याच्या काटपावर कोणताही गैरप्रकार अथवा वजनात तफावत नसल्याचे आढळून आले आहे, त्यामुळे वैद्यमापन विभागाच्या भरारी पथकाने देखील कारखान्याच्या प्रशासनाचे कौतुक केले. काटा कुठूनही करून या असे चेअरमन व संचालक मंडळानी जाहीर केल्याने श्री विठ्ठल कारखाना हा शेतकऱ्यांना केंद्र बिंदु मानून काम करीत आहे. नेहमीच शेतकऱ्यांच्या विश्वासाला जपत असल्याने चालु गाळप हंगाम यशस्वी करू असे कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.बी.पाटील यांनी सांगितले. वैद्यमापन तपासणी पथकामध्ये उपनियंत्रक वैद्यमापनशास्त्र पुणे सतिश अभंगे, सहाय्क नियंत्रक वैद्यमापनशास्त्र इंदापूर विभागचे अंकुश इंगोले, निरीक्षक वैद्यमापनशास्त्र पुणे टी.के.पाटील, निरीक्षक वैद्यमापनशास्त्र खेड विभाग प्रदिप बागडे यांचेसह शेतकरी, वाहन मालक उपस्थित होते. तसेच तपासणीवेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक, जनरल मॅनेजर, वनर्स मॅनेजर व केनवार्ड सुपरवायझर उपस्थित होते.

# उजनी पर्यटनस्थळ विकासावर उठवला आवाज

## ● आ. अभिजीत पाटील यांनी मांडले मुद्दे; सीना-माढा उपसा सिंचन योजना, तुळशी, बावीसह अनेक गावांचा पाण्याचा गंभीर प्रश्न पोहचला विधानभवनात

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १९ डिसेंबर-**

माढा विधानसभा मतदारसंघाचे नुतन आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या मतदारसंघाचा विकास साधण्यासाठी सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून मागील दोन दिवसापासून नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचा माढा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर आवाज उठवण्याचे काम आमदार अभिजीत पाटील यांचे कडून सुरू आहे. मतदार संघातील विविध विकासकामांची मुद्देसुर मांडणी करीत आमदार अभिजीत पाटील यांचेकडून विविध विकास कामांची मागणी केली जात आहे.



माढा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील यांनी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही आपल्या मतदार संघांपैकी अनेक प्रलंबित आणि महत्वाच्या प्रश्नावर आवाज उठविला आहे. यामध्ये माढा शहरातील पाण्याची पाईपलाईन खराब असल्याने वर्षभरातील ३६५दिवसातील अवघ्या ३१दिवस पाणी पुरवठा केल्याचे निदर्शनास आणून देत. या पाईपलाईन दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी करण्यात आली आहे. उजनी धरणापासून जवळ असलेल्या आलेगाव आणि सुस्ते गावाजवळ बंधारे बांधण्यात येणार असल्याचे आश्वासन पालकमंत्री म्हणुन ना.चंद्रकांत पाटील यांनी २०१९ साली आश्वासन दिले होते. त्याचे पुढे काय झाले. याबाबतची आठवण करून देत याठिकाणी बंधारे बांधण्यात यावेत आशी मागणी आमदार अभिजीत पाटील यानी केली आहे. याशिवाय उजनी धरणाचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्याची ही त्यांनी आग्रही मागणी करून पुणे जिल्ह्याच्या सीमेवर असणारे हे धरण जर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित झाले तर सुट्टीच्या दिवशी या ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढून मोठ्या प्रमाणात अर्थकारणाला गती येईल ही बाब त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. विशेष म्हणजे या कामास मंजुरी मिळाली असून सदर काम त्वरित हाती घ्यावे अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय उजनी धरणामध्ये मत्स्यबीज सोडले जात नाही, त्यामुळे मासेमारी करणाऱ्या व्यावसायिकांची अडचण होते. यासाठी पुरेशा प्रमाणात मत्स्यबीज उजनी धरणात सोडले जावे याचीही मागणी पाटील यांनी आज विधिमंडळामध्ये केली.

### तुळशीतील सामुदायिक विवाह सोहळ्याचे अध्यक्षांनाच आमंत्रण

माढा तालुक्यातील आलेगाव, सुस्ते येथील बंधाऱ्याची कामे त्वरित पूर्ण करण्याची ही मागणी त्यांनी केली. तालुक्यातील तुळशी, बावी, परिते, जाधवाडी, बैरागवाडी या गावांनाही उजनीचे पाणी अद्याप मिळाले नाही. तसेच तुळशी गावात पाण्याची सोय नाही म्हणून येथील तरुणांची लग्न जमत नाहीत, असे सभागृहाला सांगून अभिजीत पाटील यांनी जर तुळशी गावाला पाणी दिले तर या गावात सामुदायिक विवाह सोहळा घडवून आणून खुद्द विधानसभेच्या अध्यक्षांनाच त्यासाठी आमंत्रित केले जाईल अशी ग्वाही त्यांनी सभागृहाला दिली. शिवाय मानेगाव उपसा सिंचन योजनाही पूर्णत्वास न्यावी याची आग्रही मागणी अभिजीत पाटील यांनी यावेळी केली. पंढरपूर तालुक्यातील करकंब येथील शिवकालीन तलावात देखील उजनीचे पाणी सोडण्याची व्यवस्था व्हावी यासाठी त्यांनी मागणी केली.

### जनतेकडून जोरदार स्वागत

सलग दुसऱ्या दिवशी प्रश्न मांडण्याची संधी मिळाल्यानंतर त्या संधीचे सोने करताना आमदार पाटील यांनी प्रचारादरम्यान मतदारांना दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करण्याच्या दृष्टीने अभ्यासपूर्ण मांडणी ते विधिमंडळात करत आहेत. नवख्या आमदाराकडून असे जनतेचे निगडित असणारे प्रश्न मांडले जात असल्यामुळे माढा मतदारसंघातील जनतेकडूनही त्यांच्या या भूमिकेचे जोरदार स्वागत होत आहे.




## बार्शीत काकासाहेब सुलाखे यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. डिसेंबर**

बार्शी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष कै. भगवत पंढरीनाच तथा काकासाहेब सुलाखे यांची १३८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्रांगणामध्ये त्यांना मानवंदना देण्यात आली.

स्वागत सुलाखे इंग्लिश मिडीयमच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत म्हणून केले. प्रतिमेचे पूजन करुन मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार राजाभाऊ राऊत, बार्शीचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, श्री. अनिल बनसोडे (प्रशासन अधिकारी, बा.न.शि.मं. बार्शी), प्रप्रमुख वक्ते. उन्मेश आटपाडीकर सर, बार्शी न. प. चे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, डॉ. ना. पां. देशपांडे, श्री. मनगोलीकर सर, श्री. रविकिरण सुर्यवंशी सर, सर्व मॅनेजिंग बोर्डाचे सदस्य, सर्व शाखांचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव श्री. अनंत कवठाळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी कै. काकासाहेब सुलाखे यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा आढावा घेतला. प्रमुख पाहुण्यांनी काकासाहेबांच्या कार्याचे गुणगौरव आपल्या मनोगतातून केले. प्रमुख वक्ते प्रा. आटपाडीकर सर यांनी काकासाहेबांच्या अंगी दातृत्व, नेतृत्व व कर्तुत्त्व हे गुण होते असे सांगितले. आभार उमेश नायकुडे यांनी मानले तर कार्यकमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर खुने यांनी केले. याप्रसंगी बुधवार दि. ११ डिसेंबर रोजी शिशूविहार या शाखेचा विविध गुणदर्शनाचा, दि. १२ डिसेंबर रोजी नवीन मराठी शाळा या शाखेचा विविध गुणदर्शनाचा, दि. १३ डिसेंबरला सुलाखे इंग्लिश मिडीयमचा विविध गुणदर्शनाचा, दि. १४ डिसेंबरला सुलाखे हायस्कूलचा कार्यकम संपन्न झाला. अध्यक्ष आनंद सुलाखे यांनी या सर्व कार्यकमास शुभेच्छा दिल्या.

सलग ५ दिवस चालणाऱ्या जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमाची सांगता संस्थेतील विविध शाखांच्या शिक्षक व कर्मचारी यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून गीत गायनाचा कार्यकम ठेवून करण्यात आला. सुलाखे हायस्कूलच्या सेवकांची सहकारी पतसंस्था यांनी या कार्यकमाचे आयोजन केले होते.

## संक्षिप्त वृत्त



### गुलाब पुष्प प्रदर्शन, पुष्परचना स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
द रोज क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने शहरात प्रथमच गुलाबपुष्प प्रदर्शन व पुष्परचना स्पर्धा आयोजित करण्यात आली असून लोगो व पोस्टरचे अनावरण उद्योगपती दत्ताअण्णा सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. २७ व २८ डिसेंबर रोजी जुन्या वालचंद कॉलेजजवळील लोटस मल्टिपर्पज हॉल येथे हे प्रदर्शन व पुष्परचना स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विविध प्रजातीचे गुलाब पुष्प व विविध प्रकारच्या पुष्परचना, पुष्प रांगोळी स्पर्धा व प्रदर्शनाच्या माध्यमातून सोलापूरकरांना एकत्रित पाहावयास मिळणार आहेत. पोस्टरचे डिझाईन केलेल्या श्रेया धायफुले हिचा सत्कार यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमास लायन्स क्लब सोलापूरचे अध्यक्ष दिनेश बिराजदार व सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चे सचिव चंद्रकांत रेंबर्सू यांच्या उपस्थितीत पार पाडले. यावेळी संस्थेचे संस्थापक प्रकाश भुतडा, अध्यक्ष ममता बोलाबत्तीन, पुष्पावती गुंगे, वैशाली कुलकर्णी, विक्रम फुटाणे, विजय वाडेकर, उदय कुंभार, गुरुचरण गेदू, वैशाली बत्तुल, सुरेखा भंडारी, वीणा मेतन, रेणुका चिकमठ, शशिकला सिंगम, कला चन्नापट्टण, मंजुषा वल्लाकाटी, शांता सुशामी व्हटकर, भूदत्त, लताश्री म्याना, विजया देवसानी, संगीता धायफुले, संगीता खंदारे, दिव्याराणी पोलास उपस्थित होते. सूत्रसंचालन शांता येळंबकर यांनी केले, आभार सुनील पवार यांनी मानले.


### उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांची जिल्हा पर्यटन अधिकारी म्हणून नियुक्ती

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असणारे महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्याकडे जिल्हा पर्यटन विभागाचे प्रमुख म्हणून शासनाने जबाबदारी दिली असल्याने महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाकडून त्यांच्या या निवडीबाबतचा आदेशही प्राप्त झाला आहे. या दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या काम ाबाबत समन्वय व सनियंत्रण साधण्यासाठी ही जबाबदारी आपल्यावर दिली आहे. नव्या सरकारचा हा आदेश प्राप्त होताच नाटेकर यांनी तातडीने कामालाही सुरूवात केली आहे. यासाठी त्यांनी जिल्हा पर्यटन समिती नेमून आता जिल्ह्यातील तालुकास्तरीय पर्यटन समित्याही नेमण्याची जबाबदारी प्रत्येक तहसीलदारांना दिली आहे. या त्यांच्या कामाच्या गतीमुळे जिल्ह्यातील पर्यटन विकासाला चालना मिळण्याचे संकेत मिळत आहेत.



### साने गुरुजी पतसंस्थेच्यावतीने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त उद्या रंगभरण स्पर्धा

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्यावतीने रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहीती पतसंस्थेचे संचालक सुनील चव्हाण यांनी दिली. पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धा शनिवार दि.२१ रोजी शाळास्तरावर घेण्यात येणार आहे. स्पर्धा तीन गटात पार पडणार आहे.गट पहिला इयत्ता १ली, २ री गट दुसरा इयत्ता ३री,४थी,गट तिसरा इयत्ता ५वी, ६वी, ७वी. स्पर्धेसाठी चित्र पतसंस्थेच्यावतीने पुरविण्यात येणार आहे.प्रत्येक गटातुन प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत.स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन जागतिक किर्तीचे चित्रकार नितीन खिलारे हे काम पाहणार आहेत.यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात येणार आहे.स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. असे अवाहन आप्पाराव इटेकर, भिमराया कापसे, विरभद्र यादवाड,सचिन चौधरी,मुरलीधर कडलासकर, विनोद आगलावे, उल्हास बिराजदार,भाऊसाहेब मोरे, जयंत गायकवाड,शिवानंद हिरेमठ, धनाजी मोरे, महादेवी पाटील व फरजाना रचभरे यांनी केले आहे.





### पानगल प्रशालेत विद्यार्थ्यांनी घेतला फूड फेस्टिवलचा आनंद

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**
एम.ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मध्ये पानगल फेस्टिवल अंतर्गत फूड फेस्टिवलचे उद्घाटन मुख्याध्यापक हारून बंदूकवाले व डॉ. सना फारुकी यांच्या हस्ते झाले. नईम शेख मेमोरियल हॉलमध्ये याचे आयोजन केले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. हारुन रशीद बागबान, मुख्याध्यापिका डॉ. सुरय्या परविन जाहागीरदार व बेगम कमरूननिसा कारीगर गर्ल्स हायस्कूलच्या प्राचार्य तहसीना शेख, आरिफ पठाण तसेच फूड फेस्टिवल इन्चार्ज फौजीया शेख व इद्रीस पेरमपल्ली, हाजरा माशाळवाले उपस्थित होते. सूत्रसंचालन अल्ताफ सिद्दिकी यांनी केले. इद्रीस पेरमपल्ली यांनी आभार मानले. फेस्टिवलमध्ये १६० स्टॉल लावण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इन्चार्ज फौजीया शेख, इद्रिस पेरमपल्ली, अकबर पठाण, अब्दुल खालिक मुल्ला, लुबना शहापुरे, फरहत शेख, आफरीन शेख, मोहम्मद अली शेख, अल्ताफ सिद्दिकी, नावेद मुनशी, खालील पेरमपल्ली, निखत नल्लानंदू, महमूद खतीब, मोहसीन माशाळ आदींनी परिश्रम घेतले.

# कुमठा नाका परिसरात दगडफेक; अफवा असल्याचा पोलिसांचा दावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
परभणी येथील घटनेनंतर सोलापुरात एसटी तोडफोड तसेच पेटवण्याचा प्रकार नुकताच घडला. त्यानंतर गुरुवारी दुपारी चारच्या सुमारास कुमठा नाका परिसरात दगडफेकीचा प्रकार घडल्या बाबत नियंत्रण कक्षाकडून समजल्यानंतर सदर बझार पोलिसांनी मोठा फौजफाटा तेथे तैनात केला. दरम्यान असा कोणताही प्रकार येथे घडला नसून ही केवळ अफवा असल्याचा दावा सदर बाजार पोलिसांनी केला आहे.

काही दिवसांपूर्वी परभणी जिल्ह्यात घटनेच्या प्रतिमेची विटंबना झाली होती. यानंतर त्याचे पडसाद राज्यात विविध शहरात दिसून आले. सोलापूर शहरातील या घटनेनंतर तीन एस्टींवर दगडफेक तसेच एसटी स्टँड परिसरात एक एसटी पेटवून देण्यात आली होती. याप्रकरणी पोलिसांनी एकाच ताब्यात घेतले. या प्रकारानंतर एक दिवस उलटला. गुरुवारी दुपारी चार वाजता पोलीस आयुक्तालयातील नियंत्रण कक्षात ११२ क्रमांकावर अज्ञात



व्यक्तीने फोन करून कुमठा नाका परिसरात दगडफेक होत असल्याबाबत माहिती दिली. यानंतर तातडीने नियंत्रण कक्षातून सदर बाजार पोलिसांना याबाबतची माहिती देण्यात आली. सदर बाजार पोलिसांचे पोलीस निरीक्षक अजित लकडे व इतर अधिकारी व पोलीस कुमठा नाका परिसरात पोहोचले. त्यांनी परिसरात पाहणी केली असता तेथे लोकांची गर्दी दिसून आली. त्यांना पोलिसांनी तेथून हुसकावून लावले. यादरम्यान तेथून जाणाऱ्या दोघांना पोलिसांनी संशयातून ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडे चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेबाबत बोलताना सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी दगडफेकीचा कोणताही प्रकार घडला नसून ही केवळ अफवा असल्याचा दावा केला आहे.

दरम्यान लोकांनी कोणतीही अफवा पसरवू नये तसेच अफेवर विश्वास ठेवू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक लकडे यांनी केले आहे. एसटीवर दगडफेक तसेच एसटी पेटवून देण्याच्या प्रकारानंतर शहरात पोलिसांची गस्त वाढविण्यात आली आहे. शहरातील विविध संघटनांकडून परभणी येथील घटनेचा निषेध नोंदविण्यात येत आहे

# श्री गणेश पिरॅमिड केंद्रात उद्या अखंड ध्यान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर**
जागतिक ध्यान दिन २१ डिसेंबर. या दिनानिमित्त ब्रह्मर्षि पितामह सुभाष पत्रीजी यांच्या प्रेरणेने दि सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्टतर्फे श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर नवीन योशोधरा हॉस्पिटल जवळ, सागर चौक पाणीटाकी जवळ, हैद्राबाद रोड येथे शनिवारी २१ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ पर्यंत प्रत्येक तासाला ध्यान शिबिर या प्रमाणे अखंडपणे ध्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहे.

नुकतेच संयुक्त राष्ट्र महासभा भारताद्वारे सहप्रायोजित ठराव एकमताने मंजूर करत २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दिवसभर तज्ञ ध्यान मास्टरांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. ज्यांना जसा वेळ उपलब्ध आहे त्याप्रमाणे या ठिकाणी भेट देऊन ध्यानाचा लाभ घ्यावा. ब्रह्मर्षि पितामह सुभाष पत्रीजी यांनी ध्यानवर्गासाठी पीएसएसएमची स्थापना केली.



पीएसएसएमच्या माध्यमातून सोलापूरात विविध ध्यान वर्ग घेण्यात येते. पिरॅमिड ऊर्जा ही ध्यानासाठी सहाय्यभूत असते. सोलापूरकरांनी जास्तीजास्त संख्येने या शिबिरात भाग घ्यावा. ध्यानातून प्राप्त होणारे आंतरिक समाधान आणि शांती यांचा अनुभव घ्यावा असे आवाहन ''पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटीज मुव्हमेंट'' चे अध्यक्ष जी चंद्रशेखर रेड्डी यांनी केले आहे. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी, गणेश म्याकम ९८६७८१८५६७, श्रीनिवास पोला ९६०४९६९७९८, व्यंकटेश आडम ९१९३७१७७८५८५ यांच्याशी संपर्क साधावश.



# सोलापुरात आयआयटी, आयआयएम सारख्या संस्था स्थापन कराव्यात

- खासदार प्रणिती शिंदे यांची मागणी
- केंद्रीय शिक्षणमंत्री प्रधान यांच्याकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापुरात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) सारख्या प्रमुख संस्थांची स्थापना करण्याची विनंती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेद्र प्रधान यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनाद्वारे अशी मागणी केली की, सोलापूरला समृद्ध सांस्कृतिक आणि शैक्षणिक वारसा आहे. येथे आयआयटी आणि आयआयएम कॅम्पसची स्थापना केल्याने विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील.

सोलापूरचे मध्यवर्ती स्थान आणि औद्योगिक क्षमता, शिक्षणास पोषक वातावरण यामुळे या प्रतिष्ठित संस्थांसाठी सोलापूर योग्य पर्याय आहे. सोलापूरसारख्या टियर-२ शहरात आयआयटी आणि आयआयएम स्थापन केल्याने शहरी-ग्रामीण शैक्षणिक दरी कमी होण्यास मदत होईल आणि दर्जेदार शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध होतील. तसेच या संस्थांमध्ये सोलापुरची शैक्षणिक आणि आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होईल.

# महापालिकेच्या विशेष स्वच्छता मोहिमेत बालाजी अमाईन्ससह ग्रुपचा सहभाग

**महावीर चौक ते आसरा चौक रस्त्याची केली साफसफाई**

**कंपनीतील ८० कर्मचारी, अधिकाऱ्यांनी नोंदविला सहभाग**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर-**
महापालिकेच्या मुख्य रस्त्यांच्या विशेष स्वच्छता मोहीमम ध्ये बालाजी अमाईन्स, हॉटेल बालाजी सरोवर प्रिमिअर तसेच बालाजी ग्रुप मधील कंपन्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्वच्छता करत श्रमदान केले.

सोलापूर महापालिकेच्या वतीने शहरातील मुख्य रस्त्यांची विशेष स्वच्छता मोहीम दि. १९ डिसेंबर पर्यंत राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये बालाजी अमाईन्स , बालाजी सरोवर प्रिमिअर तसेच बालाजी स्पेशालिटी केमिकल्स या कंपनीमधील ८० कर्मचारी व अधिकारी वर्ग यांनी मोहिमेत सहाभाग घेतला.कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला.


सकाळी ८ ते १०.३० यावेळेत आसरा चौक ते महावीर चौक, होटगी रोड परिसरात ही स्वच्छता मोहीम राबवली. परिसरातील कचरा उचलून श्रम दानाने पुर्ण होटगी रस्ता स्वच्छ केला. बालाजी ग्रुप परिवारातील सर्वांनी कचरा उचलून स्वच्छता अभियानात श्रमदान केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांचा बालाजी अमाईन्सचे वित्त विभागाचे महाव्यवस्थापक अरुण मासाळ व एच. आर. मॅनेजर वर्षा गुंटूक यांच्या हस्ते एक रोप देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास महानगरपालिकेचे सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी बाबर, महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार, आरोग्य निरिक्षक नागनाथ मेंडगुळे, अनिल चराटे, महेश जाधव , बालाजी सरोवरचे मॅनेजर ब्रिजेश सिंह, महांतेश तोळणूर, बालाजी अमाईन्सचे अरुण मासाळ, वर्षा गुंटूक, असिफ कोतवाल, अजित जोडभावी, सुनिल गज्जम, जयंत बासुतकर गणेश धुमाळ, सिध्दाराम आहेरवाडी, दत्तप्रसाद सांजेकर , बालाजी ग्रुपचे सर्व कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.



**स्वच्छतेची जबाबदारी प्रत्येकाचीच : संचालक राम रेड्डी**
प्रत्येकानी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याकरीता या अभियानात सहभाग घेऊन महानगर पालिकेच्या कर्मचारी वर्गास साथ द्यावी. स्वच्छतेची जबाबदारी फक्त महानगरपालिकेच्या कर्मचारी वर्गाची नसून आपणा सर्वांची आहे, असे आवाहन बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी केले.

# महान शिवयोगी : १०८ श्री ष.ब्र. तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी

शून्यातून विश्व निर्माण करणारे अनेक संत महात्मे जगभरात होवून गेले आहेत. त्यांच्यामुळेच समाजामध्ये व मनुष्य जीवनामध्ये शांती, समाधान, सलोखा निर्माण होऊन विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होते. अशापैकीच महाराष्ट्रातले सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी या गावामध्ये श्री १०८ तपोरत्नं योगीराजेन्द्र शिवाचार्य नावाचे एक संत महंत शिवयोगी होऊन गेले. ते वीरशैव सांप्रदायाम धील एक अग्रगण्य शिवाचार्य होते. होटगी या गावामध्ये पंचाचार्यांच्या पाच पीठांपैकी श्रीशैल पीठ शाखीय बृहन्मठ आहे. गुरु शिष्य परंपरा असलेला हा मठ अतिशय पुरातन आहे. या मठाचे मठाधिपती म्हणून श्री १०८ तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य यांनी ६ फेब्रुवारी १९५६ रोजी पदभार स्वीकारला आणि आपल्या कार्याला सुरुवात केली. या त्यांच्या कार्यास त्यांचे गुरु श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांचे भरभक्कम शुभाशिर्वाद होते.





भक्तगणामध्ये धार्मिक जागृती निर्माण करून त्यांना वीरशैव धर्माबद्दलची साध्यंत माहिती देण्यासाठी पूज्य महास्वामींनी त्यांच्या हयातीत ६१ श्रावणमास तपोनुष्ठाने अनेक पवित्र ठिकाणी केले. तसेच ६१ धनुर्मास अनुष्ठान केले व ६० नवरात्र अनुष्ठान केले. श्रावणमासात ४१ दिवसांचे तपोनुष्ठान व धनुर्मासात ३० दिवसांचे अनुष्ठान व नवरात्रीमध्ये ९ दिवसांचे तपोनुष्ठान करीत होते. या अनुष्ठानाच्या कालावधीमध्ये भक्तगण त्यांच्या दर्शनासाठी सोलापूरहून जात असत. त्यामुळे या निमिताने भक्तांचे प्रत्येक वर्षी गुरुयात्रा केल्याचे पुण्य प्राप्त करुन घेत असत. पूज्य महास्वामीजींचे अनुष्ठान व अनुष्ठान कालावधी मधील महापूजा म्हणजे तपोबल वाढविणारे एक साधना होती. या साधनेमुळे पूज्य महास्वामीजी भक्तांच्या हृदयात स्थान करून राहिले.

अशा या धार्मिक कार्याबरोबरच पूज्य महास्वामीजींनी शैक्षणिक कार्य देखील जोमाने केले.खेड्यातल्या भक्तगणांच्या पाल्यांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी शाळा काढण्यास सुरुवात केली. १९५९ मध्ये होटगी व बोरामणी या गावामध्ये माध्यमिक शाळेची मुहूर्तमेढ केली. त्यानंतर लिंबीचिंचोळी, विडीघरकुल, अरळी, धोत्री, दर्गनहळ्ळी, सातनदुधनी, बोरेगाव, कलबुर्गी, तळवारगेरा, दिल्ली, सोलापूर, इत्यादी ठिकाणी पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालये, डीएड कॉलेज, बीएड कॉलेज इत्यादी सुरु केले. अशा प्रकारे सुमारे त्रेपन्न ते चौपन्न शाखा कार्यरत आहेत. याच बरोबर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु केले आणि सोलापूर येथे एक सार्वजानिक वाचनालय सुरु केले व यासोबतच एक प्रिंटींग प्रेस जे पूर्वी होते, त्याचे नूतनीकरण केले. त्याचबरोबर एक संगीत विद्यालय देखील सुरु केले. अशा प्रकारे पूज्य महास्वामीजींनी आपल्या गुंरुचे शैक्षणिक कार्याचे स्वप्न पूर्ण केले. आज एम.आय.डी.सी. सोलापूर येथे असलेले एक भव्य दिव्य शिक्षण संकुल आणि पूज्य महास्वामीजींनी स्वतःच्या कल्पनेतून त्यांचे गुरु लिं.श्री ष ब्र वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजींचे एक भव्य मंदिर बांधलेले आहेत. त्यांचे हे कार्य न भूतो न भविष्यती अशा प्रकारचे आहे. त्यांचे हे कार्य म्हणजेच त्यांच्या जवळील आपल्या गुरुंबद्दलची श्रद्धा, निष्ठा, भक्ती व आनंद यांचे प्रतिक आहे. पूज्य महास्वामीजींनी सोलापूर येथील श्री वीरतपस्वी मंदिरालगतच एक अन्नछत्रालायाची निर्मिती केली. परगावाहून आलेल्या भक्तांसाठी या ठिकाणी प्रसादाची सोय केली व स्थानिक भक्तांना देखील ते दुध प्रसाद म्हणून देत असत. आलेल्या भक्तांची त्यांचे क्षेमकुशल विचारुन त्यांना योग्य मार्गदर्शन करुन त्यांच्या समस्येचे निराकरण करीत असत. ते कोणत्याही भक्ताला लिंबू दोरा-गंडा वगैरे बांधण्याचे काम करीत नसत. परमेश्वरावर श्रद्धा व विश्वास ठेवा. परमेश्वराचे सतत चिंतन करा म्हणजे तुमच्या जीवनात निश्चितपणे तुम्हाला सुख, शांती मिळेल अशा प्रकारचे मार्गदर्शन करुन भक्तांमध्ये जगण्यासाठी उर्जा निर्माण करीत होते म्हणून ते भक्तांचे प्रेरणास्थान झालेले होते. पूज्य महास्वामीजींनी सोलापूर येथे आपल्या गुरूंचे म्हणजेच श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांचे मंदिर बांधल्यानंतर त्यांनी एक भव्य दिव्य १०१ फुट उंचीचे लिंगोद्भव मूर्तीची निर्मिती केली. व त्या मूर्तीभोवती १००८ लिंगांची स्थापना केली. त्यामुळे या ठिकाणाला फार मोठे महत्व प्राप्त झाले. त्यांच्या या भव्यदिव्य कार्यामुळे होटगी मठाचे कार्य फक्त वीरशैवांनाच नव्हे तर सर्व समाजाच्या शिवभक्तांना याचा अभिमान वाटत आहे. आणि या कार्यामुळे ते अजरामर ठरलेले आहेत. हे कार्य करीत असतानाच त्यांना कळून चुकले कि आता माझे सर्व कार्य संपलेले आहे आणि आता आपण भक्तांचे निरोप घ्यावे. म्हणून त्यांनी भक्तांना व शिष्यगण यांना याची कल्पना दिली.

**सर्वेअपि सुखिना सन्तु ।**
**सर्व सन्तु निरामया**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु ।**
**मा काश्चिद दुख:माप्नुयात**



हा संदेश देवून २० डिसेंबर २०१७ रोजी सायंकाळी १०.०५ मिनिटांनी ते शिवैक्य झाले. त्यामुळे या महान शिवयोग्याला त्यांच्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम!!! धन्य ते शिवयोगी धन्य ते होटगीश्वर

**- ए. जी. कुंभार, ९८५००८५१५९**









**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एशियन सेंटर फॉर सोशल स्टडीजच्यावतीने आज गझल

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
एशियन सेंटर फॉर सोशल स्टडीज, सोलापूर व अंजुमन-ए-कदीर, सोलापूरच्या संयुक्त विद्यमाने सोलापूरच्या उर्दू साहित्यविश्वातील आश्वासक आणि सर्जनशील व्यक्तीमत्व, उर्दू ज्ञानविश्वातील समीक्षा, काव्य, भाषाशास्त्र अशा शाखांमध्ये केलेल्या कार्याचा गौरव म्हणून बशीर परवाज यांच्या ८०व्या वाढदिवसाच्या औचित्य साधून त्यांचा सत्कार सोहळा व गझलांचा कार्यक्रम शुकवार दि. २० डिसेंबर


बशीर परवाज अतुल बेले जैद अबुलहसन शेख

२०२४ रोजी सायं. ६.०० वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजुमन-ए-तरकी-ए-उर्दू हिंद, गुलबार्गा शाखेचे अध्यक्ष डॉ. अक्रम नक्काश तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड उपस्थित राहणार आहे. यावेळी प्रसिध्द गझल गायक अतुल बेले व जैद अबुलहसन शेख यांच्या गझल सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणार आहे. या कार्यक्रमास सर्व उर्दू प्रेमी व गझल प्रेमींनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन एशियन सेंटर फॉर सोशल स्टडीजचे आसिफ इक्बाल यांनी केले आहे.



# सोयाबीन, ज्वारीचे दर अजून स्थिरच

- बळीराजा नाराज
- हमीभाव केंद्रावर शेतकऱ्यांना भरोसा नाय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
गतवर्षीप्रमाणे यंदाही सोयाबीन व ज्वारीचे दर बाजारात स्थिरच राहिल्याने शेतकरी बांधवातून नाराजीचा सूर निघत आहे. दरम्यान, आता महायुतीच्या सरकारकडून सोयाबीन, ज्वारी दरवाढीची घोषणा दणक्यात होईल, असे वाटत नसल्याने अनेक शेतकरी कमी दराने सोयाबीन बाजार समित्यांकडे आणून विकू लागल्याचे चित्र आहे. तर राज्य सरकारच्या हमीभाव खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांच्या मालाची चारदा चाळण करून पैसेही वेळेत मिळत नसल्याची खंत काही शेतकऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली. यामुळे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रावर अनेक शेतकरी विश्वास ठेवण्यास तयार नाहीत.

आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सोयाबीनचा हमीभाव हा ४ हजार ८९२ रुपये इतका ठरला असून, तो गेल्यावर्षीपेक्षा २९२ रुपयांनी अधिक वाढला आहे. सोयाबीन खरेदीसाठी केंद्रही सुरु करण्यात आली असून, या केंद्रातही शेतकऱ्यांच्या मालाची २ ते ३ वेळा चाळणी करून त्या घेतलेल्या मालाचे पैसेही उशिराने मिळत असल्याने अनेक शेतकरी या खरेदी केंद्राचा नाद सोडून आता थेट कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडे आपला माल घेवून जावून घालत आहेत. इतकेच नाहीतर ज्वारीच्या भावातही अजिबात वाढ झाली नसल्याची माहिती काही आडत व्यापाऱ्यांनी दै. तरुण भारतशी बोलताना दिली. तर सध्या गव्हास चांगले मार्केट असल्याचेही सांगितले.

दरम्यान, आता एक-दोन महिन्यात ज्वारी शेतकऱ्यांकडे आल्यावर अजून भाव कमी होण्याचे संकेत आहेत. तर यंदा गहू पीकही चोहिकडे मुबलक झाल्याने हे उत्पन्नही शेतकऱ्यांच्या शेतात मुबलक पिकल्यावर त्याचाही भाव कमी होण्याची चिन्हे आहेत. साखरेचा भावही पडल्याने उसाचे दरही यंदा किती निघतात? याबाबत शेतकऱ्यांत उलट-सुलट चर्चा सुरु आहे. कांद्याचेही मार्केट दिवसेंदिवस कोसळत असल्याने जाणकार शेतकरीवर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# १२ जानेवारीपासून श्री सिध्दरामेश्वर महायात्रा

## महायात्रेचे सुक्ष्म नियोजन करा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
श्री सिद्धेश्वर महायात्रा दि. १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत आहे. या यात्रेदरम्यान ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी हजारो भाविक येतात तसेच होम मैदानावरील मनोरंजननगरी येथे मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहतात. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी यात्रा यशस्वी करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करून ठेवावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने यांनी केले.



नियोजन भवनाच्या सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत उपविभागीय अधिकारी पडदुने बोलत होते. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी रेणूका पाटील, अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क भाग्यश्री जाधव, पोलिस उपनिरिक्षक प्रकाश किणगी, विद्युत विभागाचे शाखा अभियंता यू.एस. पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता विशाल लेंगरे, महावितरण सोलापूर शहरचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता, सोलापूर महानगरपालिकेचे पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, यांच्यासह पोलीस व संबंधित विभागाचे अधिकारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.



यावेळी उपविभागीय अधिकारी पडदुने पुढे म्हणाले, यात्रा कालावधीत मंदिर, मंदिर परिसर व होम मैदान या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अत्यंत चोख असावी. पोलीस विभागाने यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांची गर्दी विचारात घेता योग्य नियोजन करावे. देवस्थान समितीनेही त्यांच्याकडील स्वयंसेवक व कर्मचारी गर्दीवर नियंत्रणासाठी पोलीस विभागाला सहकार्य करतील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले. श्री सिद्धेश्वर महायात्रा कालावधी जवळपास एक महिन्याचा असल्याने या कालावधीत सर्वसामान्य नागरिक भक्तगण यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी यासाठी वाहतूक विभागाने वाहन व्यवस्था पार्किंगची व्यवस्था, महानगरपालिका, मंदिर समितीने व अन्न सुरक्षा विभागाने अन्न पदार्थ तपासून घेणे व त्यांच्याकडील होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट वेळेत व योग्य ठिकाणी लावावी, त्यामुळे भाविकांच्या व सर्वसामान्यांचे आरोग्याच्या दृष्टिने हिताचे असेल, तसेच जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावून पोलिस विभागाने नागरिकांची सुरक्षेला प्राधान्य देऊन अवैध धंद्यांवर बारकाईने लक्ष ठेवावे.

अक्षता कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहतात त्या अनुषंगाने काटेकोर नियोजन करावे. सर्व संबंधित शासकीय यंत्रणा तसेच श्री सिद्धेश्वर मंदिर देवस्थान पंच कमिटीचे सदस्य यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून ही महायात्रा शांततेत पार पाडावी. श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होत असून दिनांक १२ जानेवारी रोजी ६८ लिंग प्रदर्शन १३ जानेवारी रोजी अक्षता कार्यक्रम १४ जानेवारी होम हवन असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी श्री. पडदुने यांनी दिली.

# लाचखोर डॉ. जोशी यास एक दिवस पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**
महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचे लाचखोर जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी यांना विशेष न्यायाधीश कटारिया यांनी एक दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.



डॉ. माधव विष्णुपंत जोशी (वय ४८, रा. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, गुरुनानक चौक, सोलापूर) असे पोलिस कोठडी मिळालेल्या जिल्हा समन्वयकाचे नाव आहे. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तक्रारदार याची पॅथॉलॉजी लॅब आहे. त्याच्या लॅबला श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयत येथे कार्यान्वित असलेल्या महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दाखल होणाऱ्या रुग्णांचे रक्त व लघवीचे नमुने तपासून रिपोर्ट सादर करण्याचे काम निविदेद्वारे मिळालेले होते. तक्रारदार याच्या लॅबच्या विरोधात तक्रारी अर्ज आला होता हा तक्रारी अर्ज पुढील चौकशीकामी जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी यांच्याकडे होता. या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने डॉ. माधव जोशी यांनी तक्रारदार यांना संपर्क साधून लॅबविरुध्द रिपोर्ट पाठविल्यास महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत केलेल्या कामाचे उर्वरीत बिल निघणार नाही अशी भिती डॉ. जोशी यांनी तक्रारदाराला दाखविली होती. तक्रारदाराच्या लॅबच्या बाजूने अहवाल वरिष्ठांना पाठवितो असे सांगून डॉ. जोशी यांनी २ लाख रुपये लाचेची मागणी तडजोडीअंती १ लाख रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केल्यानंतर १८ डिसेंबर रोजी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या आवारात सापळा लावून डॉ. जोशी यांना लाचेची १ लाख रुपयांची रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डॉ. जोशी यांच्या घराची झडतीदेखील घेण्यात आली असून तिथे काही आक्षेपार्ह मिळून आलेले नाही. गुरुवारी डॉ. जोशी यांना न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर विशेष न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. उपअधिक्षक गणेश कुंभार पुढील तपास करीत आहेत.

# गीत रामायणावर आधारित बॅले नृत्याविष्कार ‘नृत्यरामायण’

## सुयश गुरूकुलच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त २४ डिसेंबरला आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**
सोरेगाव परिसरातील सुयश गुरूकुलच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गीत रामायणावर आधारित बॅले नृत्याविष्कार ‘नृत्यरामायण’ आयोजन केल्याची माहिती गुरूकुलचे संस्थापक केशव शिंदे व विद्या शिंदे पत्रकार परिषदेत दिली.

२५ वर्षापूर्वी एका ओसाड माळरानावर आपल्या सर्वांच्या साक्षीने सुयश गुरुकुलचा शुभारंभ झाला. मनुष्य घडणीचा हा अभिनव प्रयोग यशस्वी करण्यासाठी असंख्य मदतीचे हात लाभले, मार्गदर्शन मिळाले. या रौप्य महोत्सवी वर्षात पुन्हा एकदा मागे वळून पहावे, आणि पुढील प्रवासासाठी आपले मार्गदर्शन घ्यावे ही इच्छा आहे. आपण सर्वांनी गुरुकुल मध्ये यावे यासाठी, हे एक छोटे सादरीकरण असून तमाम सोलापूरकरांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. राम जन्मापासून ते प्रभू श्रीरामांच्या राज्याभिषेकापर्यंत हे रामायण आपणास सुंदर अशा नृत्याविष्कारातून अनुभवयास मिळणार आहे. विशेष म्हणजे या नृत्याविष्कारात सोलापूरसह पराराज्यातील ४०० पेक्षा अधिक मुलामुलींचा यामध्ये समावेश आहे. याचे दिग्दर्शन भोपाळ येथील प्रख्यात रंग निर्देशिका, बॅले नृत्यकार वैशाली गुप्ता यांनी केले आहे. विशेष म्हणजे या नृत्याविष्कारासाठी लागणारे सर्व साहित्य गुरूकुलच्या विद्यार्थ्यांनी हाताने तयार केले आहे. हा





कार्यक्रम २४ डिसेंबरला विजयपूर रस्त्यावरील सुयश गुरूकुलमध्ये सायंकाळी सहा ते साडेसात यावेळेत होणार आहे. हा कार्यक्रम नागरिकांसाठी मोफत असून याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेस सुलभा पिशवीकर, पुष्पा आगरकर, डॉ. नवनीत तोष्णीवाल, वैशाली गुप्ता, वृषाली शिंदे-महंत, कुशल महंत, सुयश शिंदे, श्रद्धा लकडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी सर्वांचे स्वागत कुलकर्णी यांनी केले.

## राजस्व नगरात तरूणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर -**
विजयपूर रोडवरील राजस्व नगरात तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली.

सुरज फुलचंद कांबळे (वय ३६, रा. राजस्व नगर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १९ डिसेंबर रोजी पहाटे दीडच्या सुमारास सुरज कांबळे याने राहत्या घरातील वरील पत्र्याच्या रुममध्ये अज्ञात कारणावरून पत्र्याच्या लोखंडी अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यावेळी सुरज यास नातेवाईकांनी खाली उतरवून विजापूर नाका पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार एस के चव्हाण यांनी रुग्णालयत दाखल केले. त्यावेळी डॉ. आकाश माने यांनी सुरज यास मृत घोषित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी -९८०

**तरी हे काम क्रोधु पाहीं । जयांतें कृपेची साठवण नाही ।
हे कृतांताचां ठायीं । मानिजती ।।**

जे सर्व जाणतात किंवा शहाणे असतात ते सुध्दा समजत असतांनाही चुकीच्या मार्गावर का जातात ? किंवा त्यांना चुकीच्या मार्गावर कोण नेते ? असा अर्जुनाचा प्रश्न आहे. या प्रश्नांचे उतर देतांना भगवंत म्हणाले, तरी हे काम क्रोधु पाहीं । जयांतें कृपेची साठवण नाही । हे कृतांताचां ठायीं । मानिजती ।। अर्थात, काम क्रोध असे आहेत की, ज्यांच्या ठिकाणी अंशमात्र सुध्दा, थोडीसुध्दा, दयाबुध्दी नसते. ते केवळ काळा प्रमाणे निष्ठुर आहेत. हे काम-क्रोध म्हणजे ज्ञानरुपी ठेव्यावर वेटाळुन बसलेले महासर्प आहेत. विषयरुपी गुहेतील वाघ आहेत. चांगल्या मार्गात अडथळा आणणारे हे शत्रू आहेत. हे देहरुपी किल्याचे दगड आहेत, इंद्रियरुपी गावांची तटबंदी आहेत. या काम क्रोधांचे अविवेकी रुपाचे दडपण सा-या जगावर पडलेले आहे. हे रजोगुणी, तमोगुणी दोन्हीना प्रिय असणारे आहेत. प्रमाद आणि मोहयांच्या हे फार जवळचे आहेत. काम क्रोध हे जिविताचे वैरी असल्याने मृत्युच्या नगरीत यांना विशेष स्थान आहे. काम क्रोध अहंकारालाही दुर राहू देत नाहीत. त्यांना अहंकाराची जवळीक करण्यात आनंद वाटतो. देहाबरोबर यांची निर्मिती होते.



ज्ञानेश्वर महाराज

त्यामुळे ते अंत:करणाला चिकटून राहतात. शोध घ्यावे म्हटले तर ते देवादिकांनाही सापडत नाहीत. हे माणसाला पाण्यावाचून बुडवितात, अग्नी वाचून जाळून टाकतात. हे शस्त्रावाचून हे मानवाचा घात करतात, दोरावाचून बांधून टाकतात. कामक्रोध ज्ञानी पुरुषाचा पैज लावून वध करतात. चिखला वाचून रुतविण्याची, पाशावाचून जखडविण्याची ताकद यांच्या मध्ये असते. काम-क्रोध हे किती बलशाली असतात, त्याची पाळेमुळे कुठपर्यन्त रुजलेली आहेत, त्यांची ताकद किती महाभयंकर असते, ते शोधूनही सापडत नाहीत, वगैरे वगैरे, भगवंतानी अर्जुनाला सांगीतले. या सर्व सांगण्या पाठीमागचा भगवंताचा हेतू असा आहे की, एखादया स्थितप्रज्ञाने, आत्मज्ञानी व्यक्तिने जर यांना न कळत मनात प्रवेश करु दिला, तर त्या स्थितप्रज्ञावरही हे विजय मिळविल्याशिवाय राहत नाहीत. आपणालांही या काम-क्रोधाचा अनुभव आलाच असेल. आपण वासनेत अजिबात अडकलो नाही किंवा आपणाला कधीच क्रोध आला नाही असा व्यक्ति सापडणे ठीणच आहे. आपण आपलेच मूल्यमापन करायचे ठरवले तर आपणालाही श्रीकृष्णांचे म्हणणे पटेल. कधी ना कधी तरी या काम-क्रोधांनी आपणाला हरवलेच असेल. आपल्यावर काम-क्रोधांनी विजय मिळविण्यापेक्षा आपणच काम-क्रोधावर विजय मिळविला तर आनंदाला मर्यादा राहणार नाही. आपण कामक्रोधावर विजय मिळविला तर मानवी जीवनाच्या ख-या सुखाची अनुभती येईल. यांच्यावर विजय मिळविणे अवघड असले तरी अशक्य नाही. आपल्या हातून ही शक्यता घडण्यासाठी मनाची एकाग्रता, स्थिरता व स्वधर्माचरणाची एकनिष्ठता हवी आहे. ही एकाग्रता, एकनिष्ठता आपल्यात निर्माण करण्यासाठी ज्ञानामृत आनंदलहरी हे सदर आपल्या मदतीसाठी आहेच. आपला सततचा सहवास या सदरासोबत राहावा एवढीच अपेक्षा या प्रसंगी आहे. आपल्या जीवनातील आनंदलहरी वाढविण्यात ही लेख्मला निश्चितच मदत करेल असे आम्हास वाटते. आपली सकारात्मकता निश्चितच आनंदलहरींची अनुभूती देत राहील यात शंका वाटत नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - |
| दि. २० डिसेंबर २०२४ | संत गाडगेबाबा पुण्यदिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. पंचमी - (१०.४८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मघा (२७.४६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - विष्कंभ (१८.१०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२३.२९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा,

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील. आळस करू नका.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत.

# सोलापुरात आज सायंकाळी रंगणार वसंतोत्सव

## ● संजीव अभ्यंकर यांचे शास्त्रीय गायन तर राकेश चौरसिया यांचे बासरी वादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

आपल्या चतुरस्त्र गायकीने व मराठी संगीत नाटकांना पुनर्जीवित करणारे लोकप्रिय गायक पं. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठानतर्फे हुतात्मा स्मृती मंदीरमध्ये शुक्रवार २० डिसेंबर रोजी सायंकाळी ८.१५ वाजता वसंतोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठित व पुनीत बालन ग्रुप पुणे यांच्या सहयोगाने हे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती या महोत्सवाचे संयोजन प्रमुख राजस उपाध्ये यांनी दिली.

या संगीत महोत्सवात संजीव अभ्यंकर यांचे शास्त्रीय गायन होणार असून त्यानंतर राकेश चौरसिया यांचे बासरी वादन होणार आहेत. या कार्यक्रमाचे लोकमान्य सोसायटी, सुहाना मसाला हे सहप्रायोजक आहेत.






त्यानिमित्त त्यांचा अल्पपरियच...

**● संजीव अभ्यंकर :** जन्म ऑक्टोबर ५ , इ.स. १९६९ रोजी झाला. वयाच्या आठव्या वर्षापासून त्यांचे हिंदुस्तानी संगीताचे शिक्षण सुरू झाले. त्यांना सुरुवातीचे सांगीतिक धडे घरातून, आई शोभा अभ्यंकर यांच्याकडून मिळाले. पं. गंगाधरबुवा पिंपळखरे यांच्याकडूनही संजीव यांनी मार्गदर्शन घेतले. हिराबाई बडोदेकर आणि वसंतराव देशपांडे यांनी त्यांना जसराजांकडे शिकायला पाठविण्याची शिफारस केली. जसराजांचे शिष्यत्व स्वीकारल्यानंतर त्यांची संगीत दिनचर्या संपूर्णतः बदलली. गुरू-शिष्य परंपरेनुसार त्यांचे शिक्षण चालू झाले. जसराजांच्याबरोबर भारतभर दौरे, संगीत मैफिलींमध्ये त्यांना साथ-संगत आणि त्याचवेळी हिंदुस्तानी संगीतातील अभिजात स्वरांचे धडे, अशा नानाविध मार्गांनी त्यांची सांगीतिक प्रगती होत होती. अकराव्या वर्षी संगीताची पहिली मैफल गाजविणाऱ्या संजीव अभ्यंकरांनी त्यानंतर देशभरातील विविध महोत्सवांमध्ये आपल्या गायकीची छाप पाडली. माचिस, निदान, दिल पे मत ले यार अशा चित्रपटांसाठी त्यांनी पार्श्वगायन केले आहे. गॉडमदर चित्रपटातील गाण्यासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पं. जसराज जीवनगौरव पुरस्कार, सूररत्न यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. मध्य प्रदेश शासनाने 'कुमार गंधर्व पुरस्कार' देऊन त्यांना गौरवले आहे.

**● राकेश चौरसिया :** हे प्रतिष्ठित संगीत पार्श्वभूमीचे आहेत. ते प्रसिद्ध बासरीवादक, दिग्गज पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचे पुतणे आहेत. त्यांच्या अधिकृत वेबसाइटनुसार, "त्याच्या दिग्गज काकांप्रमाणेच, राकेश चौरसिया कडे सामर्थ्य आणि शांतता यांचे योग्य संतुलन आहे, एक अपवादात्मक बांसुरीवादकासाठी अत्यंत गंभीर घटक आहेत. त्याचे चपळ उडवण्याचे तंत्र त्याच्या स्वार आणि स्वर च्या प्रशिक्षणासह बांबूच्या पोकळ तुकड्यातून ताला त्याच्या भावनांमध्ये चोखपणे बाहेर पडतो.'' त्यांनी जपान, ऑस्ट्रेलिया, युरोप, दक्षिण आफ्रिका आणि यूएस येथे झालेल्या मैफिलींद्वारे भारतीय शास्त्रीय संगीताला जागतिक व्यासपीठावर नेले आहे. यांच्या अपवादात्मक प्रतिभेमुळे त्यांना महाराणी एलिझाबेथच्या रौप्यमहोत्सवानिमित्त जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचून बीबीसी रेडिओवर २४ तासांचे थेट संगीत प्रसारित करण्याचे आमंत्रण मिळाले. त्यांना २००७मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्याकडून भारतीय संगीत अकादमी पुरस्कार मिळाला होता.



# तरुणाईला आता गरज सायबर संस्कारांची : आयटीतज्ज्ञ डॉ.शिकारपूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

तीस ते चाळीस वर्षांपूर्वी ठरावीक वर्गच संगणकाचा वापर करत होता. परंतु सध्या संगणक वापर सगळीकडे सर्वमान्य झाला आहे. त्यामुळे भारत जगात डिजीटल उपकरणे वापरण्यात अग्रेसर आहे. सध्या अनेकांकडे उपकरणे आहेत. परंतु ती कशी वापरावीत याचे प्रशिक्षण त्यांना कोणीही देत नाही. त्यामुळे तरुणाईला आता सायबर संस्कारांची गरज असल्याचे स्पष्ट मत आयटी तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी व्यक्त केले

पुणे सेवासदन संस्था शाखा सोलापूर यांच्या वतीने शिक्षक आणि विद्याथिनीसाठी डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता याचा शिक्षणावर प्रभाव या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी डॉ. शिकारपूरकर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेच्या सचिव विणा पत्की, उपाध्यक्ष राजीव प्रधान, विद्या लिमये डॉ. श्रीकांत येळेगावकर, लक्ष्मीकांत गवई, यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाहुण्यांचा परिचय आणि आभार डॉ.अंजली शिरसी यांनी केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष शीला मिस्त्री संचालक पद्माकर कुलकर्णी, शाळेच्या उपमुख्याध्यापिका नलिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नियमांची आवश्यकता

डॉ. शिकारपूर म्हणाले, संगणक किंवा मोबाईल कसा वापरावा याचे कोणतेही प्रशिक्षण दिले जात नाही. त्यामुळे अनेकजण स्वप्रशिक्षितच असतात. परंतु हे स्वप्रशिक्षण फसवे असू शकते. यातून अनेकजण सायबर गुन्ह्यांना बळी पडलेले पाहायला मिळतात. या क्षेत्रात काही नियमांची आवश्यकता आहे. उदा. मोबाईल वापरण्यासाठी देखील किमान २० तासांचा अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे. यामध्ये कोणत्या वेबसाईटचा वापर करावा, काय पाहू नये, वेगवेगळ्या बेटिंग ॲपचा वापर करावा का, मोबाईलवर किती वेळ गेम खेळावी यांसह सजग साक्षर होण्यासाठी बाबींचा समावेश असणे गरजेचे आहे.

### विद्यार्थ्यांनी काय करावे?

संगणक क्षेत्रात विविध गोष्टींवर संशोधन सुरू आहे. अनेक गोष्टींमध्ये ॲटोमेशन हा प्रकार येईल. सर्व गोष्टी सॉफ्टवेअर आणि संगणकाच्या माध्यमातून होतील. यासाठी विद्यार्थ्यांनी नवनवीन गोष्टी शिकण्याची वृत्ती जोपासायला हवी. पुणे शहरामध्ये शेती नाही तरीदेखील शेतीसंदर्भातील शिक्षण देणारी संस्था आहे. ज्याठिकाणी आयटी उद्योग आहेत.

### चॅट जीपीटी म्हणजे काय ?

या टूलचा वापर करून साहित्यनिर्मिती करता येते. हव्या त्या कवितादेखील करता येतात. कारण आर्टिफिशीयल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून यामध्ये कंटेटची निर्मिती झाल्याचे दिसून येते. प्रादेशिक भाषांमध्ये सध्या चॅट जीपीटीचा वावर मर्यादित आहे. इंग्रजीमध्ये सध्या याचा मोठा वापर होत आहे, प्रादेशिक भाषेतदेखील वापर वाढणार आहे.

# किशोर चंडक यांच्या दुर्मिळ नाणी अन् तिकिटांचे उद्यापासून दोन दिवसीय प्रदर्शन

## स्वातंत्र्यपूर्व काळातील चलनी रुपये व नोटासह विविध वस्तूंचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

चंडक परिवार, एसपीएम इंग्लिश स्कूल आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक किशोर चंडक यांनी ६१ वर्षांपासून संग्रहित केलेल्या दुर्मिळ आणि जगप्रसिद्ध नाणी, तिकिटे आणि स्वाक्षऱ्यांचे प्रदर्शन दि. २१ आणि २२ डिसेंबर रोजी हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणातील एसपीएम इंग्लिश स्कूल येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती किशोर चंडक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे प्रदर्शन शनिवारी आणि रविवारी सकाळी १० ते सकाळी ७ वाजेपर्यंत सर्व सोलापूरकरांसाठी विनामूल्य आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे दुर्मिळ सुवर्ण होन, चांदीच्या रुपया, सुवर्ण फनम आणि काकतीय (वारंगळ साम्राज्य) यांची दुर्मिळ सुवर्ण नाणी, २ हजार ते २५०० वर्षांपूर्वीची जनपदे, गुप्त आणि इतर शासकांची सुवर्ण, चांदी व तांब्याची नाणी, स्वतंत्र भारताची १९ वेगवेगळ्या किमतीची चांदीची स्मारक नाणी, स्वातंत्र्यपूर्व काळातील चलनी रुपये व नोटा अशा वस्तूंचा समावेश या प्रदर्शनात आहे. याशिवाय मुघल काळातील सोलापूरची नाणी, राशीवर आधारित मुघलांची दुर्मिळ सुवर्ण नाणी, जगातील पहिले तिकीट, पहिले पाकीट, भारतातील पहिली तिकिटे अशा अनेक ऐतिहासिक वस्तू या प्रदर्शनात ठेवण्यात आल्या आहेत.



महात्मा गांधींच्या जीवनावर आधारित नाणी आणि तिकीट संग्रह तसेच हिटलरने काढलेली चित्रे देखील पाहायला मिळणार आहेत. याशिवाय जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक, भारतरत्न पुरस्कार विजेते, चंद्रावर पाऊल ठेवणारे चांद्रवीर, भारतातील महान विभूती तसेच ब्रिटिश राजे, राणी यांच्या स्वाक्षऱ्या या प्रदर्शनात पाहायला ठेवण्यात येणार आहेत. अबालवृद्ध सोलापूरकरांनी या प्रदर्शनास भेट द्यावी आणि संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन किशोर चंडक, श्रुती चंडक, वेदांत चंडक, नम्रता चंडक, एसपीएम इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापक शिवानंद शिरगावे तसेच रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी, सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी केले आहे.

# महर्षी मार्कंडेयच्यावतीने तीन दिवसीय आधार कार्ड शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ड़िसेंबर-**

महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने तीन दिवसीय आधार कार्ड शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिवबा संपर्क कार्यालय बोध्दूल निवास अशोक चौक येथे स.९ ते ५ या वेळेत असणार आहे. ० ते १८ वर्षातील यांचे नविन आधार कार्ड काढणे, पत्ता बदल दुरुस्ती करणे, आपडेट करणे आदी या शिबीरामध्ये होणार आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थापक अध्यक्ष निरंजन बोध्दूल यांनी केले आहे. अधिक माहिती साठी संपर्क : ९५८८४९०२७४.



# जलसाक्षर शीला हे पुस्तक सर्वांनाच उपयुक्त

**जल अभ्यासक श्रीधर शंकरराव खंडापूरकर यांनी आपल्या जलसाक्षर शीला या छोटेखानी पण समर्पक वाक्य आणि ओळीतून सध्या चाललेले पाण्याचे दुर्भिक्ष याची व्यथा प्रकर्षाने मांडली आहे. खरे तर पाणी वाचविण्याची मानसिक तयारी महत्वाची आहे, त्याबद्दल प्रबोधन करणे जरूरीचे आहे. सांडपाण्याचाही पुन:वापर करता आला पाहिजे. यासाठी कायदा करून काही उपयोग होणार नाही. थोडक्यात सांगायचे तर, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, जलपुनर्भरण करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, जलप्रदूषण टाळणे आणि शुद्ध पाणी प्राशन करणे म्हणजे जलसाक्षर होणे. आपल्या प्रत्येकाच्या घरातील सगळ्या व्यक्तींनी 'जलसाक्षर' होणे ही काळाची गरज आहे. तेव्हाच निसर्गाचे आशीर्वाद आपणांस भरभरून लाभतील. असे सांगतानाच श्रीधर खंडापूरकर यांनी पाण्यासंदर्भात अनेक गुणधर्म आपल्या पुस्तकात चार- चार ओळीतून मांडले आहेत. ते आपल्या लेखनात असे म्हणतात पाण्याची पूजा म्हणजे, पाण्याच्या नैसर्गिक गुणधर्माप्रती, भक्ती आणि बांधिलकी बाळगणे होय. असे सांगून पावसाच्या म्हणजे निसर्गाच्या सादाला, आपण वेळेस प्रतिसाद दिला नाही, तर उमटणारे पडसाद हे दु:खदायी ठरतील अशी व्यथा या पुस्तकाचे लेखक श्रीधर खंडापूरकर यांनी आपल्या जलसाक्षर शीला पुस्तकातून मांडली आहे.**

### पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे; जिरविणे गरजेचे

नदी आणि पाणी ह्यांचे अनन्यसाधारण महत्व मान्य करून आपल्या पूर्वजांनी नद्यांना माता आणि देवत्व बहाल करून पापनाश, पुण्यवर्धक संकल्पना रुजवल्या आहेत. त्यामुळे निर्माल्य, देहदहनसंस्कारविधी असे कितीतरी त्याज्य पदार्थ नदीस अर्पण होऊ लागले आहेत. नदीकाठी जत्रा भरविणे, यात्रा, मेळावे, कुंभमेळा ह्यांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये हजारो लाखोंच्या संख्येने लोक जमतात. त्यांची दिनचर्या भांडी, कपडे, स्नान, सगळे नदीकाठीच चालते. त्याद्वारे नदीचे पाणी दूषित होण्यास सुरुवात होते. पावसाचे आकाशातून पडणारे पाणी शुद्ध स्वरूपातच असते. पण जसे ते जमिनीवर पडून वाहू लागते त्यात माती, कचरा, वातावरणातील वायू मिसळतात. आपल्याला पाणी मिळविण्याचा खात्रीशीर स्रोत म्हणजे पाऊस. त्याच्या लहरीपणावर आपले जीवन अवलंबून आहे. तो वेळेवर आला तर आपण आनंदी होतो. पण ओढ दिली तर संचित होतो. जमिनीवर पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविणे गरजेचे आहे. त्यासाठी जलपुनर्भरण आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीत पडणाऱ्या आणि शहरी भागात राहणाऱ्या प्रत्येकाने आपल्या परिसरात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याला थांबवून अडविणे आवश्यक आहे. शेतात शेततळी ,बांध बांधून आणि शहरी भागात 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' म्हणजे छतावर पडणारे पाणी साठविता येईल. आपल्या घराच्या अंगणात मोठा हौद बांधून त्यात छतावर पडणारे पाणी साठवता येते. वृक्षतोड थांबवून मोठ्या प्रमाणात झाडे लावली पाहिजेत. झाडे पाणी वाहण्याच्या वेगावर मर्यादा घालतात.






▸ पुस्तक - जलसाक्षर शीला
▸ लेखक - श्रीधर खंडापूरकर

पुढील १० वर्षात भीषण पाणीटंचाई होणारा देश म्हणून भारताकडे बोट दाखवले जात आहे. आधीच राज्याअंतर्गत आणि राज्यांराज्यांमध्ये पाणीप्रश्न पेटला असून हा प्रश्न जटील बनू लागला आहे. त्यामुळे येत्या १० वर्षात पाणी प्रश्न अधिक समस्यांना जन्म देणारा ठरणार आहे. खा-या पाण्याला पिण्यायोग्य पाणी बनवण्याचे प्रयोग सुरू आहेत. परंतु ते फार खर्चिक असल्यामुळे ते भारतासारख्या देशाला परवडणारे नाहीत. म्हणून जल व्यवस्थापन करताना सर्वच पातळीवर लोकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. जल साक्षरता आणि त्यातून येणारे जल व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. त्यासाठी लोकांनी आपल्या मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. असे मला वाटते.

### जलसाक्षरता आणि व्यवस्थापन ही काळाची गरज

भारतात मूलभूत सोयीसुविधांची मोठ्या प्रमाणात वानवा आहे. त्यातच पाण्यासारख्या अत्यावश्यक घटकाची येत्या १० वर्षात मोठ्या प्रमाणात टंचाई भासणार असल्याचे अलीकडे सादर करण्यात आलेल्या भारतीय जल उद्योगांच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. भारत हा नैसर्गिक साधन संपत्तीने विपुल असा देश आहे. त्यात भारतात सरासरी पावसाचे प्रमाणही चांगले आहे; पण परंतु या पडणा-या पाण्याचे योग्य नियोजन केल्यामुळे हे पाणी जमिनीवर पडून वाहून जाते. ते अडवले जात नसल्यामुळे ते थेट नदी, नाले किंवा समुद्राला जाऊन मिळते. त्याचा काहीच फायदा होत नाही. शेतीला पावसाळ्यात मिळणारे पाणी ही जमेची बाब सोडली तर पावसाचा फारसा उपयोग भारतात होत नाही. तो करता येत नाही कारण शेतीसाठी पाऊस हे समीकरण मान्य केले तरी इतर सगळ्या गोष्टींसाठी पाणी लागते, हे समीकरण लोक मान्य करायला तयार नाहीत. त्यांची तशी मानसिकता बनत नाही, ही भयंकर गोष्ट आहे. गेल्या काही वर्षात लोकांचा सरकारवर अवलंबून राहण्याची मानसिकता वाढलेली आहे. सरकार करेल, त्यांनी करावे, अशी मानसिकता आता कालबाह्य झाली पाहिजे. भारतात जल प्रदूषणाचे प्रमाण इतके वाढलेले आहे की, त्यामुळे देशभरातील नद्या, कालवे आणि शहरांच्या मध्यभागी असलेल्या विहिरी आता प्रदूषित झालेल्या आहेत. शहरातील सांडपाणी आणि उद्योगधंद्यातील प्रक्रिया न केलेले रसायनमिश्रित पाणी यामुळे जलप्रदूषण वाढले आहे. पण हे जलप्रदूषण कमी करून जमिनीतील जलपुन:र्भरण वाढवणे आवश्यक आहे, ते होत नाही. शेती आणि उद्योगासाठी पाण्याचा बेसुमार उपसा होतो. पण धरणे, विहिरी, कालवे यातील पाण्याचे पुनर्भरण होत नाही. हे वाढवणे आवश्यक आहे. लोकसंख्येचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणि लोकांची मानसिकता लक्षात घेता येत्या काळात भारतीयांनी आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. पाण्याचे जमिनीतील पुनर्भरण तसेच पाण्याचा पुनर्वापर तसेच वर्षा जल संचयनाचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे. पाण्याबाबत लोकांचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. पाण्याचा उपसा कमी करून जल प्रदूषणाबाबत कठोर कायदा आणि त्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, अशी माहितीही श्रीधर खंडापूरकर यांनी आपल्या छोटे खाणे लेखनातून त्यानी नागरिकांना दिली आहे.

### पाणी वाचविण्याची मानसिक तयारी महत्वाची

खरे तर पाणी वाचविण्याची मानसिक तयारी जरूरी आहे, प्रबोधन जरूरी आहे. सांडपाण्याचाही पुनःवापर करता आला पाहिजे. यासाठी कायदा करून काही उपयोग होणार नाही. थोडक्यात सांगायचे तर, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, जलपुनर्भरण करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, जलप्रदूषण टाळणे आणि शुद्ध पाणी प्राशन करणे म्हणजे जलसाक्षर होणे. आपल्या प्रत्येकाच्या घरातील सगळ्या व्यक्तींनी 'जलसाक्षर शीला' होणे ही काळाची गरज आहे. तेव्हाच निसर्गाचे आशीर्वाद आपणांस भरभरून लाभतील. या पुस्तकाचे लेखक श्रीधर खंडापूरकर यांनी जलाशय, जलधारा, सोनियाचा दिस, गंगोत्री, जलपुष्प, जलजागर, आणि जलशिल्प या पाणी विषयक पुस्तकांना त्यांनी प्रकाशात आणले आहे, नव्हे तर जनमानसात जलसाक्षरतेसाठी आणि जनजागरण घडवून आणण्यासाठी खूप मोलाची कामगिरी केली आहे. पाण्याविषयक पुस्तकाच्या माध्यमातून जनजागरण करून पाण्याचा दुरुपयोग करणाऱ्या लोकांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे त्यांनी या पुस्तकातील छोट्या छोट्या ओळींचा मनापासून विचार केला पाहिजे पाणी हे कुठल्याही मंदिरात न मावणारे मात्र प्रत्येक सजीवांच्या कुडी आणि कुडीमध्ये अखंड वास करणारे एक मा एकमेवद्वितीय असे ईश्वरीय प्रारूप आहे.

**- पद्माकर मा. कुलकर्णी**
अध्यक्ष : महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर.
भ्रमणध्वनी - ९९२२४२४५३७

# पशुसंवर्धन विभागाने काढले चौकशीचे आदेश

## ● अक्कलकोटमधील श्वान मृत्यूप्रकरण; अहवाल सादर करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ डिसेंबर-**

अक्कलकोटमध्ये काही दिवसांपूर्वी श्वानांना विष घालून मारण्यात आले होते.याप्रकरणी मुंबईच्या पाल निमल वेल्फेअर फाउंडेशनच्यावतीने भारतीय प्राणी कल्याण मंडळाकडे गंभीर अशी तक्रार करण्यात आली होती. आता या प्रकरणाची दखल राज्य सरकारने पशुसंवर्धन आयुक्तालय महाराष्ट्र राज्य घेतली असून याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा पशुसंवर्धन विभागाला दिले आहेत. यामुळे आता अक्कलकोटमधील

प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून अनेकांचे धाबे दणाणले आहेत. पंधरा दिवसापूर्वी



अक्कलकोट शहरात अज्ञात व्यक्तींकडून अनेक श्वान हे विष प्रयोगाद्वारे मारून टाकण्यात आल्याची घटना घडली होती. हे प्रकरण जेव्हा उघडकीस आले त्यावेळी राज्यातील प्राणी मित्र संघटना व अक्कलकोटमधील प्राणी मित्र हे आक्रमक झाले होते.यानंतर अज्ञात व्यक्ती विरोधात दोन गुन्हे नोंदविण्यात आले होते.त्यानंतर पोलीस तपास अद्याप झालेला नाही. नगरपरिषदेनेही याप्रकरणी आपले हात झटकले होते. आपला या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. आम्हीही या प्रकरणाचा शोध घेत आहोत,असे नगरपरिषदेने म्हटले होते. त्यानंतर पाल निमल वेल्फेअर फाउंडेशनने अक्कलकोटमध्ये येऊन कॅण्डल मार्च काढला होता. त्यानंतर कायदेशीर मार्गाने लढा देण्याचा निर्णय प्राणिमित्र संघटनांनी घेतला होता. याप्रकरणी बोलताना पाल वेल्फेअर फाउंडेशनचे रोशन पाठक यांनी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. अद्यापही या प्रकरणात स्थानिक पोलीस प्रशासन अथवा संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस अशी कारवाई झालेली नाही. त्यामुळे पाल निमल वेल्फेअर फाउंडेशनचे ॲड. प्रीती साळसकर यांनी भारतीय प्राणी कल्याण मंडळाकडे तक्रार दाखल केली होती. त्यावरून आता पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या वतीने उपयुक्त डॉ. शैलेश केंडे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत. या आदेशाने संबंधित विभागात मात्र खळबळ उडाली आहे. तिकडे अक्कलकोट मधील प्राणी मित्र संघटनेचे प्रमुख आतिश कटारे यांच्यासह इतर प्राणी मित्रांनी मात्र या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे.

### कायदेशीर मार्गाने लढा देऊ

अक्कलकोटमधील श्वानांच्या मृत्यूचे प्रकरण थंड झालेले नाही. अद्याप त्याची चौकशी चालू आहे. त्याच्या अनेक गोष्टी समोर येणे बाकी आहेत. जोपर्यंत या प्रकरणात न्याय मिळत नाही. तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही. आमचा कायदेशीर लढा चालू राहील.

**- रोशन पाठक, पाल निमल फाउंडेशन**

# निवडणुकीमध्ये पोलिस पाटलांचे मोठे योगदान

## ● तहसीलदार विनायक मगर : अक्कलकोटमध्ये पोलिस पाटलांचा सत्कार

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ डिसेंबर-**

यंदाच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पोलीस पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे मत तहसीलदार विनायक मगर यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे आयोजित पोलीस पाटील दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी शंकर कवितके, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, सपोनि सुरवसे, पीएसआय डेरे आदीजण होते.तहसीलदार म्हणाले, शासकीय सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी रात्रंदिवस जीव तोडून काम केले. प्रत्येक पोलीस पाटील आपापले गाव व्यवस्थितपणे संभाळले.

बारीकसारीक घटना, घडामोडीचे माहिति देत होते. यामुळे या निवडणुकीत महत्त्वाचे घटक म्हणून पोलीस पाटील कार्यरत होते. प्रास्ताविक पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी केले. यावेळी गोपनीय विभागाचे सुनील माने, पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवानंद फुलारी-पाटील, सिद्धार्थ कोळी, महादेव बिराजदार, प्रकाश बिराजदार, मळसिद्ध कांबळे, जर्दनबाशा कुमठे, रोहन शिर्के, अंबणा अस्वले, संजय बिराजदार, कल्याणी गायकवाड, गेनसिद्ध सुरवसे, शिवशरण हंगर्गी, लक्ष्मीपुत्र आंदेवाडी, मल्लिकार्जुन मानशेट्टी, मीनाक्षी किणगी, महानंदा माळी, रेश्मा पठाण, कलप्पा बंडगर, चराटे, संतोष गुजा, सिद्धलिंग मुनाळे, मोहन वाघमोडे, प्रेमनाथ राठोड, यांच्यासह दक्षिण पोलीस ठाणे हद्दीतील अनेक पोलीस पाटील उपस्थित होते.



### पोलिस ठाण्यात पहिल्यांदाच कार्यक्रम

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार पोलीस पाटील दिन केक कापून, सर्वांना फेटा बांधून जिल्ह्यातील तब्बल २५ पोलीस ठाण्यात प्रथमच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याबाबत पोलीस पाटील संघटनांचे पदाधिकारी दोन दिवसांपूर्वी अधीक्षक कुलकर्णी यांना भेटून मागणी केली होती. याप्रसंगी सर्वांना प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

# अल्पसंख्यांक समाजाच्या हक्काची चळवळ गतिमान व्हावी

## ▶ प्रा. हर्षदा गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ डिसेंबर-**

अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना बहिष्कार भेदभाव आणि सामाजिक असमानता यासारख्या रुढी भेडसावत आहेत. त्यामुळे सामाजिक दरी निर्माण झाली आहे. त्यातून त्यांना मुक्त करण्यासाठी अल्पसंख्यांक हक्काची चळवळ उभी केली पाहिजे. ती चळवळ गतिमान देखील झाली पाहिजे. असे प्रतिपादन प्रा. हर्षदा गायकवाड यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेश पवार, प्रा. डॉ. शितल झिंगाडे-भस्मे, प्रा. शिल्पा धूमशेट्टी, प्रा. विद्या बिराजदार उपस्थित होते. प्रा. गायकवाड म्हणाल्या की, अल्पसंख्यांक समाजाकडे विविधता आहे, त्यांच्यातील बलस्थाने ओळखून त्यांना सामाजिक प्रवाहात आणले पाहिजे, अल्पसंख्यांकांना शासनाने विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, त्या सुविधा व हक्क त्यांच्यापर्यंत जाऊन सांगितल्या पाहिजेत. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका डॉ. शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा. मनीषा शिंदे यांनी मानले.




### अल्पसंख्यांकांसाठी घेतली शपथ...

अल्पसंख्यांकांचे अधिकाराचे संरक्षण करून त्यांना शासकीय सुविधांची माहिती करून देणे तसेच त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याची शपथ राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी घेतली.

# वाढती मजुरी, मजुरांच्या कमतरतेमुळे धान्य मळणीसाठी मशिनचा आधार

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट दि.१९ डिंसेबर**

अक्कलकोटमध्ये सध्या कारखान्याकडून मजुराद्वारा .ऊस तोड चालु आहे. यामुळे काढणीस आलेले तुर पिकांची मळणी करण्यासाठी मजुरांची कमतरता भासत आहे. तसेच मजुरांची मजुरीही वाढली आहे याला पर्याय म्हणून कमी वेळात कमी खर्चात पिकाची मळणी करिता शेतकरी वर्ग मशीनद्वारे मळणी करण्यास प्राधान्य देत आहे.

सध्या शेतीची कामे मोठ्या प्रमाणत चालु आहेत साखर कारखान्याकरिता मजुराद्वारा ऊस तोड चालु आहे काही शेतकरी मजुराद्वारा नविन ऊस लावण करीत आहेत . तुर पिक काढणीस आले आहे मजुरांची कमतरतामुळे काढणीस आलेले तुर पिक कापणी मळणी साठी मजुर उपलब्ध होण्यास अडचण येत आहे. शिवाय पिक काढणी मजुरीवर न होता ठेका गुत्ता पद्धतीने मजुराकरवी काम होत असल्याने याकरिता मजुराकडून अधिक रक्कमेची मागणी होत आहे, याला पर्याय म्हणून शेतकरी वर्ग तूर पिकाची मळणीसाठी मशिनचा आधार घेणे पसंत करीत आहे. या अधुनिक मळणी मशीनद्वारा एकरी बाराशे ते पंधराशे रुपयामध्ये अवध्या काही वेळात पिकाची कापणी व मळणी केली जात आहे. यामुळे शेतकऱ्याचां वेळ वाचत आहे, पैशाची बचत होत आहे. यामुळे अक्कलकोट तालुक्यात अशा मळणी मशिनचा तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून वापर होत आहे.




# चारे येथील गाईवरील हल्ला बिबट्याचाच!


## वन विभागाचा निष्कर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील चारे येथे गाई वर हल्ला केलेला 'तो' वन्य प्राणी 'बिबट्या'च असल्याचे निरीक्षण वन विभागाने नोंदवले आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे. दरम्यान, मंगळवारी वन विभागाने चारे येथे बिबट्याचे दर्शन झालेल्या भागात ट्रॅप कॅमेरे लावले आहेत.

सोमवारी सायंकाळी बिबट्याने चारे येथील पंढरीनाथ देशमुख यांच्या शेतात बांधलेल्या एका गाईवर हल्ला करुन नरडे फोडले. यात गाय जागीच गतप्राण झाली. तर गाईजवळ असलेले वासरु त्याने नेले. त्यानंतर वन विभागाचे कर्मचारी सुलतान शेख व इतरांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. ठसे घेतले. ठशांच्या निरीक्षणावरुन ते बिबट्याचेच असल्याचे निरीक्षण वन विभागाने नोंदवले आहे. बार्शी तालुक्यात उपळाई (ठोंगे), पानगाव, चारे परिसरात बिबट्या दिसल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी व सतर्कता बाळगावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे. बिबट्याच्या शोधासाठी बार्शी, सोलापूर येथील वन विभागाची वाहने पिंजऱ्यासज्ञ व पुणे, सोलापूर व बार्शी येथील प्राणी मित्र बिबट्याच्या शोधासाठी अहोरात्र कष्ट व परिश्रम घेत असल्याचे वन विभागाच्या बार्शी प्रमुख अलका करे यांनी तरुण भारतशी बोलताना सांगितले.



# ज्ञानेश्वर दुधाणे देणार विराज जोशींना पखवाजावर साथ

## सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात दिग्गजांना साथ देत कला सादर करण्याची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ डिसेंबर-**

अभिजात शास्त्रीय संगीताची पंढरी म्हणून ओळखला जाणारा जागतिक किर्तीच्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची सुरुवात १८ डिसेंबर पासून सुरू झाली असून पाच दिवस चालणाऱ्या या ७० व्या संगीत महोत्सवात ख्यातनाम आंतरराष्ट्रीय किर्तीच्या ख्यातनाम गायक गायिका आणि वादकांच्या उपस्थितीत हा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव संपन्न होणार आहे,

या संगीत महोत्सवात शुक्रवारी २० डिसेंबर रोजी दुसऱ्या सत्रात भारतरत्न भिमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांचच्या बरोबर करकंब (पंढरपूर) येथील ज्ञानेश्वर दुधाणे पखवाज साथसंगत करण्याची संधी पं. श्रीनिवासजी जोशी आणि शिल्पाताई जोशी यांच्या मुळे मिळत आहे. एका ग्रामीण भागातील कलाकाराला ही संधी अतिशय महत्त्वपूर्ण असून आपल्या नावाबरोबर करकंब गावचही नाव उज्ज्वल होत आहे. या आधीही ६३ व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात पं. शौनक अभिषेकी यांच्याबरोबर साथसंगत केली असून महाराष्ट्र भर विदुषी मंजुषा ताई पाटील, पं. रघुनंदन पणशीकर, पं. जयतीर्थ मेऊंडी, पं. आनंद भाटे, आरतीताई अंकलीकर, पं. राहुल देशपांडे, पं. रोणू मुजूमदार, आरतीताई अंकलीकर अशा अनेक कलाकारांबरोबर पखवाज साथ संगत करण्याचे भाग्य लाभले असून महाराष्ट्राबरोबर दिल्ली, छत्तीसगड, हरियाणा, कर्नाटक, गुजरात आदी राज्यातही ख्यातनाम कलाकारांबरोबर पखवाज साथसंगत केली आहे. पंढरपूर येथे पद्मश्री जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव, विठ्ठल-रुक्मिणी नवरात्री संगीत महोत्सव संगीत महोत्सव, पं. विकास कशाळकर फाऊंडेशन आयोजित संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यासाठीही मोठा सक्रिय सहभाग असतो. पेशाने प्राथमिक शिक्षक असून संगीताबरोबर शैक्षणिक, पर्यावरण, सामाजिक, आध्यात्मिक कार्याची ही आवड असणारे व्यक्तिमत्त्व असून आतापर्यंत ७०० मोठ्या झाडांचे यशस्वी वृक्षारोपण करुन झाडे जोपासना करत आहेत. सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात मिळणारी ही मोठी संधी म्हणजे प्रत्येक कलासाधकाचे स्वप्न असते. हा महोत्सव ऐकण्यासाठी भारताबरोबर परदेशातूनही अनेक संगीत रसिक उपस्थित असतात. अनेक मोठमोठे गायक, वादक या संगीत महोत्सव ऐकण्यासाठी हजेरी लावतात. कलासाधक आणि रसिकांची भेट आणि आचारविचारांची मोठी देवाणघेवाण या महोत्सवामुळे होते. त्यामुळे या संगीत महोत्सवात पखवाज साथ करण्याची संधी ही उर्जा आणि प्रेरणादायी आहे, ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सांगितले. आतापर्यंत अनेक दिग्गज कलाकारांना साथसंगत करण्याची मला संधी मिळाली. ही संधी माझ्यासाठी प्रेरणादायी आणि उत्साह वाढविणारी आहे. कला सतत प्रवाही असते, उत्कृष्ट केलेला संधी मिळतच असते, हे यातून सिद्ध झाल्याचे त्यांनी सांगितले.








### हेही करणार साथसंगत

विराज जोशी यांच्याबरोबर तबलावादक पांडुरंगदादा पवार, हार्मोनियम अविनाश दिघे, टाळ माऊली टाकळकर करणार आहेत. विराज जोशी यांच्यानंतर जागतिक किर्तीच्या गायिका कौशिकी चक्रवर्ती यांचे गायन होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त



### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री शंकरलिंग प्रशालेचे यश

**वळसंग, दि. १९ डिसेंबर-**

पंचायत समिती दक्षिण सोलापूर आणि श्री मल्लप्पा कोनापुरे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आहेरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आहेरवाडी येथे पार पडले. यात श्री शंकरलिंग प्रशालेच्या विद्यार्थी शास्त्रज्ञांनी यश मिळविले. प्राथमिक गटातून अनन्या भैरामडगी, झिनत अत्तार व साईगंधा जमादार यांनी अनुक्रमे वॉटर प्युरिफिकेशन, टूथ बीटस, पादचाऱ्यांचे सुरक्षा टोपी हे तीन तर माध्यमिक गटातून तेजस्विनी ख्याडे, सोमनाथ खराडे व उम्मेहानी पटेल, गायत्री खंदारे यांनी अनुक्रमे ऑटोमॅटिक वाकिंग ब्रिज, वेस्ट बगॅसपासून कागद, कार्बन टु क्लिन एअर हे तीन असे एकूण सहा वैज्ञानिक उपकरणे मांडले होते. सदर उपकरणांपैकी माध्यमिक गटातील सोमनाथ शिवानंद खराडे याच्या वेस्ट बगॅस कागद म्हणजे गवत आणि उसाच्या चोथ्यापासून कागद तयार करणे या उपकरणाला तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला असून सदर उपकरणाची निवड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाकरिता झाली आहे. या विद्यार्थ्यांना संजयकुमार धनशेट्टी, शैला निंबाळ, बाळकृष्ण गुंड, सिध्दारुढ हिरेमठ, विजय प्याटी, विजयालक्ष्मी थळंगे, सिध्दाराम भैरामडगी, कलाशिक्षक अजय माणकोजी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी, शिवशरण प्याटी, रमेश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, मुख्याध्यापक विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनीअभिनंदन केले.



### जिल्हास्तरीय गीतगायन स्पर्धेत कोळेगांव शाळेचे सुयश

**पिलीव, दि. १९ डिसेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर शिक्षण विभाग आयोजित व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळेगांव संघाने उत्तेजनार्थ क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले. शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या सहीचे सन्मानपत्र विद्यार्थ्यांना मिळाले. कोळेगांव शाळेने केंद्र स्तरावर झालेल्या व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावून तालुकास्तरावरील निबंध, कथाकथन, चित्रकला, वक्तृत्व, समूहगीत या पाच स्पर्धेत तालुकास्तरावर क्रमांक पटकावून या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली. अक्कलकोट येथे झालेल्या जिल्हास्तरीय समूहगीत स्पर्धेत शाळेच्या या संघाने उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला. सईश्री गेजगे, संयमी वाघमारे, सृष्टी जाधव, गौरी कौलगे, प्राची ननवरे, पायल सावंत, अनन्या पारसे, ज्ञानेश्वरी पारसे, ज्ञानेश्वरी सावंत, स्वरांजली पारसे, योगिता जाधव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या गीतासाठी केंद्रीय मुख्याध्यापिका रुक्मिणी पारसे, रमेश वाघमारे, माधुरी पवार, नवनाथ धांडोरे यांचे मार्गदर्शन मिळाले. गटशिक्षणाधिकारी प्रदीप करडे, विस्तार अधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख राजेंद्र सुरवसे, सरपंच रजनी दुपडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मी बंदपट्टे, अनिल सावंत, रामचंद्र कोळी, अनिल पारसे, हिंदुराव पारसे, केशव सावंत, कुमार सावंत, दत्तात्रय पारसे, मोहिनी वाघमारे, श्रीमंत पारसे, पांडुरंग पारसे, चंद्रशेखर गाडे, आशिष धांडोरे, सतीश पारसे, शाहरुख मुलाणी, पोलीस पाटील बिभीषण दुपडे, तंटामुक्ती अध्यक्ष डॉ. आनंदराव जाधव यांनी अभिनंदन केले.



### बार्शी येथे वृक्ष संवर्धन समिती दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा उत्साहात

**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**

काल रविवारी वृक्ष संवर्धन समिती बार्शीच्या वृक्ष संवर्धन दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी रवी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मधुकर डोईफोडे होते. यावेळी साई संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल मांजरे-पाटील, लायन्स क्लब बार्शी रॉयलच्या अध्यक्षा वर्षा खांडवीकर, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा गौरी रसाळ, एसआरएम अकॅडमीचे शेख, हेल्थ क्लब बार्शीचे भगवान लोकरे, माधवबाग हॉस्पिटलचे संचालक डॉ. पवन कोळी, उद्योजक सुनील झालटे, प्राणी मित्र ललित वस्ताद, गोरक्षक धन्यकुमार पाटवा उपस्थित होते. वृक्ष संवर्धन समितीच्या टी-शर्ट किटचे उद्घाटन करण्यात आले. मधुकर डोईफोडे यांनी वृक्ष संवर्धन समितीच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी डॉ. राहुल मांजरे, वर्षा खांडवीकर, गौरी रसाळ यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी तर उदयकुमार पोतदार यांनी वृक्ष संवर्धनाची शपथ दिली. कार्यक्रमासाठी राहुल तावरे, राणा देशमुख, संदीप पवार, अक्षय भोईटे, योगेश गाडे, दीपक जाधव, उमेश नलवडे, विष्णू भोसले, गणेश कदम, डॉ.सचिन चव्हाण, रोहन अवताडे, महेश बकशेट्टी, सायरा मुल्ला, सुनीता गायकवाड, वीरेंद्र बंडे, आनंद धुमाळ, मोहम्मद शेख, बाबासाहेब बारकुल, चंद्रकांत उलभगत, देविदास अडसूळ, अनमोल वाघमारे, गणेश घोलप, प्रवीण गटकुळ, सागर बिडवे, बुगडे सर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रतीकांत हामणे यांनी तर आभार सुधीर वाघमारे यांनी मानले.

### सुषमा नायक यांना पीएच. डी प्रदान

**विजयपूर, दि. १९ डिसेंबर-**



कर्नाटक राज्य अक्कमहादेवी महिला विश्वविद्यापीठाने सुषमा नायक यांना त्यांच्या महिला ग्रामपंचायत सदस्यांच्या क्षमता निर्माणात माध्यमांची भूमिका या विषयावरील प्रबंधासाठी पीएच. डी पदवी प्रदान केली. सुषमा नायक या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाच्या प्रा. ओंकार काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. त्यांचा सत्कार कुलगुरू प्रा. बी. के. तुलसीमाला, कुलगुरू प्रा. शंकर गौडा सोमनाळ, मूल्यमापन कुलगुरू प्रा. एच. एम. चंद्रशेकर यांनी अभिनंदन केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्वामी भक्तीतून मिळणारे परमार्थाचे बोध हे शाश्वत सुखाचे साधन : डॉ. पवार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ डिसेंबर-**
आध्यात्म आणि धर्मस्थळांव्यतीरिक्त त्याला परमार्थ अपूर्ण वाटते. अशावेळी माणसाने स्वामी भक्तीत यावे. भाविकांनी स्वामींचे स्मरण ठेवून स्वामी भक्ती करीत जीवनातील स्वार्थ-परमार्थाचा सांगड घालावा. या स्वामी भक्तीतून मिळणारे परमार्थाचे बोध हेच जीवनातील शाश्वत सुखाचे साधन आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आदिवासी मंत्री डॉ. भारतीताई पवार यांनी केले. अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सन्मान केला. याप्रसंगी डॉ. भारतीताई पवार बोलत होत्या. यावेळी आ. सचिनदादा कल्याणशेट्टी, बसवराज कोळी, नन्नू कोरबू, नागेश कुंभार, लखन झंपले, खाजप्पा झंपले, संतोष जमगे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, श्रीशैल गवंडी, संजय पवार, प्रसाद सोनार, विपुल जाधव, सागर गोंडाळ, चंद्रकांत कवटगी, श्रीकांत मलवे आदी उपस्थित होते.





# ‘शिवीमुक्त मोडनिंब’ची संकल्पना

## आई-बहिणीचा उल्लेख टाळूया; अनेक ठिकाणी पोस्टर्स

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १९ डिसेंबर-**
अलीकडील काळात लहानग्यांपासून मोठ्या माणसांपर्यंत प्रत्येकाच्या तोंडातून काही ना काही कारणाने ‘शिवी’ ही उच्चारली जातेच.ग्रामीण भागात तर हमखास ‘शिव्या’ शिवाय चैन पडत नाही.माढा तालुक्यातील मोडनिंब येथे स्व. महेश काटकर फाउंडेशन आणि तरुणांनी एकत्र येत ‘शिवी मुक्त मोडनिंब’ची संकल्पना साकारली आहे.

मोडनिंब शहरातील चौकांत, कट्ट्यावर, वर्दळीच्या ठिकाणी शिवी मुक्त मोडनिंबचे फलक लावण्यात येत आहेत. आपल्या बोलण्यात आई बहिणीचा उल्लेख टाळूया, शिवीमुक्त व सुसंस्कृत मोडनिंब घडवूया या आशयाचा डिजिटल फलकच प्रदर्शित केला आहे. आई बहिणीवरून शिवी न देण्याचा संकल्प करण्याचे आवाहन देखील या बॅनरवर या करण्यात आले आहे. साधारण एखाद्या कट्ट्यावर चार टाळकी जमली की एकमेकांचा उद्धार सुरु होतो मग आपोआप तोंडातून समोरच्याला शिव्यांची लाखोली वाहिली जाते.मुलांना शाळेतील पाढे पाठ झाले नाहीत. पण, शिव्या तोंडपाठ झाल्या.मात्र हे बॅनर सध्या सर्वत्र कुतूहलाचा विषय बनले आहे.सध्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शहरात महिला आणि पुरुषांनी तसंच बाहेरुन आलेल्या लोकांनी यापुढं शिव्या द्यायच्या नाहीत.मोडनिंब येथे ‘शिवी मुक्त मोडनिंब’ ची संकल्पना साकारण्यात येत आहे. मोडनिंब शहरातील चौकांत, कट्ट्यावर, वर्दळीच्या ठिकाणी शिवी मुक्त मोडनिंबचे पोस्टर लावण्यात येत आहेत.



स्व. महेश काटकर फाउंडेशन नेहमी स्तुत्य आणि नाविन्यपूर्ण, संस्कारक्षम पिढी तयार करण्याच्या दृष्टीने उपक्रम राबित असते. हा उपक्रम तरुणांच्या पुढाकारातून होत आहे, याचा जास्त आनंद आहे. आत्ताची पिढी आणि भविष्यातील पिढी संस्कारक्षम होईल याचा विश्वास वाढला.
**-डॉ. निशिगंधा कोल्हे, माजी जि. प. अध्यक्षा**



शिवीमुक्त गाव हा सामाजिक उपक्रम खरोखरच गरजेचा असून या माध्यमातून माता-भगिनींच्या सन्मानाची जाणीव होत राहिल. शिवीमुळे एकमेकांच्या मनात होणारी व्देषाची भावना निर्माण होणार नाही. सर्वच ठिकाणी बंधुत्वाची भावना वाढीस लागून खऱ्या अर्थाने स्त्री शक्तीच्या आत्मसन्मानाचा जागर अखंडपणे चालू राहील. यामुळे सर्वांवरती चांगल्या संस्काराचे बीजारोपण होवून एक सुसंस्कृत समाजाची निर्मिती होईल.
**- वर्षा जाडकर, शहराध्यक्षा, राष्ट्रवादी**

## संक्षिप्त वृत्त...



### अकलूजमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात

**अकलूज, दि. १९ डिसेंबर-**
शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कूल, शिवरत्न स्कूल, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल व फ्री विंग्स या शाखांचा क्रीडा महोत्सव विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे पार पाडला. यामध्ये प्रशालेंतर्गत असणाऱ्या चार हाऊसमध्ये अतिशय दर्जेदार स्पर्धा संपन्न झाल्या. उद्घाटन मुख्य अभियंता सुनीता पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील होत्या. शिवरत्न स्कूलमधील आकाश हाऊसने विजेतेपद पटकावले तर एसएमपी स्कूलमधील अग्नी हाऊसने विजेतेपद पटकवले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बेस्ट अथलीट पुरस्कार दिले जात असतात. त्यात एसएमपी स्कूलमधून जोया सय्यद (अंडर १२), समर्थ निरडे (अंडर १२) व धीरु यादव (अंडर १७) यांना पुरस्कार मिळाला. शिवरत्न स्कूलमधील आरोही गदादे (अंडर १२), अधिराज सुळे (अंडर १४) व उत्कर्षा जगदाळे (अंडर १७ ) यांना बेस्ट अथलीट होण्याचा बहुमान मिळाला. सचिव धर्मराज दगडे, संचालक राऊत, प्रिंसिपल अल्बर्ट थरकन, प्रिंसिपल बिनो, माने, देशमुख उपस्थित होते.




### अकलूज शहर सकल बौद्ध समाजाचा प्रांत कार्यालयावर निषेध मोर्चा

**नातेपुते, दि. १९ डिसेंबर-**
परभणी येथे संविधानाची विटंबना करण्यात आली होती, या घटनेच्या निषेधार्थ संविधान रक्षक वडार समाजाचा आंबेडकरी चळवळीचा कायद्याचा विद्यार्थी सोमनाथ सूर्यवंशी यांना पोलीस प्रशासनाकडून अमानुष मारहाण झाली. त्यांचा कोठीत असताना मृत्यू झाला. शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ १९ डिसेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता अकलूज शहर सकल बौद्ध समाजाच्या वतीने प्रांत कार्यालयावर जाहीर निषेध मोर्चा काढण्यात आला. प्रथमत: विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास हार अर्पण करून शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. निषेध मोर्चामध्ये प्रशासन आणि दोषीच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. यामध्ये अनेक आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



### झरेच्या जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये स्टुडंट्स लीड कॉन्फरन्स यशस्वी

**करमाळा, दि. १९ डिसेंबर-**
करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने अतिशय आनंदमय व उत्साही वातावरणात लीड स्टुडंट्स कॉन्फरेन्स पार पडले. विद्यार्थ्यांनी आधुनिक युगातील विविध प्रकारची मॉडेल्स, आदित्य सूर्ययान, रोबोट, महिला अंतराळवीर सुनिता विल्यम आणि आकर्षक कलाकृती सादर केली. यावेळी ज्योती मुथा, डॉ. स्वाती घाडगे उपस्थित होत्या. मुथा व घाडगे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले, संचालिका स्वाती बिले उपस्थित होते. सूत्रसंचालन धनश्री साने यांनी केले.

# चांडगाव-पोमलवाडी पूल कधी होणार?

### मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा अत्यंत जवळचा मार्ग


### दळणवळाचा प्रश्न लागणार मार्गी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १९ डिसेंबर-**
करमाळा व इंदापूर तालुक्यादरम्यान भीमा नदी पात्रावर मागील सरकारच्या काळात उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री दत्तात्रय भरणे व माजी आ. संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नातून कुगाव ते शिरसोडीदरम्यानचा ३८२ कोटींच्या पुलाला मंजुरी देण्यात आली व त्याचे कामही जोरात सुरू झाले आहे. परंतु उजनी धरणावर चांडगाव ते पोमलवाडीदरम्यान सर्वांत कमी अंतर असून आणि मागणी होऊनही पूल झालेला नाही.

एका बाजूला पुणे-सोलापूर महामार्ग एनएच ६५ आणि दुसऱ्या बाजूला मध्य रेल्वेचे पारेवाडी रेल्वे स्टेशन (ता. करमाळा) आहे. त्यातच या पूल व रस्ताकरिता संपादनाची कोणतीच आवश्यकता नसून दोन्ही बाजूला प्रोच रस्ते आहेत. वस्तुतः कुगावपासून जेऊरकडे मुख्य रस्त्याला येताना २२ किमी बाहेर पडावे लागते व इंदापूरकडे जाताना १० किमीचे कळाशीपासून अंतर पार करावे लागते. मात्र पोमलवाडी ते चांडगाव पूल झाल्यास लोणी देवकरपासून बारामती, अकलूज, पंढरपूर, फलटण, शिखरशिंगणापूर तसेच राशिन, करमाळा टप्प्यात येणार असून या ठिकाणी साधारण ३५० मीटरचा पूल उभा राहिल्यास दळणवळण वाढणार आहे व हे फक्त ७ किमी अंतराने जोडले जाणार आहे.

विशेषतः चांडगावलाजवळच आगोती, कळाशी, लोणी देवकर, पळसदेव, वरकुटे व इतर गावे कनेक्टेड असून पोमलवाडीपासून केत्तूर, हिंगणी, गोयेगाव, वाशिंबे, देलवडी, राजुरी, पारेवाडी, कुंभारगाव, सावडी, दिवेगव्हाण, गुलमरवाडी, भगतवाडी, भिलारवाडी तसेच कोर्टी परिसर हाकेच्या अंतरात आहे. या ठिकाणाहून ब्रिटिश काळातदेखील साखळीवरची लाँच चालत होती. त्याच्या खुणा, मनोरे अजूनही पाणी खाली जाताच दिसतात. या ठिकाणचा पूल होण्यासाठी माजी आ. संजयमामा शिंदे यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनाही साकडे घातलेले असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही मागणीचे निवेदन दिलेले आहे. याशिवाय भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी गणेश कराड, नरेंद्र ठाकूर व इतर पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन दिले आहे. मराठवाडाचे पश्चिम महाराष्ट्राला कनेक्ट करणारा अत्यंत जवळचा मार्ग होणार आहे. पूल झाल्यास उसाच्या वाहतुकीसह अन्य माल वाहतुकीला चालना मिळणार असून, शिखर शिंगणापूर ते बाबीर, रुई ते लोणी देवकरपासून चांडगाव-पोमलवाडी ते राशीन जगदंबा व करमाळा कमलाभवानी देवी ते आवाटी दर्गा-परंडा-बार्शीमार्गे तुळजापूर असा नवीन मार्ग साकारणार आहे. यासाठी पुढाकार घेऊन त्या पद्धतीने नियोजन करण्याची गरज आहे.






### यांच्याकडून सुरु आहे पाठपुरावा

पूल साकारणार असल्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील आश्वासित केल्याबाबतची माहिती शिवसेना नेते सूर्यकांत पाटील यांनी दिली. जिल्हा दूध संघाचे संचालक राजेंद्रसिंह पाटील, ॲड. अजित विघ्ने, ॲड. मदने चांडगाव, सरपंच सचिन वेळेकर, प्रशांत नवले, दत्तात्रय कोकणे, राजेंद्र बाबर, पोपटराव फाळके, सरपंच सुनील ढवळे, प्रविण गुंडगिरे, नितीन पांढरे, वैभव काटकर, राजेंद्र कटारिया, उदय पाटील, ॲड. ऋषांत कानतोडे पाटील, लालासाहेब कोकणे, हरिभाऊ बाबर, बबन साळवे व ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.

### कृषी, मासेमारीला मिळणार चालना

या भागात केळी, पेरू व फळबागांची लागवड होत असून, मासे विक्रीचा मोठा व्यवसायदेखील चालतो. हा भाग जोडल्यामुळे हॉटेलिंगला चालना मिळणार असून लोणी देवकरची एमआयडीसी जवळ आल्याने रोजगार मिळणार आहे. या पुलाकरिता पश्चिम भागातील ग्रामस्थ तसेच चांडगाव, लोणीदेवकर, भावडी व इंदापूर तालुक्यातील ग्रामस्थ अग्रेसर असून, या गावातील ग्रामपंचायतीचे मागणी ठराव निवेदनासह सादर करण्यात आलेले आहेत. याशिवाय बारामती विद्या प्रतिष्ठान येथील इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रा. दिलीप आडसूळ व विद्यार्थ्यांनी या पुलाचे बनविलेले संकल्पचित्र व प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करण्यात आलेला आहे.

# निधी असूनही आदर्श शिक्षक पुरस्काराला मुहूर्त मिळेना!

### अक्कलकोट पंचायत समितीचा अजब कारभार

### पंचायत समितीला शिक्षक समितीचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ डिसेंबर-**
निधी उपलब्ध नसतानाही तत्कालीन गटशिक्षणाधिकारी कुदसिबा शेख यांनी सन २०२२-२०२३ च्या आदर्श शिक्षक पुरस्कार दिले. यंदा प्रत्येकी ५० हजारांची तरतूद जि. प. सेस फंडातून असताना अक्कलकोट तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार दिले नाही. प्रशासनाने शिक्षकांच्या चांगल्या कार्याचा गौरव करावा अशी मागणी निवेदनाद्वारे गटविकासाधिकारी शंकर कवितके व गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्याकडे शिक्षक समितीचे दयानंद चव्हाण यांनी केली आहे.



आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या सहकार्याने शिक्षणमहर्षी स्व. पंचप्पा कल्याणशेट्टी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन जवळपास ८० शिक्षकांचा गौरव केला होता. ११ पुरस्कारांसाठी १० ऑक्टोबरअखेर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले होते. मात्र प्रस्तावासाठी भरमसाठ जाचक अटी, पुरस्काराची संख्या कमी करणे आणि प्रशासनाची शिक्षकांच्या बाबतीतील भूमिका यामुळे प्रस्तावासाठी शिक्षकांनी अल्पप्रतिसाद दिला. वारंवार प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देऊनही शिक्षक प्रस्ताव दिला जात नाही.

## श्री दत्त जयंतीनिमित्त स्वामींना ५५१ किलो सुकामेव्याचा नैवेद्य

### पुण्यातील श्री स्वामी समर्थ सेवासार संघाची सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ डिसेंबर-**
श्री दत्त जयंतीनिमित्त पुण्यातील श्री स्वामी समर्थ सेवासार संघाच्या वतीने काजू, बदाम, अंजीर, अक्रोड, जरदाळू, पिस्ता, खारीक इत्यादी ५५१ किलो सुकामेव्याचा नैवेद्य काकड आरतीच्या वेळी स्वामी चरणी अर्पण करण्यात आला.

गुरुवार रोजी पहाटे पुरोहित मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते चेअरमन महेश इंगळे, अजय कोडमूर, सुधीर माळशेट्टी व सेवासार संघाचे सदस्य यांच्या उपस्थितीत हा सुकामेव्याचा नैवेद्य पहाटे काकड आरती प्रसंगी स्वामींना दाखविण्यात आला. काकड आरतीनंतर मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळें यांच्या मार्गदर्शनानुसार आरती नंतर हा सुकामेव्याचा नैवेद्य भाविकांना प्रसाद म्हणून वाटण्यात आला.

महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे आद्य अवतार श्री दत्तात्रय महाराज असल्याने येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दत्त जन्मोत्सव सोहळा साजरा करतात. भाविकही या सोहळ्यामध्य मोठ्या भक्ती भावाने सहभागी होत असतात. या पाश्वभूमीवर आज पुणे येथील स्वामी समर्थ सेवासार संघाचे सदस्य या सोहळ्यामध्ये सहभागी होऊन श्री स्वामी समर्थांवरील श्रद्धेपोटी भाविकांच्या सहकार्याने आज त्यांनी सुका मेव्याचा हा अन्नकोट त्यांनी समर्थांच्या चरणी अर्पण केलं आहे, अशी माहिती चेअरमन महेश इंगळे यांनी दिली. यावेळी प्रथमेश इंगळे, श्री वटवृक्ष महाराज देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, व्यंकटेश पुजारी, स्वामी समर्थ सेवासार संघाचे सदस्य तम्मा भिमपूरे, सुधीर माळशेट्टी, संजय पवार, गिरीश पवार, ऋषिकेश लोणारी, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, श्रीशैल गवंडी उपस्थित होते.



# विठ्ठलराव शिंदे कारखान्याचा पहिला हप्ता २,८०० रूपये


### २६ ते 30 नोव्हेंबरदरम्यानचे बील बँकेत वर्ग

### दहा दिवसाला पेमेंट देणार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १९ डिसेंबर-**
विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंबचा सन २०२४-२५ चा गाळप हंगाम सुरू झालेला असून या हंगामात गाळपास येणाऱ्या ऊसासाठी पहिला ॲडव्हान्स हप्ता प्रति टन २,८०० रूपये प्रमाणे सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना देण्यात येणार असून २६ ते ३० नोव्हेंबरचे बील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती कारखान्याचे संस्थापक चेअरमन, माजी आ. बबनराव शिंदे यांनी दिली.

अधिक माहीती देताना माजी आ. बबनराव शिंदे म्हणाले, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं. २ करकंब या कारखान्याचा सन २०२३-२५ चा गाळप हंगाम जोमाने सुरू झालेला असून या हंगामात आजअखेर युनिट नं.१ पिंपळनेर येथे आजअखेर २ लाख ९६ हजार ८६२ मे.टन व युनिट नं.२ करकंब येथे १ लाख ०६ हजार ९८१ मे. टन ऊसाचे गाळप झालेले आहे. या हंगामासाठी बँकांकडून साखर मालतारण कर्ज खात्यावर मिळणारी उपलब्धता विचारात घेवून या हंगामात गाळपास येणाऱ्या ऊसास पहिला ॲडव्हान्स हप्ता प्रति टन २८०० रूपये प्रमाणे सभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांना देण्यात येणार आहे. या हंगामात दोन्ही युनिटकडे २६ ते ३० नोव्हेंबरदरम्यान गाळपास आलेल्या ऊसास प्रतिटन रू.२८०० प्रमाणे पहिला हप्ता ऊस बील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले आहे. या ऊस बिलापोटी २८ कोटी ३७ लाख रूपये बँकेत जमा करण्यात आलेले आहेत.

मागील ऊस गाळप हंगाम २०२१-२२ पासून हंगामात गाळप झालेल्या ऊसास शेतक-यांना १० दिवसाला ऊस बिल पेमेंट देणेत येत आहे. या हंगामात देखील १० दिवसाला ऊस बिलाचे पेमेंट देण्यात येणार असून १० दिवसाला पेमेंट देणारा विठ्ठलराव शिंदे राज्यातील एकमेव कारखाना आहे. विठ्ठलराव शिंदे कारखान्याने यापूर्वी प्रत्येक हंगामामध्ये वेळेत ऊस बिले शेतक-यांना व तोडणी वाहतूक बिले वाहन मालकांना दिली असल्याने शेतकऱ्यांचा या कारखान्यावर प्रचंड विश्वास असल्याने अनेक शेतकरी आपला ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्याकडे देण्यास पसंती देत आहेत.





### ऊस देण्याचे बबनराव शिंदे यांचे आवाहन

आजपर्यंत सर्व सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी सातत्याने कारखान्यास ऊस पुरवठा करून विश्वास दाखविला आहे, त्याचप्रमाणे सन २०२४-२५ गळीत हंगामामध्येही ऊस पुरवठादारांनी त्यांचा सर्व ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे पिंपळनेर व करंकब युनिटला ऊस पुरवठा करून गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन संस्थापक चेअरमन माजी आ. शिंदे यांनी केले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलीस हक्क संरक्षक संघटनेच्यावतीने आरोग्य शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा
जळकोट, दि.१९ डिसेंबर -

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालयात शनिवार (दि.२१) रोजी कांताबाई बाबुराव इंदुरकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित , अखिल भारतीय पोलीस हक्क संरक्षक संघटनेच्या जीवनसेवा ग्रुपच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जळकोट येथील ग्रा. पं. कार्यालयात शनिवारी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास हे आरोग्य शिबिर पार पडणार आहे. या शिबिरात निजामाबाद येथील डॉ. नागनाथ देवकते व डॉ. एम. चंद्रशेखर व तज्ञ डॉक्टर मंडळी रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. यात मोफत फेजीओथेरपी, मोफत मसाज थेरपी, म फेत निसर्गोपचार व बी. पी. शुगर तपासणी करण्यात येणार आहे. तरी जळकोट व परिसरातील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिर व तपासणीचा लाभ घ्यावा. असे आवाहन कस्तुरा कारभारी व गार्डीकर यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### धनगरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास उत्साहात प्रारंभ

इटकळ, दि.१९ डिसेंबर -

तुळजापूर तालुक्यातील धनगरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. १६ ते २२ डिसेंबर या कालावधीत सुरू असलेल्या या सोहळ्यात नियमीत काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, कीर्तन, प्रवचन, हरीनाम, हरिपाठ, हरी जागर असे विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. हभप राम महाराज गायकवाड, हभप. विठ्ठल महाराज दिंडेगावकर, हभप. वैभव महाराज कानेगावकर यांच्या किर्तनाचा तर हभप. विष्णु मुंढे, हभप. दगडू जोडभावे, शिवाजी चव्हाण, चव्हाणवाडी, यांच्या प्रवचनाची सेवा संपन्न होणार आहे. २२ डिसेंबर रोजी हभप. आप्पा महाराज दिंडेगावकर यांच्या काल्याचे किर्तन संपन्न होणार आहे. यामध्ये तुळजापूर तालुक्यातील अनेक गावातील भजनी मंडळानी हरी जागरमध्ये सहभाग नोंदवला. यासाठी जय हनुमान भजनी मंडळ व धनगरवाडी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे.



#### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने नागेंद्र होसाळे सन्मानित

शिराढोण, दि.१९ डिसेंबर -

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एकुरका येथील विद्यार्थिप्रिय शिक्षक नागेंद्र होसाळे यांच्या ३२ वर्षातील केलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन प्रेरणा फाऊंडेशन ठाणे यांनी नुकताच दि.१५ डिसेंबर रोजी बल्लाळेश्वर मंगल कार्यालय बदलापूर येथे सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ ने गौरविण्यात आले. कार्यक्रम सस्साठी अतिथी म्हणून रामजित गुप्ता, मोहन शुक्ला, दिलीप नारकर, डॉ. अविनाश म्हात्रे, अभिनेत्री लेखा तोरसेकर, फाऊंडेशनच्या अध्यक्षा दिप्ती गावकर, वैभव कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शीला बाळापुरे, संदीप बाळापुरे, कल्पना बाळापुरे, विद्या होसाळे, निखिल होसाळे यांची आवर्जून उपस्थिती होती.



#### जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे क्रीडा सप्ताहाचे आयोजन

उमरगा, दि.१९ डिसेंबर -

उमरगा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव, धाराशिव जिल्हा लाठी असोसिएशन, धाराशिव जिल्हा लेझीम असोसिएशन व जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फिट इंडिया मोहिम अंतर्गत क्रीडा सप्ताह अति उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे, लाठी इंडियाचे संचालक महंमद रफी शेख, क्रीडाशिक्षक राजू सरपे, बशीर शेख, विद्यानंद सुतार, संजय रुपाजी, सरिता उपासे, सोनाली मुसळे उपस्थित होते. प्रशालेतील सातवी ते दहावीच्या शंभर मुलींना लाठीचे प्रशिक्षण देण्यात आले तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना लेझीमचा सराव घेऊन मुलांना स्पर्धेची तयारी करण्यात आली. विजयी खेळाडूंचा अभिनंदनपर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय रुपाजी तर आभार सोनाली मुसळे यांनी मांडले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



#### पोलिस पाटील संघटनेच्या वतीने राजे सावंत यांचा सन्मान

कळंब, दि.१९ डिसेंबर -

कळंब तालुक्यातील देवधानोरा येथील राजे सावंत यांना नुकताच अत्यंत मानाचा समजला जाणारा, कळंब तालुका पत्रकार संघाचा के. गणेश घोगरे यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यावद्दल पोलिस पाटील महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेभाऊ वाघमारे, विक्रम सुतार, प्रदीप वायसे, महेश पांचाळ यांनी सत्कार केला. यावेळी अशोक कुलकर्णी, सागर कांबळे, युवराज पंडित, बापुराव सुरवसे, शहाजी गवळी, वासुदेव वेदपाठक, दिनेश हुंबे, राजेश हुंबे आदी उपस्थित होते.

# कुरनूर प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी १४ कोटी रुपयांची तरतुद

## हिवाळी अधिवेशनात मंजूरी; कामास प्रारंभ.... आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती....

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध झाल्याने आता कामास सुरुवात झाली असून या रब्बी हंगामात पिकांना पाणी देण्यात येणार असुन हे करत असताना याच्या दुरुस्तीचे आव्हानात्मक काम करण्याचे ठरले आहे. जेणेकरून शेतकरी बांधवांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टळणार आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर प्रकल्पावर आधारीत असलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत बंद पाईपलाईन द्वारे पाणी देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ डिसेंबर -

नळदुर्ग परीसरातील कुरनूर मध्यम प्रकल्पातील ५५ वर्ष जुन्या पाणी वितरण व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी हिवाळी अधिवेशनात १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. दुरुस्तीअभावी मुख्य कालव्याला अनेक ठिकाणी गळती लागली आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाणी वितरण होत नसल्याने साडेतीन हजार हेक्टर क्षेत्राला फटका सहन करावा लागत आहे. वितरण व्यवस्थेत सुधारणा, अस्तरीकरण आणि बांधकाम दुरुस्तीसाठी २९ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाल्यामुळे आता १० गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कुरनूर मध्यम प्रकल्पाचा मुख्य कालवा आणि वितरीकेमार्फत प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील नळदुर्ग, अणदूर, चिवरी, गुजनूर, खुदावाडी, सराटी, शहापुर, वागदरी आणि बाभळगाव आदी दहा गावांना शेतीसाठी कालव्याद्वारे पाणी दिले जाते. दहा गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्र या पाण्यावर अवलंबुन आहे. मात्र प्रकल्पाची वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी आहे. आजवर कालव्याचा झालेला वापर, कालव्याची वेळेवर न झालेली दुरुस्ती, अशा अनेक कारणांमुळे पाण्याचा विसर्ग ५० टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. कालवा भरावातुन, बांधकामातुन अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. त्याम ळे कालव्याच्या शेवटच्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचण्यास अडचण निर्माण झाली आहे. सिंचन अवर्तनाचा कालावधीतही त्यामुळे वाढ झाल्याने सिंचन क्षेत्रात मोठी घट झाल्याचे तसेच अनेक ठिकाणी शेवटच्या टोकाला कालवा बुजविला गेल्याचेही निदर्शनास आले असल्याचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

मागील ५५ वर्षात या कालव्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे परिसरातील गावांना त्याचा तोटा सहन करावा लागत आहे. अनेक शेतकरी बांधवांनी उपोषण केले.अनेकांनी आत्मदहनाचे पत्र दिले. रब्बी आणि उन्हाळी हंगामात कालव्याच्या नादुरुस्तीमुळे अनेकांच्या पिकाला पाणी मिळू शकले नाही. त्यामुळे या प्रकल्पातुन पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली घट दूर व्हावी आणि सिंचन क्षेत्र वाढावे, याकरिता वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरण आणि त्यावरील बांधकाम दुरुस्तीसाठी महायुती सरकारकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला होता. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी तब्बल २९ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. त्यामुळे कालव्याच्या लाभ क्षेत्रातील वरील १० गावांमधील शेकडो शेतकरी बांधवांची मागणी महायुती सरकारमुळे पुर्णत्वास येणार आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने महायुती सरकारने १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. १० किलोमीटर लांबीच्या मुख्य कालव्यासह २४ किलोमीटर लांबीच्या पाणीवितरण व्यवस्थेच्या कामाचे अस्तरीकरण आणि बांधकाम कामाची निविदा यापुर्वीच दि. ७ ऑक्टोबर रोजी जाहिर झाली आहे. मागील ५५ वर्षांपासून दुरुस्तीअभावी रखडलेल्या कुरनूर मध्यम प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे या दहा गावातील शेतकर्यांना त्यांच्या हक्काचे पाणी लवकरच उपलब्ध होणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## किर्तन हे उद्धाराचे साधन, मनोरंजनाचे नाही : हभप. टिकले गुरुजी महाराज

तभा वृत्तसेवा
खामसवाडी, दि.१९ डिसेंबर -

किर्तन हे उद्धाराचे साधन असुन यातुन माणुस घडतो. मात्र संप्रदयातही भोंदुगिरी वाढल्याने किर्तनाकडे मनोरंजन म्हणुन समाज भगत असल्याची खंत हभप. शिवराज महाराज टिकले यांनी व्यक्त केली. कळंब तालुक्यातील खाम सवाडी येथे अखंड हरिनाम सुरु असून यावेळी महाराज बोलत होते.

हभप. वै.स्व. रामकृष्णभाऊ एडशीकर यांनी पंचावन्न वर्षापूर्वी खाम सवाडीत चालु केलेल्या या हरिनाम सप्ताह सेवा अखंडपणे चालु आहे. सद्याच्या परिस्तितीय समाजात भोंदुगिरी महाराजांची संख्या वाढत आहे परिणामी किर्तनाकडे समाजाचा दृष्टकोन मनोरंजन म्हणून होत आहे. किर्तनातून माणुस घडतो. सांप्रदाय जर अजून टिकून असेल तर फक्त संतांचे आशीर्वाद शिकवण यामुळे संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरोबा काका अशा अनेक संत मंडळींनी जगातील संप्रदायाची घडी बसविली. जगाला संप्रदायाची शिकवण दिली, असे ते म्हणाले. मुलींनी घराण्याचे मुलांनी आई-वडीलांचे संस्कार अंगिकारले पाहिजेत, शिक्षणाचा उपयोग सतकर्णी लागला पाहिजे अशी आशा त्यांनी व्यक्त केली. अखंड हरिनाम सप्ताहातील बुधवार त्यांची पाहिली सेवा होती. तत्पूर्वी हभप. टिकले गुरुजी महाराज यांच्या हस्ते कलशपुजन झाले. तर हभप. भारत महाराज शेळके यांच्या हस्ते गाथा पुजन करण्यात आले.

सद्यस्थितीत सगळीकडे थंडीची तीव्रता जास्त आहे. या हरिनाम सप्ताहात महिलांची संख्या लक्षणीय होती.

## श्री तुळजाभवानी मातेचा आशीर्वाद निश्चितच माझं बळ वाढवणार : ममता सपकाळ

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१९ डिसेंबर -

तुळजापूरच्या आई भवानीचा पदस्पर्श झालेली कवडयांची माळ आज आशीर्वाद म्हणून पदरात आली आहे. हा आशीर्वाद निश्चितच माझं बळ वाढवणार आहे, अशी भावना समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांनी व्यक्त केली.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला तुळजापूरचा योग निश्चित झालाय. आई म्हणजेच सिंधुताई सपकाळ अनेकदा तुळजाई नगरीत आल्या होत्या. माईंना माननारा खूप म ोठा वर्ग मराठवाड्यात आहे. मी कधीही तुळजाई नगरीत आले नाही. प्रथमच मला हिरकणी



पुरस्काराच्या निमिताने आई श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासह माई परिवाराच्या सर्व सदस्यांना भेटायची ओढ लागली आहे अशी भावना ममता सिंधुताई सपकाळ यांनी बोलून दाखवली. श्री क्षेत्र तुळजापूर येथे राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळा जानेवारी महिन्यात पार पडतो आहे. या सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी हिरकणी पुरस्कार समितीचे सदस्यांनी मांजरी पुणे येथील म ईच्या समती बाल निकेतन संस्थेत जाऊन ममताताईंची भेट घेतली.

ममताताई सपकाळ यांचा आई तुळजाभवानी मातेचा आशीर्वाद रुपी कवडयाची माळ, प्रतिमा देऊन सत्कार केला. याप्रसंगी पुजारी नगर फाऊंडेशन अध्यक्ष गणेश पुजारी, गोविंद डोंगरे, बाबा घोंगते, शिवशंकर भारती, हरिदास मदने, नागेश नरवडे, मुख्य संयोजक अनिल आगलावे उपस्थित होते.

## 'लांडगा आला रे... लांडगा आला' प्रमाणे बिबट्याचे होऊ नये; सुज्ञ शेतकऱ्यांची अपेक्षा

### अफवेवर विश्वास ठेवू नका : वन विभाग तुळजापूर

तभा वृत्तसेवा
मंगरूळ, दि.१९ डिसेंबर -

तुळजापूर तालुक्यातील कसई, चव्हाणवाडी, सरडेवाडी, होनाळा यासारख्या अनेक गावांत गेल्या २ डिसेंबर रोजीच्या मध्यरात्रीपासून बिबट्या आढळून आल्याची चर्चा सोशल मीडियाच्या माध्यमातून जोर धरू लागली आहे.

याबाबत कुठलेही ठोस पुरावे वन विभागाच्या अधिकार्यांना परिसराची पाहणी व शहानिशा केली असता उपलब्ध झाले नसल्याचे त्यांना संपर्क साधून माहिती घेतली असता अफवेवर विश्वास ठेवू नका. अफवा पसरवणार्यांवर योग्य ती कारवाई करू असा सज्जड इशाराही वन परिक्षेत्र अधिकारी तुळजापूर यांनी दिला आहे. तसेच



रात्रीच्या वेळी लाठी काठी, बॅटरी, रेडिओ किंवा मोठ्या आवाजाचा ध्वनिक्षेपक जवळ बाळगून शेतकऱ्यांनी रात्रीचे दैनंदिन कामकाज करावे व शेतकरी शेतमजूर नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन केले आहे. बिबट्या हा हिंस्र प्राणी असून शक्यतो.

हा प्राणी मोठे जंगल, दरी खोऱ्यात वावरणारा असून आपल्या तुळजापूर तालुक्यातील कुसळी भागात आढळणे दुरापास्त असल्याचेही तज्ज्ञांचे मत आहे. गेल्या दोन तीन महिन्यापूर्वी आपसिंगा फॉरेस्ट येथे आढळून आलेली एकमेव घटना सोडल्यास अशी कुठलीही घटना घडल्याचे निष्पन्न झाले नाही.

यामुळे जशी लहान मुलांना आपण 'लांडगा आला रे लांडगा आला' ही बालकथा ऐकवतो तशी गत बिबट्याची होऊ नये म्हणजे झाले, अशी चर्चा शेतकरी वर्गातून होऊ लागली आहे.

## कागदी कपांवर बंदी घालण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१९ डिसेंबर -

कॅन्सर सारख्या जीवघेण्या आजारांना कारणीभुत ठरत असलेल्या चहाच्या कागदी कपावर इतर जिल्ह्याप्रमाणे धाराशिव जिल्ह्यातही प्रशासनाने तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी नागरीकांमधुन होत आहे.



चहाचे कागदी कप बनविताना त्यामध्ये बीपीए नामक केमिकलचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. सदरील कागदी कपात गरम चहा किंवा पाणी घातल्यास कपाच्या आतील मायक्रो प्लास्टिक वितळते आणि त्या कपातुन चहा घेत असताना लाखो मायक्रो प्लास्टिकचे कण माणसाच्या पोटात जातात आणि यामुळेच आज हजारो नागरीकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागत असल्याचे उघड होत आहे त्यामुळे धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ एक आदेश काढुन चहाच्या कागदी कपावर जिल्ह्यात बंदी घालावी अशी मागणी होत आहे.

आज सर्वत्र हॉटेलमध्ये सगळीकडे चहासाठी कागदी कपच वापरले जात आहेत. वास्तविक पाहता फार पुर्वीच या चहाच्या कागदी कपावर बंदी घालणे आवश्यक होते. आज मोठ, मोठे अधिकारी कधीही कागदी कपातुन चहा पीत नाहीत त्यांच्यासाठी पारंपारीक कप आणि बशी उपलब्ध असते. किंवा काचेच्या ग्लासामधुन ही मंडळी चहा पितात त्यामुळे चहाच्या कागदी कपाचा धोका किंवा गांभीर्य यांना कधीच कळणार नाही.

आज राज्यातील कांही जिल्ह्यात त्या, त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी चहाच्या कागदी कपावर बंदी घातली आहे. त्यामुळे चहाच्या कागदी कपाचे धोके लक्षात घेऊन धाराशिव जिल्ह्यातही जिल्हा प्रशासनाने तात्काळ चहाच्या कागदी कपावर बंदी घालावी, अशी मागणी होत आहे.

## येरमाळा पोलिस ठाणे गुन्ह्यातील दोन गुन्हेगार तीन महिन्यासाठी तडीपार

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.१९ डिसेंबर -

येरमाळा पोलिस ठाणे गुन्ह्यातील दोन गुन्हेगारांना तडीपार प्रस्तावाला वरिष्ठ मंजुरी दिल्याने दोन गुन्हेगारांना जिल्ह्यातून तीन महिन्यासाठी तडीपार करण्यात आले आहे. याशिवाय येडेश्वरी देवी मंदिरावरील सुरट, टायगर गेम आदी वादातून घडलेल्या गुन्ह्या नंतर ते गेम पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत.

पोलीस स्टेशन येरमाळा हद्दीतील गुन्हेगार रामेश्वर शिवाजी शिंदे (रा. पानगाव, ता. कळंब) बालाजी भाऊ शिंदे (रा. चोराखळी, ता. कळंब) यांच्यावरील म ुंबई पोलीस कायदा कलमान्वये प्रमाणे प्रस्ताव उपविभागीय कार्यालय कळंब येथे पाठविण्यात आला होता. सदरच्या दोन्ही प्रस्तावातील प्रतिबंधात्मक इसम यांना धाराशिव जिल्ह्यातून तीन महिन्याकरिता हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. येथील श्री. येडेश्वरी देवी मंदिरावर मंगळवार, शुक्रवार, रविवार दिवशी सुरट, टायगर गेम अशा जुगाराचे प्रमाण वाढले होते. झुगार खेळवताना होणाऱ्या गर्दीचा फायदा घेऊन पाकीट मारीचे प्रकार वाढले होते. जुगारात हातचलाखीने भाविकांचे खिसे रिकामे केले जात होते. जुगारात पैसे गेल्यानंतर होणाऱ्या वादातून मारामारीचे प्रमाण वाढले होते.

ऑक्टोबर महिन्यात २४ तारखेला पुण्यातील महिला भाविक, भाविकांना पॉकेट चोरी नंतर झुगाऱ्यांकडून मारहाण झाल्या प्रकरणी सहा जनावर गुन्हा दाखल होता. या प्रकरणाची दैनिक 'तरुण भारत' ने बातमी प्रसिद्ध केली होती. तसेच याचे व्हिडिओ क्लिप राज्यभरात, भाविकात व्हायरल झाल्याने प्रकरण चांगलेच चर्चेत आल्याने पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. शिवाय देवस्थानाची बदनामी होत असल्याने देवस्थान ट्रस्ट, पोलिसांनी हे प्रकार बंद करावे अशी भाविकातून मागणी होत होती.

त्यावर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस अधिकारी महेश क्षिरसागर यांनी दखल घेऊन मंदिर परिसरातील जुगार बंद केला असल्याने ग्रामस्थ व भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



श्री. येडेश्वरी मंदिरावरील जुगार प्रकाराबाबत गेल्या आठवड्यात झालेल्या येरमाळा पोलिस ठाणे वरिष्ठ कार्यालयाच्या दोन्ही तपासणीत पोलिस अधीक्षक संजय जाधव,उपविभागीय अधिकारी संजय पवार यांचे मार्गदर्शन घेऊन कारवाई केली असुन भविष्यात असे प्रकार मंदिर परिसरात दिसणार नाहीत.

**- महेश क्षिरसागर, सहायक पोलिस निरीक्षक**

## राजाबजार जैन पंचायतच्या वतीने कचनेर क्षेत्रावर निवडुन आलेल्या पदाधिका-यांचा सन्मान समारोह संपन्न



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.१००८ खंडेलवाल दिंगबर जैन पंचायत पार्श्र्वनाथ मंदिर राजाबजार येथे नुकतेच श्री.१००८ चितामणी पार्श्र्वनाथ दिंगबर जैन अतिशय क्षेत्र कचनेर विश्वस्थ मंडळाच्या अध्यक्ष पदी सुरेश कासलीवाल, तर व्यवस्थापकीय संचालक म्हणुन भरत ठोले, उपाध्यक्ष पदी संजय कासलीवाल यांची नियुक्ती झाल्याबददल राजाबजार जैन पंचायत तर्फे त्यांचा शाल श्रीफळ हार देउैन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी नूतन विश्वस्थ मंडळाच्या सदस्याना सर्व उपस्थित समाज बांधव कडून अभिनंदन करण्यात आले व क्षेत्राचा विकासासाठी प्रयत्न करावे कार्यकमाचे सुत्रसंचालन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले तर प्रास्ताविक पंचायत सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले. कार्यकमाची सुरैवात मंगलाचरणाने करण्यात आली. नूतन यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा,विश्वस्थ महावीर ठोले,निता ठोले,चंदा कासलीवाल,विनोद लोहाडे, प्रमोद जैन यांची नरेंद्र अजमेरा, प्रमोद पाटणी, दिनेश ठोले,बापु कासलीवाल, संतोष कासलीवाल,प्रदिप पाटणी,अशोक छाबडा,जितेंद्र पहाडे, शांतीलाल पाटणी, सुरजमल छाबडा, देवेंद्र काला, दिलीप सेठी, अशोक बोहरा, विपीन कासलीवाल, आशा काला विनोद अजमेरा यांच्यासह समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थिती होती.

## शासकीय कार्यालयात सुशासन सप्ताह

छत्रपती संभाजीनगर,दि.१९ (जिमाका):- जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात गुरुवार दि.१९ ते मंगळवार दि.२४ दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात शासनाने निर्देश दिले असून या सप्ताहात विशेष शिबिरांचे आयोजन करुन सार्वजनिक तक्रारींचे निराकरण करणे, राज्यशासनाच्या पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण करणे, ऑनलाईन सेवा वितरण , सेवा वितरण अर्ज निराकरण यासंदर्भातील तक्रारींचे निराकरण करावे असे उपजिल्हाधिकारी सामान्य श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे.


## आत्माराम देसाई यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ डिसेंबर : सोयगाव शहरातील आत्माराम रामचंद्र देसाई(वय.७०) यांचे दि.१९ गुरुवार रोजी सकाळी वेळ १०:०० वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५:३० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,नातु,नातवंडे,असा परिवार आहे. ते बाळू बोरसे यांचे ते मामा होत.

## सुपडू घनघाव यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ डिसेंबर : सोयगाव शहरातील सुपडू दगडू घनगाव(वय.८५) यांचे दि.१९ गुरुवार रोजी वेळ दुपारी २:०० वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ६:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.

# के.प्रा.शा.सोयगावच्या कला निर्देशकाच्या गैरहजरीमुळे; ६ वी व ७ वीच्या १२६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

सोयगाव,दि.१९(प्रतिनिधी)

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे सहावी आणि सातवी इयत्ता मध्ये शिक्षक घेत असलेल्या एकशे सहविस विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद प्रशासनाने,रविंद्र राजपूत कला निर्देशक म्हणून नियुक्त केलेले असून या महाशयांनी गेल्या एक महिन्यापासून शाळेच्या मुख्यापकाला पुर्व सुचना न देता एक महिन्याची दांडी मारल्याने दरम्यान चित्रकला ग्रेड परिक्षेपासुन बाल विद्यार्थ्यांना विचित ठेवल्याने शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्यांनी या निदर्शकास सेवेतून निलंबित करण्यात यावे अशी लेखी





स्वरूपाची मागणी शिक्षणाधिकारी यांना केली आहे.

रविंद्र राजपूत असे अंशकालीन निर्देशक ( कला ) असे या शिक्षकांचे नाव आहे. दि.१९ नोव्हेंबर ते दि.१६ डिसेंबर

> निर्देशांक राजपूत यांनी एक महिना गैरहजर राहण्याचे कारण व माफी नामा मुख्याध्यापकांकडे सादर केला आहे.
> – रंगनाथ आढाव, गटशिक्षणाधिकारी पं.स.सोयगाव

२०१४ पर्यंत निर्देशकांनी शाळेचे मुख्याध्यापक मोतिराम जोहरे यांना कुठलीही पुर्व सुचना,लेखी अर्ज न देता मनमानी करिता एक महीण्याची दांडी या बहाद्दराने मारली.

शालेय समिती अध्यक्ष भागवत गायकवाड,विशाल कंडारे, अन्ना वाघ,सुनील ठोंबरे, व विद्यार्थ्यांनी १२ डिसेंबर रोजी गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांना लेखी तक्रार दिली त्यात नमुद आहे की,आर्टिआयच्या नियमानुसार मुलांच्या सुप्त गुणांस वाव मिळावा म्हणून कला क्रीडा कार्यनुभव यावा म्हणून कला निर्देशक घेतलेले आहेत.मात्र कला विषयावर सुप्त गुणांनपासून विद्यार्थी वंचित राहिलेत अश्या निर्दे शकाला सेवेतून कार्यमुक्त करण्यात यावे अशी मागणी केली आहे. पूर्वीचे महाजनसर ह्या कला निर्दे शांकांची पुन्हा नव्याने नियुक्त करुन आम्हाला न्याय द्यावा असेही म्हटले आहे.

> १९ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर दरम्यान निर्देशांक रविंद्र राजपूत पुर्व सुचेना न देता गैरहजर होते.यांची अनियमितता शालेय समिती वेतागली त्याच प्रमाणे विद्यार्थी पालकही संतप्त होवून त्यांनी लेखी तक्रारी केल्या आहेत म्हणून राजपूत यांनी गैरहजरी बाबत खुलासा करावा अशी लेखी सुचना देण्यात आली असून त्यांनी १६ डिसेंबर रोजी शाळेतील शिक्षक हजेरी पटावर अचानक प्रकट होवून सही केली.याविषयीचा अहवाल वरिष्ठ अधिकारी यांना सादर करण्यात आला आहे
> – मोतीराम जोहरे, मुख्याध्यापक जि.प.कें.प्रा.शाळा सोयगाव

## पैठणला दत्त जयंती संगीत महोत्सवाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ : पैठण येथील संत एकनाथ महाराज मंदिर(नाथवाडा) येथे गेल्या १३ वर्षांपासून दत्त जयंती निमित्ताने संगीत महोत्सवाचे आयोजन केल्या जाते. यावर्षीही २० डिसेंबर ते २१ डिसेंबर या दोन दिवशी सायंकाळी ७:०० वाजता संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन, महोत्सवाचे हे १४ वे वर्ष आहे.

या महोत्सवासाठी उदघाटक म्हणून डॉ.अनंत कडेठाणकर, किशोर चव्हाण यांच्या सह प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी



नागरी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश अभिनंदन पाटांगणकर, दत्तात्रय पोहेकर यांची उपस्थिती राहणार आहे.

या संगीत महोत्सवात कृष्णा बोंगाणे ( उस्ताद राशीद खान यांचे शिष्य ), कु.युगंधरा केचे (विदुषी पंडिता शुभदा पराडकर यांची शिष्या), सौ.अदिती गोसावी/रवंदे (अंकिता जोशी यांच्या शिष्या) व श्रीकृष्ण उर्फ मिलींद गोसावी यांचे गायन होणार आहे. या गायना सोबत अभिनय रवंदे, गजानन केचे (हार्मोनियम) व आशय कुलकर्णी व व्यंकटेश पंडित (तबला) हे संगत करणार आहेत. तरी या महोत्सवास सर्व रसिकांनी , भाविकांनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा . असे आवाहन हरिपंडीत गोसावी, शैलेश मंगिराज, मकरंद शहापुरकर, सौ.मृणाल गोसावी, संजय डोळे व गौरी गोसावी (देशमुख) यांच्या सह श्री भानुदास एकनाथ प्रतिष्ठाण पैठण च्या सदस्यांनी व श्रीकृष्ण (मिलींद) गोसावी अध्यक्ष श्री.भानुदास एकनाथ प्रतिष्ठाण पैठण यांनी केले आहे.

## निर्यात प्रचालन कार्यशाळा सोमवारी

छत्रपती संभाजीनगर,दि.१९ (जिमाका):- उद्योजक , निर्यातदार आणि व्यावसायिकांना एकाच व्यासपीठावर आणून उत्पादीत मालाच्या निर्यातीस चालना देण्यासाठी सोमवर दि.२३ रोजी सकाळी ९ वा. एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे,असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी कळविले आहे. बजाज भवन, सीएमआयए सभागृह, प्लॉट नं.पी-२, रेल्वेस्टेशन एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर येथे ही कार्यशाळा होणार आहे. उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र कुशवाह यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे राहणार आहेत. या कार्यशाळेत निर्यात धोरण, प्रक्रिया, प्रोत्साहन , बँक प्रणाली व विदेशांशी व्यापार इ. विषयांवर अजय कोर्ला, मुकेश समतानी, सहदेव सातपुते, मौलिक मावानी, सुयोग भासे, अमोल मोहिते. स्वप्निल राठोड हे तज्ज्ञ व्यक्ति मार्गदर्श करणार आहेत. कार्यशाळेस उपस्थितीचे आवाहन उद्योग विभागाचे सह संचालक बी.टी. यशवंते व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड यांनी केले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू तर एक जण गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ डिसेंबर : पैठण ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील चितेगाव येथील रमानगर वस्तीजवळ अज्ञात वाहनाने भरघाव वेगाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे तर एक जण गंभीर झाला आहे तर अज्ञात वाहन व चालक हे भरघाव वेगाने पळत पसार झाल्याची घटना आज दि १८बुधवार रोजी रात्री आठ वाजे दरम्यान घडली आहे.बिडकीन येथुन दुचाकी वाहन क्रमांक एम एच २० बीजे २०४१ या दुचाकीवरून नातेवाईकांना कांचनवाडी येथे सोडण्यासाठी जात असलेल्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे तर सहकारी गंभीर जखमी झाला आहे.या अपघातात मयत दुचाकीस्वाराचे नाव कान्हु दत्तात्रय घोडके,वय.३६ वर्षे,रा. रामनगर,बिडकीन,ता.पैठण हि व्यक्ती मयत झाली आहे तर दत्ता रामनाथ शेजुळ,वय.२४ वर्षे,रा.कांचनवाडी हा गंभीर जखमी झाला आहे. घटनास्थळावरुन वाहनधारक व नागरिकांच्या मदतीने कान्हु घोडके व दत्ता शेजुळला ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथे दाखल केले असता कान्हु घोडके यास वैद्यकीय अधिकारी यांनी तपासुन मयत घोषित केले आहे.तर दत्ता शेजुळवर प्रथमोपचार करून पुढिल उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.कान्हु घोडके हे दत्ता शेजुळला कांचनवाडी येथे गावी सोडण्याकामी जात असताना हा अपघात झाला आहे.याबाबत पोलीस ठाणे बिडकीन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे

## संतोष करपे पाटील,यांच्या निवासस्थानी सदगुरू आक्काताई महाराज यांचे भेट

तभा वूतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु साध्वी आक्काताई महाराज यांनी खुलताबाद येथे संतोष पाटील करपे यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन विविध विषयावर चर्चा केली, करपे परिवाराच्यावतीने महाराजां चे पूजन करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष लताताई घोडके भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश जी वाकळे कैलास मिसाळ सर आर आर करपे भगवान करपे शिवाजी घोडके सुनील भाऊ मानघरे गिरजाबाई करपे पुष्पा बाई घोडके ज्योती करपे आलकाबाई. चंद्रकला करपे शितल ताई फुलारे .मंगल ताई घोडके ज्योती घोडके राजवीर करपे आयुष्य घोडके यांच्यासह करपे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## सामाजिक सुरक्षा कवच म्हणजेच प्रॉव्हिडंट फंड. पेन्शन आणि जीवन विमा कवच

छत्रपती संभाजीनगर : सामाजिक सुरक्षा कवच म्हणजेच प्रॉव्हिडंट फंड. पेन्शन आणि जीवन विमा कवच. २८ लाख ३४ हजार ७६३ सदस्य/त्यांच्या कुटुंबियांसाठीच्या योजना, कर्मचारी पेन्शन योजना कर्मचारी ठेव संलग्न विमा योजना, १९७६ च्या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात उपलब्ध करून दिली जात आहेत, ही सेवा कर्मचारी प्रॉव्हिडंट फंड संघटनेच्या छत्रपती संभाजी नगर विभागाकडून दिली जात आहे.

योजनांचे सदस्य म्हणून समाविष्ट आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी, प्रत्येक सदस्याला युनिव्हर्सल अकाउंट नंबर दिला जातो. सदस्यांचे लॉगिन तयार केले आणि सक्रिय केले तरच दावा दाखल करण्यासह कोणत्याही ऑनलाइन सेवांचा लाभ घेऊ शकतात आणि म्हणून सर्व सदस्यांनी सदस्य पोर्टलमध्ये 'महत्वाची लिंक' अंतर्गत सक्रिय करा या कार्यक्षमतेद्वारे उपलब्ध केलेल्या ऑनलाइन सुविधेद्वारे लॉगिन तयार करणे आवश्यक आहे. ही सुविधा युनिफाइड पोर्टलच्या सदस्य इंटरफेसवर उपलब्ध आहे.

नवीन सदस्यांचे यूएएन त्वरित अद्ययावत करणे आवश्यक आहे. कारण ते जलद गतीने केले जाऊ शकते आणि सर्व आवश्यक तपशील सामान्यत: ते ज्या आस्थापनांमध्ये कार्यरत आहेत त्यांच्याकडे उपलब्ध असतात. आकडेवारीनुसार अजूनही मोठ्या संख्येने नवीन कर्मचारी, सुमारे ५५००, जे १ ऑगस्ट २४ रोजी व त्यानंतर रुजू झाले आहेत त्यांनी त्यांचे यूएएन सक्रिय केलेले नाहीत. त्यामुळे सर्व सदस्यांना त्वरित सक्रिय करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहिती/सुविधेसाठी ते आस्थापनातील अधिकृत व्यक्तीशी संपर्क साधू शकतात. कर्मचारी/नियोक्ते यांना सक्रिय करण्यात कोणतीही अडचण आल्यास जनसंपर्क अधिकारी, प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्याशी संपर्क साधावा.

## प्रक्षेत्र दिवसानिमित्त कापसासह भाजीपाला लागवड मार्गदर्शन

### केव्हीकेवा आसडीमध्ये कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर :

केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या विशेष कापूस प्रकल्पाअंतर्गत १७ डिसेंबर २०२४ रोजी मौजे आसडी येथे प्रगतशील शेतकरी कमलाकर शिरसाट यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषी विज्ञान केंद्राचे विस्तार शिक्षणचे विषय विशेषज्ञ डॉ. बी. एल. पिसुरे यांनी प्रकल्पाचा उद्देश शेतकऱ्यांना समजावून सांगितला. दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञान



याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञानामध्ये योग्य अंतर आणि संतुलित व गरज लागेल तेंव्हाच खतांचा वापर करणे या बाबी शेतकऱ्यांनी लक्षात घेतल्या पाहिजेत. यामध्ये पिसुरे यांनी ३० दिवसांनी गळ फांदी काढणे व ८०-९० दिवसांनी शेंडा खुडणे ही महत्त्वाची कामे आहेत. तसेच कापसाची लागवड ही ९० बाय ३० सेंटिमीटर अशा अंतरावर करावी. या पद्धतीने झाडांची एकरी संख्या वाढून उत्पन्न वाढते. तसेच सर्व शेतकऱ्यांनी बेडचा व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर प्रभावीपणे करणे गरजेचे आहे आणि अन्नद्रव्य, कीड व रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. ज्यामध्ये निळे व पिवळे चिकट सापळे लावणे, कामगंध सापळे लावणे, निंबोळी अर्काचा नियमितपणे वापर करणे, जैविक बुरशीनाशकांचा वापर करावा, असे सांगितले. कपाशी वेचणीनंतर अनेक शेतकरी फरदड घेतात, ते घेऊ नका. त्याऐवजी पऱ्हाटीची कुट्टी करा. त्यातून चांगले सेंद्रिय खतच मिळते. परिणामी, जमिनीचा पोत सुधारतो असे डॉ. पिसुरे म्हणाले.

भाजीपाला लागवड तंत्रज्ञान

डॉ. संजुला भावर विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) यांनी भाजीपाला लागवड तंत्रज्ञान व फळबाग लागवड याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी प्रामख्याने टोमॅटो पिकातील विविध वाणांची माहिती दिली. उदा. अर्का रक्षक, अर्का अभेद, परभणी टोमॅटो -५ इ. वाणांची शेतकऱ्यांनी लागवड करावी, मोसंबी चिंच, आंबा या पिकांच्या फळबांगा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले-

यावेळी आसडी येथील विशेष कापूस प्रकल्पांतर्गत प्रगतशील शेतकरी कमलाकर शिरसाट, कौतिक मिरगे, विष्णू पंडित यांनी कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेतले, याबद्दल आपले अनुभव शेतकऱ्यांना सांगितले. विशेष कापूस प्रकल्पाचे तांत्रिक प्रशिक्षक सतीश कदम यांनी सर्व तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले.

## हल्ली लेखकांच्या साहित्याची समीक्षा होत नाही : मराठी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांची खंत

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

मराठी साहित्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही आणि मोठ्या लेखकांच्या साहित्याची समीक्षा होत नसल्याची खंत मराठी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी 'पुण्यनगरी' शी बोलताना व्यक्त केली. 'विंदांचे गद्यरूप' या ग्रंथासाठी डॉ. रसाळ यांना भारताच्या सर्वोच्च अशा मराठी साहित्य अकादमीचा पुरस्कार बुधवारी, १८ डिसेंबर रोजी जाहीर झाला. याबद्दल प्रतिक्रिया देताना डॉ. रसाळ म्हणाले, माझ्यासाठी हा सर्वोच्च पुरस्कार आहे. अतिशय पारदर्शीपणाने हा पुरस्कार दिला गेला आहे. यासाठी पुस्तक उत्तमच असले पाहिजे. कोणाचीही इथे वर्णी लागत नाही. मराठी साहित्य अकादमी ही पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्थापन केलेली भारत सरकारची स्वायत्त अशी संस्था आहे. नेहरू साहित्य रसिक होते. साहित्यिकांमध्ये ते रमत. राजकारण विसरून नेहरू ते लेखकांबरोबर मनमोकळ्या गप्पा मारत. या सर्वोच्च सन्मानामुळे प्रभाकर पाध्ये, श्री. ना. पेंडसे, आरती प्रभू, जी. ए. कुलकर्णी, र. वा. दिघे यांच्या एवढा मी मोठा आहे, असे मला म्हणायचे नाही. मात्र, या दिग्गज लेखकांच्या पंक्तीत माझी वर्णी लागल्याचा आनंद होत असल्याचे रसाळ म्हणाले.

हल्ली मोठमोठ्या लेखकांच्या साहित्याची समीक्षाच होत नसल्याचे सांगताना डॉ. रसाळ म्हणाले, हल्ली उत्तम दर्जाच्या साहित्यावर कोणी समीक्षाच लिहित नाही. पाध्ये, पेंडसे, प्रभू, दिघे यांचे साहित्य सर्वांसमोर येवू शकले नाही, त्याचे कारण त्यांच्या साहित्याची समीक्षाच झाली नाही. श्री. ना. पेंडसे यांनी उत्तमोत्तम कादंबऱ्या लिहिल्या, मात्र त्यावर कोणी लिहिलेच नाही. आरती प्रभू आणि जी. ए. कुलकर्णी यांच्यावरही जुजबी लिहिलं गेले आहे. र. वा. दिघे यांनी कादंबरीला नवे रूप दिले. मात्र, कादंबरीवर बोलतना त्यांचे कोणीच नाव घेत नाही. वा. ल. कुलकर्णींचेही कोणी नाव घेत नाही.

मराठी विभाग ओस

समीक्षण व्हायचे असेल तर मराठी वाङ्.मयाचे रितसर शिक्षण हवे. हल्ली विद्यापीठांतील मराठी विभाग ओस पडले आहेत. बुद्धीजिवी विद्यार्थी मराठीकडे येत नाहीत. मराठीची पदवी मिळते, पण वाङ्.मयाचा विचार कसा करायचा हे त्यांना कळत नाही. मराठी साहित्याचे वाचक कमी झाले याबद्दल डॉ. रसाळ म्हणाले, मुख्यत्वे १९६० नंतर वाचकांच्या संख्येत मोठी घट झाली. महाराष्ट्रात शिक्षणाचा स्फोट झाला आहे. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर साक्षरतेचे प्रमाण वाढले. वाङ्.मयीन मासिक सोडले तर एकही मासिक शिल्लक नाही.

जी आहेत, ती दुय्यम दर्जाची. रा. भि. जोशी उत्तम दर्जाचे प्रवासवर्णन लिहायचे, दुर्गा भागवत ललित, इरावती कर्वे ही मासिकांतून लेखन करीत. मासिके नष्ट झाल्यामुळे वाङ्.मया प्रकार नष्ट झाले. त्यामुळे वाचक वर्गही राहिला नाही. प्रकाशन संस्थाही डबघाईस आल्या. अशा परिस्थित मराठी वाङ्.मय समोर येत नाही. हल्ली जाहितींमुळे वर्तमानपत्रांमधूनही समीक्षणे येत नसल्याचे रसाळ म्हणाले.

मराठी माणूस सांस्कृतिक अस्मिता विसरत चालला आहे. सांस्कृतिक अस्मिता विकसित करण्याची जबाबदारी मराठी माणसावर आहे. मराठी वृत्तपत्रात दर शुक्रवारी चारपानी साहित्य-सांस्कृतिक पुरवणी निघाल्यास पुस्तक परीक्षण, सांस्कृतिक घडामोठी आल्यास बेळगावपासून गडचिरोलीपर्यंत मराठी माणूस पेपर घेईल, असे रसाळ म्हणाले. मराठी समाजाचे अनेक प्रश्न आहेत. शेतकरी मोठ्या संख्येने आत्महत्त्या करीत आहेत. शहरी मराठी माणसांना त्याचे काहीच वाटत नाही. याविषयावर कोणी गांभीर्याने लिहित नसल्याची खंत रसाळ यांनी व्यक्त केली.

डॉ. सुधीर रसाळ यांचा परिचय

डॉ. सुधीर नरहर रसाळ हे मराठीतील सुप्रसद्ध समीक्षक आहेत. त्यांनी दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व केले आहे. इ .स. १९५६ पासून ते मराठी वाङ्मयाची समीक्षा करीत आहेत. साहत्यिविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे. रसाळ हे सन १९९० ते १९९३ या काळात औरंगाबाद विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे प्रमुख होते.

डॉ. सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षणात्मक पुस्तकासाठी यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. सुधीर रसाळ हे सध्या ९१ वर्षांचे असून, या वयातही अलिकडेच त्यांच्या १६ व्या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले.

प्राध्यापक म्हणूनही त्यांची चांगली ओळख आहे. त्यांनी शासकीय कला महाविद्यालय आणि मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ. सुधीर नरहर रसाळ हे मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक आहेत. साहत्यिविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे.

रसाळ यांचे कविता व लिखान

कविता निरूपणे काही मराठी कवी : जाणिवा आणि शैली ना.घ. देशपांडे यांची कविता, मर्ढेकरांची कविता : आकलन आणि विश्लेषण, मर्ढेकरांची कविता : जाणिवांचे अंत:स्वरूप, मर्ढेकरांचे कथात्म आणि नाट्यात्म वाङ्मय, लोभस : एक गाव काही माणसं (व्यक्तिचित्रे)

वाङ्मयीन संस्कृती

समीक्षक भालचंद्र नेमाडे : साहत्यि अध्यापन आणि प्रकार, सहसंपादन (प्रा. वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ),

पुरस्कार व मानसन्मान

अशोक कीर्तकीर पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्यातर्फे दिला जाणारा गौरवमूर्ती पुरस्कार, चारठाणकर प्रतिष्ठानचा पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा १ ला जीवनगौरव पुरस्कार

प्रा. रा. श्री. जोग पुरस्कार, पद्मजा बर्वे पुरस्कार, 'वाटा कवितेच्या' कार्यक्रमात दिला जाणारा, परभणीच्या शब्द सह्याद्री प्रतिष्ठानचा २०१४ सालचा शब्द सह्याद्री साहित्य सन्मान, साहित्य समीक्षा पुरस्कार, अशोक केळकर मराठी-भाषा-अभ्यासक पुरस्कार (२०२१).

**क्राईम वृत्त...**



## येरोळ जिल्हा परिषद शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

**येरोळ, दि.१९ डिसेंबर -**
येरोळ (ता. शिरूरअनंतपाळ) येथील जिल्हा परिषद शाळेत ५२ वे तालुकास्तरीय दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख दामाजी बालूरे, प्रभाकर हिप्परगे, बालाजी भिसे, मुख्याध्यापक धर्मपाल निचळे, उपसरपंच सतिश सिंदाळकर, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष तानाजी घाडगे, प्राचार्य बालाजी महावरकर, प्रभाकर चोचंडे, तुकाराम पाटील उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक इयत्ता ६ ते ८ वीचे एकूण १५ प्रयोग सादर करण्यात आले असून माध्यमिक व उच्च माध्यमिक इयत्ता ९ ते १२ विद्यार्थ्यांचे १४ प्रयोग सादर केले आहेत. यावेळी राहुल गायकवाड, एम.एस. बिरादार, प्रकाश नागटिळक, हामीद शेख, विलास हासबे यांच्यासह तालुक्यातील विद्यार्थी, पालक, नागरिक उपस्थित होते.



## उदयगिरीत देश का प्रकृती परीक्षण अभियान आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**उदगीर, दि.१९ डिसेंबर -**
येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती उदगीर व धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने देश का प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी बनवलेल्या विशेष एप्लीकेशनची माहिती देण्याविषयीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र तिरुके, सचिव म.ए. सोसायटी उदगीर हे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य दत्तात्रय पाटील यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयुर्वेद ही मानवी जीवनशैली बनली पाहिजे, असे मत व्यक्त केले. प्रमुख उपस्थिती अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कोषाध्यक्ष प्राचार्य विजयकुमार पाटील, बाबुराव माशाळकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार मस्के यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.एस. भुक्तरे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. बालाजी होकरणे त्यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



## कोनाळी येथे रब्बी हंगाम हरभरा पिक शेतीशाळा

**देवणी, दि.१९ डिसेंबर -**
पिकावरील किड व रोग सर्व्हेक्षण सल्ला प्रकल्प अंतर्गत कोनाळी (ना) येथे रब्बी हंगाम हरभरा पिक शेतीशाळा दुसऱ्या वर्गाचे आयोजन तालुका कृषि अधिकारी कार्यालय, देवणी यांच्यावतीने करण्यात आले होते. पिकास कृषि तंत्रज्ञानाची जोड देत पिकाचे उत्पादन वाढावे यासाठी कृषि विभाग शेतीशाळेच्या माध्यमातून काम करत आहे. हरभरा पिकामध्ये किड व रोग होवू नये या करिता एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. खर्च कमी करण्यासाठी पिकामध्ये कामगंध सापळे, पक्षी थांबे यांचा वापर करून किड नियंत्रण करणे तसेच घरच्या घरी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क तयार करणे आणि हरभरा पिकातील मर रोग व्यवस्थापन करण्यासाठी जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्माचा वापर आणि त्याचे फायदे याबाबत मार्गदर्शन गावचे कृषि सहाय्यक पी.बी. कारभारी यांनी केले. सदर कार्यक्रमास उपसरपंच रामदास बिरादार, विष्णू बिरादार, श्रीहरी बिरादार, गोवर्धन पाटील, गंगाधर भोळे, भागवत पोलकर, लक्ष्मीबाई बिरादार, छाया बिरादार इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

## भाजपाचे दिलीप नाईक यांचे निधन

**निलंगा, दि.१९ डिसेंबर -**
भाजपचे जेष्ठ नेते व दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गोविंदराव नाईक यांचे बुधवारी (दि.१८) रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७१ वर्ष होते. भारतीय जनता पक्षाचे संस्थापक सदस्य अशी त्यांची ओळख होती. भाजपात तालुका आणि जिल्हा पातळीवर त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. निलंगा शहरालगत असलेल्या दापका येथील



दीनदयाल उपाध्याय प्राथमिक आश्रम शाळा व गोविंद नाईक माध्यमिक विद्यालयाचे ते संस्थापक अध्यक्ष होते. गुरुवारी (दि. १९) सकाळी १०.३० वाजता त्यांच्या पार्थिव देहावर निलंगा येथील शांतीवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच निलंगा येथील नागरिक आणि नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कै. दिलीप नाईक हे दिवंगत स्वातंत्र्यसैनिक गोविंदराव नाईक यांचे पुत्र तथा सुभाष नाईक यांचे कनिष्ठ बंधू होते. मयत दिलीप नाईक यांच्या पक्षात पत्नी, दोन भाऊ, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# औशातील उड्डाणपुलाच्या जागेची रस्ते प्राधिकरण अधिकाऱ्यांकडून पाहणी

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या आदेशानुसार सर्वेक्षण; आशिवचा उड्डाणपुल तर उजनीतील पुलाचा समावेश...

**तभा वृत्तसेवा**
**आसौ, दि.१९ डिसेंबर -**
औसा शहरातील टी पॉईंट व याकतपूर मोड येथे उड्डाणपूल, आशिव पाटी येथे उड्डाणपूल व राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाका मोठ्या नाल्यांचे बांधकाम आणि उजनी येथील तेरणा नदीवरील उड्डाणपुलाची पुनर्बांधणी करून मोठी नाली बांधकाम करण्यासह इतर अनेक मागण्यांसाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी देशाचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार रस्ते प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या पथकाने मंगळवार दि.१७ रोजी या तिन्ही ठिकाणीची पाहणी करीत सर्वेक्षण केले. यासंदर्भात शुक्रवारी नागपूर येथे उच्चस्तरीय बैठक पार पडणार आहे.

औसा शहरातील टी पॉईंट व याकतपुर मोड येथे राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल व्हावा. यासाठी औसेकर अनेक दिवसांपासून मागणी करीत होते.

त्याच बरोबर आशिव पाटीवर उड्डाणपूल, आशिव टोलनाक्याजवळ नाली नसल्याने पावसाचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात थांबून होत असलेले नुकसान,उजनी जवळील उड्डाणपुलाची पुनर्बांधणी करून मोठी नाली काढण्याची मागणी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे आमदार अभिमन्यू पवारांनी केली होती.

आमदार अभिमन्यु पवारांनी केलेल्या मागणीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तात्काळ प्रतिसाद दिला असून रस्ते प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी मंगळवार दि.१७ रोजी दुपारी भेट दिली. व या तीन ठिकाणची पाहणी केली. त्यामुळे औशाच्या उड्डाणपुलासह इतर कामे मार्गी लागण्याची खात्री निर्माण झाली आहे. औसा शहराच्या मधून जाणाऱ्या ३६१ राष्ट्रीय महामार्गावरील टी पॉईंट येथे वाहतुकीची कोंडी होऊन लोकांना याचा त्रास होत होता. या ठिकाणी उड्डाणपुलाची मागणी लोकांकडून केली जात आहे.

शहरातील लोकांना होणारा त्रास पाहून आमदार अभिमन्यू पवारांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नितीन गडकरी यांची भेट घेऊन औशाच्या उड्डाणपुलासह आशिव येथे उड्डाणपूल, आशिव टोलनाक्याजवळ रस्त्याच्या कडेला साचणारे पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग नसल्याने पावसाचे पाणी शेतात साचून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. त्याच बरोबर उजनी



येथेही बांधण्यात आलेल्या पुलामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने अडचणी येत होत्या.

या ठिकाणी पुलाची पुनर्बांधणी करून नाल्या काढण्याची मागणी आमदार अभिमन्यू पवारांनी केली. याची तात्काळ दखल घेऊन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या. त्यांच्या सूचनेनुसार प्राधिकरणाचे अधिकारी यांनी भेटी देऊन पाहणी केली. या पहाणीचा अहवाल वरिष्ठांना पाठवून त्यावर तात्काळ कारवाई होणार असल्याने आमदार अभिमन्यू पवारांच्या या कामाचे सर्व बाजूनी स्वागत आणि कौतुक होत आहे.

यावेळी भाजपा औसा तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, जिल्हा उपाध्यक्ष किरणअप्पा उटगे, सभापती चंद्रशेखर सोनवणे, औसा शहर अध्यक्ष सुनील उटगे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, लहू कांबळे, शिवजी मुरगे, इंगायो समितीचे तालुकाध्यक्ष सदाशिव जोगदंड, विनोद जाधव, अच्युत पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भुगर्भातील स्फोटक आवाजामुळे नागरिकांत घबराहट

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ डिसेंबर -**
औसा तालुक्यातील उजनी, आशीव, मातोळा, हसलगण, गुबाळ, सारणी, मंगरूळ या पट्यातील गावात गुरुवार दि.१९ रोजी दुपारच्या सुमारास ११.५६ वा. जमिनीतून स्फोटक आणि गुढ आवाज येताच नागरिक घाबरुन रस्त्यावर आले. प्रशासनाकडे भुकंप झाल्याची नोंद दुपारपर्यंत झाली नाही. मात्र भुकंपासारख्या गुढ आवाजाने नागरिकांतून घबराहट दिसून येत आहे.

रोजच्या प्रमाणे आजही नागरिकांची रेलचेल सुरु होती. मात्र दुपारच्या सुमारास आचानकपणे जमिनीतून स्फोटक आवाज आला.

या आवाजासोबत जमिन हलल्याची जाणिव घरात असलेल्या नागरिकांना झाली. यामुळे घरातील नागरिकांनी घराबाहेर पळ काढला. औसा तालुक्यातील उजनी, आशीव, मातोळा, हसलगणा, गुबाळ, मंगरूळ, नांदुर्गा, सारणी, लिंबाळा, गांजनखेडा व तालुक्यालगतच्या धाराशिव जिल्ह्यातील सास्तूर, नळदुर्ग, आरणी भागात गुढ आवाज झाला. भूकंपाचा आवाज समजून लोक घर- दुकानाबाहेर पडले. अनेक नागरीक हा भूकंपाचा धक्का असल्याची चर्चा करीत आहेत.

पण या आवाजाने व धक्याने कोणतेही नुकसान झाले नाही.

## शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ एका क्रमांकावर मिळणार : उपविभागीय अधिकारी झाडके

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ डिसेंबर -**
निलंगा तालुक्यातील नणंद येथे आज ॲग्रोस्टिक योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एक क्रमांक दिला जाणार आहे. त्याचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्या हस्ते करण्यात आले.

शेतकऱ्यांना वारंवार अनेक योजनेसाठी सतत आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर, सातबारा, आठ अ असे द्यावे लागायचे पण शासनाने आता कोणत्याही योजनेसाठी शासनाकडून एक क्रमांक दिला जाणार आहे. त्या क्रमांकाच्या माध्यमातून सर्व योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे असे प्रतिपादन निलंगा तालुक्याचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या वेळी निलंग्याचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी शिंदे, मंडळ अधिकारी देशमुख, तलाठी ननावरे, कृषी सहायक लासुणे इत्यादी प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी सरपंच हरिभाऊ बोळे, उपसरपंच दिगंबर सूर्यवंशी ग्रामविकास अधिकारी भोसले व गावातील असंख्य शेतकरी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घेतली आ. अभिमन्यू पवारांनी भेट




### जलसंपदा विभागातील विविध विकासकामांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ डिसेंबर -**
बेलकुंड उपसा जलसिंचन योजना, तावरजा व तेरणा प्रकल्पासह औसा मतदारसंघातील जलसंपदा विभागातील विविध विकास कामांसाठी आ. अभिमन्यू पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पाठपुरावा केला. मतदारसंघातील जलसिंचन क्षेत्रातील वाढीच्या दुष्टीने भेट महत्वपर्ण ठरली असून जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना यावेळी दिल्या आहेत.

बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेचा निम्न तेरणा प्रकल्पात समावेश करून सुधारित प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात यावी. नागझरी (ता. लातूर) परिसरातील वाहून जाणारे पाणी तावरजा प्रकल्पात आणण्यासाठी सर्वेक्षण कामास मंजुरी देण्यात यावी. तावरजा नदीवरील सेलू येथील कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या नूतनीकरण कामास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात यावी. निम्न तेरणा प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर गाळ जमा झाल्याने हक्काचे पाणी कर्नाटक राज्यात वाहून जात आहे, वाहून जाणारे पाणी पुनर्स्थापित करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

तेरणा नदीवरील किल्लारी कवठा बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात पाण्याखाली गेलेल्या किल्लारी ते एकोंडी रस्त्याचे काम व पुलाचे बांधकाम नव्याने करण्यास मंजुरी देण्यात यावी. तेरणा नदीवरील मदनसुरी बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात कोकळगाव व परिसरातील शेतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात यावी. आशा अनेक मागण्याचा पाठपुरावा आ. अभिमन्यू पवार यांनी केला आहे.

या विषयांसंदर्भात बैठक घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांना दिल्या आहेत.

## विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी बालसभेत सहभागी व्हावे : राम तत्तापुरे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१९ डिसेंबर -**
मुलांचा सर्वांगीण विकास प्राथमिक स्तरावरील शिक्षणामध्ये होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी शाळेत होणाऱ्या बाल सभेच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा त्यातूनच खरे बाल कलाकार घडतात, असे आग्रही प्रतिपादन पर्यवेक्षक राम तत्तापुरे यांनी केले. ते यशवंत विद्यालयात वर्ग सहावीच्या वतीने आयोजित बाल सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

बाल सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे, व्यासपीठावर सह शिक्षक बालाजी सोनटक्के, सह शिक्षक श्रीधर लोहारे, विजयाताई स्वामी, सविता झोळगीकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी चिमुकल्या



राजनंदनी बनसोडे, आराध्या पाटील, नंदनी नागरगोजे, अहिरीश सय्यद, संध्या कोम्पले या विद्यार्थ्यांनी विविध समाज सुधारकांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाले. बाल सभेचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य गजानन शिंदे यांच्या भाषणाने करण्यात आला. बाल सभेचा शुभारंभ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी म्हणून ग्रंथ प्रदर्शन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीधर लोहारे यांनी सूत्रसंचालन सुरभी मुसळे, भक्ती बिराजदार, मानसी गुंडेवाड यांनी तर आभार राधिका डुकरे यांनी मानले.

## देवणी तालुक्यात ज्वारीवर किडरोगांचा प्राद्रुभाव

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.१९ डिसेंबर -**
तालुक्यात गेल्या आठ दिवसापासुन ढगाळ व पावसाळी वातावरण असल्यामुळे चारावर्गीय पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला असून चिकटा, मावा व लष्कळी अळीमुळे चार वर्गीय पिके धोक्यात आली आहेत.

तालुक्यातील मांजरा नदिकाठासह साठवण तलावाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने ज्वारीचा पेऱ्यात दरवर्षी वाढ होत आहे. शिवाय यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने रब्बीचे क्षेत्र वाढले असुन चारागवर्गीय पिकाचे क्षेत्र वाढले आहे.



दशकभरापासुन दुग्धोत्पादनात वाढ झाल्याने चाऱ्याची गरज म्हणुन एकदल पिकाखालील क्षेत्रात वाढच होताना दिसत आहे.

त्यातुन बडीज्वारी, पिवळीच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. मात्र बदलत्या वातावरणात लष्करी अळी, पांढरा व हिरवा मावा, चिकटा रोगाचा प्रादुर्भाव झाला असुन उत्पादनात मोठी घट येण्याची भीती आहे. सध्या वाढ अवस्थेत असलेल्या पिकावर रोंगाचा प्रादुर्भाव झाल्याने पाने पिवळी पडणे, करपणे, अळीच्या प्रादुर्भावाने पिकांचे नुकसान होण्याने पिकक्षेत्र धोक्यात आले आहे.

**रानडुकरांचा मोठा प्रादुर्भाव**

बडीज्वारी पिवळीच्या पिकांना शेतशिवारात रानडुकरांचा मोठा प्रादुर्भाव होत आहे. रात्रीच्या वेळी रानडुकराकडुन बहरात आलेले पिक उद्धस्त केले जात आहे. उसाचे फड रिकामे झाल्याने रानडुकरांनी आपला मोर्चा ज्वारीकडे वळवला असुन त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत.

पिकक्षेत्राच्या कडेने तारेचे कुंपण, साड्या लावणे, रात्रीच्या वेळी शेतीत थांबुन डुकरांचा बंदोबस्त केला जात आहे.

## श्यामार्य कन्या विद्यालयात विनोदाचा बादशाह गीतगायन, पाककला, पालक उखाणे स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ डिसेंबर -**
श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था संचलित श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी प्रस्तुत श्यामलाल कला पंधरवाडा अंतर्गत संस्थाअध्यक्ष सुपोषपाणी आर्य, संस्था सहसचिव अंजुमनीताई आर्य यांच्या मार्गदर्शनातून विनोदाचा बादशहा, गीत गायन व पालक उखाणे स्पर्धा आयोजित करण्यात आलेले होते. या स्पर्धेमध्ये खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक सहभाग नोंदवलेला होता.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांना प्रेरणा देण्यासाठी प्रत्येक उपक्रमासाठी खुले व्यासपीठ देण्याचे कार्य निरंतर करत असते.

त्या अंतर्गत विनोदाचा बादशहा, गीत गायन, पालक उखाणे स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या सर्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे खूप मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेला होता. चिट्टे शलाका, शेंडगे आरती, कदम सरस्वती, शेवाळे अंबिका, बिरादार मनस्वी, बिरादार अपेक्षा, जाधव अर्पिता, काळे अपूर्वा, पल्लेवाड प्रतिक्षा, नरहारे अमृता, कांबळे साक्षी, बिरादार अक्षरा, बावगे अस्मिता, टेकूळे वैभवी, निलेवाड मोनिका, जाधव अदा, देवरोट्रे अमृता, बिरादार निकिता, लोगरणे सानवी शिंदे, खडके नेहा, बजागरे मुग्धा, केंद्र सृष्टी, शेख बुशरा, स्नेहा मुरतळे, वाघमारे प्रसन्नो या विद्यार्थिनी विनोदाचा बादशहा या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्तार महेक, शेख आर्थिया या मुलींनी केले.

या स्पर्धेमध्ये खूप मोठ्या संख्येने पालक सहभागी झालेले होत्या. कुलकर्णी विनया, आरने अनुराधा, खांडेकर अनुसया, सत्यभामा कदम, काळे पुजा, पहलेवर अंबिका, गुंडिले रेश्मा, शेवाळे छाया, मुंडकर मनिषा, सुर्यवंशी शाहू, केंद्र रेणुका, माने अरुणा, काळे मिना, शेंडगे राधा, संध्या गोटमुकले, योरे ज्योती, मोरतळे अवंतिका या पालकांनी व सर्व महिला शिक्षकांनी सहभाग नोंदवलेला होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोदाचा बादशहा व उखाणे स्पर्धांचे प्रमुख वनमाला मुक्कावार, पाककला प्रमुख सारिका कुलकर्णी, स्वाती मोरतळे, प्रेमा होन्ना, प्रभा समदरे तर गीतगायन प्रमुख मदन पाटील यांनी काम पाहिले.

स्टेज सजावटचे कार्य पर्यवेक्षक विजयकुमार बैले, सल्लाउद्दीन शेख, शिक्षकेतर कर्मचारी समाधान कांबळे, दिलीप वाघमारे व स्वामी यांनी काम पाहिले.

## आजपासून वलांडी येथे अखंड शिवनाम सप्ताहाची सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१९ डिसेंबर -**
तालुक्यातील वलांडी येथील राचोटेश्वर स्वामी महाराज यांच्या संजिवन समाधी सोहळ्या निमित्त अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारयणाची सूरूवात शूक्रवार दि-२० डिसेंबर पासून सूरूवात होत आहे.



'दैनंदिन कार्यक्रम' सकाळी ६ ते ८ श्रीचा अभिषेक, ८ ते ११ ग्रंथराज परमरहस्य पारायण, सायंकाळी ४ ते ६ मन्मथ गाथा, ६ ते ८ शिवपाठ, रात्री ८:३० ते ११ शिवकिर्तन, मध्यरात्री शिवजागर व पहाटे शिवपाठ आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मन्मथ पाटील महाराज जानापूर, संगीता पाटील महाराज नांदेड, तानाजी पाटील महाराज थोटवाडीकर, अनिता हैबतपुरे उदगीरकर, लक्ष्मण विभूते महाराज लातूरकर, शिवराज नावंदे गुरूजी उदगीरकर, निकीता स्वामी करवंदीकर, अमोल लांडगे महाराज बनवसकर, सोमनाथ स्वामी महाराज चांदेगावकर यांच्या किर्तनानंतर सकाळी ६ वाजता श्रीची पालखी १० ते १२ वाजता मिरवणूक प्रसाद किर्तन व महाप्रसाद होईल.

तरी वलांडी व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बस प्रवास योजना स्मार्टकार्ड नोंदणी केंद्रात बदल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना लातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा-या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका,मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे.

या सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणा-या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल शहर बसस्टॉप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक,लातूर,क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर, क्षेत्रीय कार्यालय अ ,मनपा कार्यालय लातूर, क्षेत्रीय कार्यालया ड गांधी चौक,लातूर येथे दिनांक १३/१२/२०२४ पासून रजिस्ट्रेशन चालू करण्यात आले होते. परंतु महिला प्रवाशांची मागणी लक्षात घेता दिनांक १९/१२/२०२४ पासून खालील ठिकाणी सुधारीत बदल करण्यात आलेला आहे. संविधान चौक, पाण्याची टाकी, बार्शी रोड लातूर, जुना रेणापूर नाका शहर बस थांबा लातूर, गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल, शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर येथे देऊन आपले फॉर्म भरून रजिस्ट्रेशन करून घ्यावे. त्यासाठी लातूर शहर हद्दीत राहणा-या महिलांनी आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत देऊन फॉर्म भरून आपल्या स्मार्ट कार्ड साठी महिला प्रवाशानी नजीकच्या केंद्रात जावून स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी असे आवाहन पालिकेने केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांची व्यवस्थापन परिषदेवर निवड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिता सांगोले यांची कुलपती सी.पी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्र मराठी विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे स्थापन झालेल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.
डॉ. सुनिता सांगोले दयानंद कला महाविद्यालय, लातूर या मराठी पदव्युत्तर व संशोधन विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. मराठी साहित्य व भाषा विज्ञानाच्या अभ्यासक असलेल्या डॉ. सुनीता सांगोले यांची आजवर १० पुस्तके प्रकाशीत झालेली आहेत. या निवडीबद्दल त्यांची अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### धान्य पुरवठा करण्यासाठी दरपत्रक सादर करण्याचे शासनाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सैनिकी मुलां-मुलींचे वसतिगृह येथे अंदाजे प्रतिदिन १०० विद्यार्थ्यांना दरमहा धान्य खरेदी करण्यात येते. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व धान्य विक्रेता, व्यापारी यांनी १ जानेवारी, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीसाठी सर्व धान्याचे कमीत कमी चार महिन्याचे स्थिर भाव दरपत्रक जिल्हा सैनिक कलयाण अधिकारी, लातूर यांचे नांवे २४ डिसेंबर, २०२४ पर्यंत बंद पॉकेटमध्ये सैनिक मुलांचे-मुलींचे वसतिगृह लातूर येथे सादर करावे, असे लातूर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

### डॉ. आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील शासकीय वसतिगृहासाठी पात्र परंतु रिक्त जागेअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबवविण्यात येते. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शासकीय वसतिगृह तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलवर योजनेचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भरण्याचे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी केले आहे.

### प्राचार्य गोविंद शिंदे यांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या समाजधुरीणांच्या



कार्याची दखल घेवून ज्ञानगंगा घरोघरो पोहंचविण्याऱ्या जालना येथील हंड्रेड शिक्षक क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या मानाच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवागौरव पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून या पुरस्कारात स्वामी विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य गोविंद शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. २९ डिसेंबर रोजी जालना येथे एका विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.
प्राचार्य गोविंद शिंदे यांनी शिक्षण क्षेत्रातील अमुलाग्र बदल स्विकारुन जागतीक पातळीवरील शिक्षणाच्या नव्या दिशांच्या अभ्यास करुन शालेय शिक्षणाबरोबर, शालेय स्पर्धा परीक्षा, उच्च गुणवत्ता, मुल्यसंवर्धन, शालेय शिस्त, नाविन्यपुर्ण परिपाठ, अध्यात्म, विज्ञान आणि एकात्म सांस्कृतिक मुलांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांसह विशेष प्रयत्न केले आहेत. एनएमएमएस, स्कॉलरशिप, आणि डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षांसह मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजावी म्हणून नवोपक्रम राबवून, क्रिडा, साहित्य व पुरक सहशालेय उपक्रमातून स्वामी विवेकानंद विद्यालयाची गुणवत्ता वाढवून शैक्षणिक सेवा केली आहे.

## टेंभुर्णी- लातूर महामार्गाच्या चौपदरीकरणाकरिता ५७४ कोटी रुपये मंजूर : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
लातूर ते टेंभुर्णी जाणाऱ्या महामार्गासाठी केंद्र सरकारने ५७४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. धाराशिवचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी पाठपुरावा केला होता.

धाराशिव लोकसभा मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाचा हत्त्वाचा महामार्ग टेंभुर्णी-लातूर हा असून सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी, कुर्डूवाडी, बार्शी तसेच धाराशिव जिल्ह्यातील येडशी, तडवळा, ढोकी व लातूर जिल्ह्यातील मुरुड या मोठ्या बाजारपेठांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता.

धाराशिवचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची दि. २९ संप्टेबर २०१९ रोजी भेट घेतली होती. त्यानंतर दिनांक २१ नोव्हेंबर २०१९ रोजी लोकसभेच्या अधिवेशनादरम्यान प्रश्न क्रमांक ७१ द्वारे तारांकित प्रश्न विचारला होता. त्यानंतर ९ मार्च २०२१ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान नियम ३७७ द्वारे लक्षवेधी प्रश्न विचारून सभागृहाचे लक्ष वेधले होते. दिनांक ५ एप्रिल २०२१ रोजी गडकरी यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सदर प्रश्नासंदर्भात चर्चा केली होती. दिनांक २१ डिसेंबर २०२३ रोजी हिवाळी अधिवेशनादरम्यान नितीन गडकरी यांची भेट घेऊन सदर विषयाच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात आला होता. दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी गडकरी यांच्या निवासस्थानी या प्रश्नाच्या अनुषंगाने भेट घेतली व सदर मार्गाच्या चौपदरीकरणाबाबत पाठपुरावा केला होता. लोकसभेचा सदस्य या नात्याने आणि हा महत्त्वाचा मार्ग असल्याने संबंधित प्रश्नाकडे सभागृहाचे वारंवार लक्ष वेधले होते. तसेच लक्षवेधीच्या माध्यमातून व तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून अनेक वेळा या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या संदर्भाने पाठपुरावा केला होता. चालू हिवाळी अधिवेशना दरम्यान खा. निंबाळकर यांनी प्रश्न - उत्तराच्या तासांमध्ये नितीन गडकरी यांना सोलापूर- उमरगा रामा ६१, धुळे -सोलापूर रामा२११, नागपूर -रत्नागिरी रामा ३६१ सह टेंभुर्णी-लातूर या मार्गाच्या संदर्भाने प्रश्न विचारले होते. या सर्वांचा परिपाक म्हणून या मार्गासाठी ५७४ कोटी मंजूर करण्यात आल्याची माहिती खा. निंबाळकर यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली.

## १० लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकने १० लाख ८६ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, एका वाहनातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी व कर्नाटक ते परळी व्हाया अहमदपूर वाहतूक होणार आहे. या माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिरूर ताजबंद जवळ सापळा लावून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणारे वाहन ताब्यात घेतले. सदर वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखू आढळून आला. पोलिसांनी कारसह ७ लाख, एकूण १० लाख ८६ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

पोलिसांनी मुस्तकीम खान इस्माईल खान उर्फ पठाण, वसीम अक्रम पठाण, सचिन गुट्टे या बीड जिल्ह्यातील तसेच बिदरच्या अण्णाला ताब्यात घेतले. या सर्वाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, युवराज गिरी, मोहन सुरवसे, मुन्ना मदने यांनी पार पाडली.

## प्रा. योगेंद्र यादव यांना ॲड. मनोहरराव गोमारे तत्वनिष्ठ सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
भारतातील सुप्रसिद्ध राजकीय विश्लेषक, विचारवंत प्रा. योगेंद्र यादव यांना ॲड. मनोहरराव गोमारे तत्वनिष्ठ सामाजिक कार्यकर्ता राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. रोख ५० हजार रूपये सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून २१ डिसेंबर रोजी लातूर येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे अशी माहिती संयोजकांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.



मराठवाड्यातील सुप्रसिध्द समाजवादी विचारवंत ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त सामाजिक कार्यामध्ये राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यास ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या नावे पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार निवड समितीने केलेल्या शिफारसीनुसार भारतातील सुप्रसिध्द राजकीय विश्लेषक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते प्रा. योगेंद्र यादव यांना जाहीर करण्यात आला आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख पन्नास हजार रू., स्मृती चिन्ह व गौरव पत्र असे आहे. ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर च्या वतीने ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या नावे ॲड. मनोहरराव गोमारे व्याख्यानमाला सुरू करण्यात आली आहे.

या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्रा. योगेंद्र यादव भारतीय लाकशाहीसमोरील आव्हाणे व भवितव्य या विषयावर गुंफणार आहेत अशी माहिती लातूर शहरात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

## महावितरणने आणली लकी डिजिटल ग्राहक योजना

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत.

१ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.

**वीज ग्राहकांना मिळणार आकर्षक बक्षीसे**

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही.

ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते असे महावितरणने सांगीतले आहे.

## 'वंचित' कडून लातूर शहरात निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सुंदर अशी राज्यघटना दिली. असे असून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विषयी आक्षेपार्ह विधान केल्याच्या निषेधार्थ शहरात आज वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने निदर्शने करण्यात आली.




संसदेत महापुरुषांच्या बद्दल अवमान कारक आणि केवळ जाती-जाती मध्ये धर्मा-धर्मामध्ये दंगली घडाव्या आणि एकमेका विषयी द्वेष निर्माण व्हावा म्हणून जाणूनबुजून असे वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी लातूर शहराच्या वतीने आज गांधी चौक लातूर येथे तीव्र निदर्शने करण्यात आले. त्याने केलेल्या वक्तव्याबद्दल अमित शहा ने लवकरात लवकर माफी मागावी अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा या आंदोलना दरम्यान वंचित बहुजन आघाडीचे लातूर शहराध्यक्ष सचिन अर्जुन गायकवाड यांनी प्रशासनाला दिला आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडी चे मराठवाडा महासचिव संतोषभाऊ सूर्यवंशी, युवक प्रदेश सदस्य अमोल लांडगे, जिल्हा महासचिव रोहित सोमवंशी, शहराध्यक्ष सचिन अर्जुन गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष शेख खलील,विनोद खटके, डॉ. विजय अजणीकर, बौद्धाचार्य केशव कांबळे,जिल्हा सचिव प्रा. प्रशांत उघाडे सर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुरेश सूर्यवंशी, प्रचारक सय्यद सुफी साहब,युवक जिल्हा महासचिव नितीन गायकवाड, कामगार माथाडी जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे, लातूर ता.अध्यक्ष सुनील कांबळे, शहर महिला अध्यक्ष सुजाता अजनीकर, शहर महासचिव आकाश इंगळे,ब्लॅक पँथर संस्थापक अध्यक्ष अतुलजी गायकवाड, संस्थापक उपाध्यक्ष उषाताई धावारे, युवक शहराध्यक्ष महिंद्र बनसोडे, शहर सचिव दादासाहेब मस्के, शहर उपाध्यक्ष मनोज लेंढाणे,शहर सदस्य पठाण शरीफ, तालुका उपाध्यक्ष अशोक कांबळे, ॲड. उड्डाण सिंग,अरुण सूर्यवंशी, संजय सुरवसे, प्रसेनजीत कांबळे, शहर सल्लागार राहुल सूर्यवंशी, कमलाकर कवठेकर इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. घुगेंच्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज होणार सुनावणी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
येथील आयकॉन हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. प्रमोद घुगे याने सुरक्षा रक्षकाला बेदम मारहाण करुन गंभीर जखमी केले होते. यातच सुरक्षारक्षकाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार असलेल्या डॉ. घुगे याने आता वकिलामार्फत अटकपूर्व जामिनासाठी सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. यावर आज (शुक्रवारी) सुनावणी होणार आहे.

डॉ. प्रमोद घुगे व त्याचा सहकारी अनिकेत मुंडे याने सुरक्षारक्षक बाळू डोंगरे याला हॉस्पिटलच्या सहाव्या मजल्यावर नेऊन स्टम्प, बॅट आणि प्लॅस्टिक पाईपने मारहाण केली होती. बाळू हा सातत्याने कामाच्या पैशाची मागणी करीत असल्याने त्यांनी ही मारहाण केली होती.

मारहाणीनंतर तो अपघात असल्याचा बनाव करुन आयकॉन हॉस्पिटलमधून एमएलसी ही शिवाजी नगर पोलीस ठाण्यात देण्याचे कामही या डॉक्टराने केले होते. मात्र, मयत बाळूच्या अंगावरील जखमा पाहून त्याचा मृत्यू अपघातामध्ये नाहीतर मारहाणीत झाल्याचा संशय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वर्तविला होता. त्यानंतर पोलिसांनी अधिकचा तपास केल्यानंतर बाळूचा खून करण्यात आल्याचे स्पष्ट झाले होते. बाळूची आई प्रेमा डोंगरे यांच्या फिर्यादीवरुन शिवाजी नगर पोलीस ठाण्यात डॉ. प्रमोद घुगे व अनिकेत मुंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याची नोंद होताच डॉ. घुगे व मुंडे हे फरार झाले आहेत.

## मांजरा साखर कारखान्याकडून २७०० प्रमाणे पहिली उचल जमा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
राज्यात नव्हे तर देश पातळीवर साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या मांजरा परिवारातील मुख्य आधारस्तंभ असलेल्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने आपल्या वाटचालीत शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचे कार्य सातत्याने सुरु ठेवले. यातून शेतकरी समृध्द झाल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसत आहे .



सध्या मांजरा कारखान्याचा चालु गळीत हंगाम २०२४-२५ गाळप सुरु असुन १७ डिसेंबर रोजी अखेर कारखान्याने १,१४,०४० मे. टन उसाचे गाळप केलेले असून ८७,४५० मे. टन साखर उत्पादन केले आहे. तसेच ४७,४९,६३५ के डब्ल्यू एच विजेची निर्यात वीज वितरण कंपनीस केली असून ११,५९,४३३ लिटर इथेनॉलचे उत्पादन केले असून चालु गाळप हंगामात ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रती मेट्रिक टन २७००/ रुपया प्रमाणे पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर बिलाची रक्कम जमा केली आहे .

मांजरा परिवाराचे मार्गदर्शक व माजी मंत्री कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांनी शेतकरी हिताचा विचार करून जाहीर केल्याप्रमाणे गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गळीतास दिलेल्या उसापोटी पहिली उचल प्रति मे.टन रु. २७००/- प्रमाणे अदा करण्याचा निर्णय कारखाना व्यवस्थापनाने घेतला आहे. गळीतास आलेल्या ऊसाला रु. २७००/- प्रति मे.टन याप्रमाणे मंगळवार दि. १७/१२/२०२४ रोजी संबधीत ऊस उत्पादकांच्या खात्यावर जमा केले आहेत. ज्या ऊस उत्पादकांचा ऊस कारखान्यास गाळपास आलेला आहे त्यांनी आपल्या बँक शाखेतून ऊस बिलाची रक्कम उचल करावी व सर्व जास्तीत जास्त ऊस उत्पादकांनी आपला ऊस मांजरा कारखान्यास गाळपास पाठवावा असे आवाहन सन्माननीय संचालक मंडळ व कार्यकारी संचालक यांनी केले आहे.

## राजकुमार सोनी यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
लातूर जिल्हा ग्रंथालय संघावर स्विकृत संचालकपदी पत्रकार गोपीकिशन ऊर्फ राजकुमार हरिकिशन सोनी निटूरकर यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर नियुक्तीचे पत्र लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह राम मेकले यांनी दिले.

स्विकृत संचालक गोपीकिशन ऊर्फ राजकुमार सोनी यांनी बोलताना सांगितले, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, उपाध्यक्ष युवराज जाधव, कार्यवाह राम मेकले, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे यांचे मनापासून आभार व्यक्त करून ग्रंथालयाच्या चळवळीत मला आवड व कार्य असल्याने सातत्य ठेवणार आहे.

या निवडीबद्दल पत्रकार राम काळगे, गोविंद इंगळे, लक्ष्मण पाटील, परमेश्वर शिंदे आदिंनी अभिनंदन केले.

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १९ डिसेंबर-**
अल्पसंख्यांक नागरीकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतच्या वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी, यासाठी १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संदीप कुलकर्णी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक अरविंद कांबळे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अफसर शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा कौशल्य विकास, उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक बालाजी मरे यांच्यासह अल्पसंख्यांक समाजाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

अल्पसंख्यांक समाजासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध माध्यमातून जनजागृती करावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही गतीने करावी, असे प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. अल्पसंख्यांक विभागामार्फत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणारी विविध विकास कामे, अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत गेल्या चार वर्षात मंजूर कामांची माहिती त्यांनी दिली. तसेच धार्मिक अल्पसंख्यांक खासगी शाळा पायाभूत सोयी सुविधा योजना व डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून २०१८-१९ ते २०२४-२५ पर्यंतच्या योजनांचा तसेच अल्पसंख्यांकाच्या कल्याणासाठी माननीय पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाची माहिती देण्यात आली.